साप्ताहिक

# माणूस

२५ डिसेंबर '८२ दोन रुपये

## सात आंधळे आणि एक अप्पू



## एशियाडचा जमाखर्च.

# सह्‌-सारंग

५३७ सदाशिव पेठ, जोंधळे चौक,
लक्ष्मी रोड, आधार समोर,
पुणे ४११ ०३०

फोन : ४४५०५३

| उषा शो-रूम (पुणे) | फेरोक्रीट प्रॉडक्टस् |
| --- | --- |
| उषा शिवणयंत्रे | पाण्याच्या टाक्या |
| उषा पंखे | सेप्टिक टँक |
| शिवण साहित्य | शिवाय |
| व | चैत्र फॅमिली कॅसेटस् |
| स्पेअरपार्टस् | (संस्कार आणि आरोग्य) |

फोन नं. : ४४५७४२

हार्दिक शुभेच्छा !

## पु. ना. गाडगीळ आणि कं.

जव्हेरी–सराफ

आपणास चटकन पसंत पडतील असे सोन्याचांदीचे, मोत्यांचे व जवाहिरांचे नाविन्यपूर्ण, नाजूक अलंकार, तसेच सांगली घाटाची चादीची नित्योपयोगी भांडी खात्रीशीर व माफक किमतीत मिळतात.
नवग्रहांची रत्ने, आगठ्या व जन्ममास रत्ने मिळतील !

कुंटे चौक, लक्ष्मी रोड, पुणे ४११ ०३०

सांगली येथील पेढीचा शतकोत्तर सुवर्णमहोत्सव
दि. २२-१२-८२ रोजी संपन्न झाला.

धन्यवाद !

# APOLLO ELECTRONICS

2038, Sadashiv Peth, Tilak Road,
PUNE 411 030

*Distributors for ( M. S. )*

**Disco Colour and B. & W. T. V.**

★

*Specialists in—*

**T. V. Electronic Calculators
and
Other Electronic Equipment**

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : बाविसावे

अंक : अठ्ठाविसावा 30

२५ डिसेंबर १९८२

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

सुभाष अवचट

# ग्रंथाली

## चळवळ, हौस, व्यवसाय ?

निष्कर्ष कशावरून काढायचे ? नियम कुठला? नवलाई कुठली ?

सत्यकथा मासिक बद झाले तेव्हा पुण्यात साहित्य परिषदेच्या सभागृहात एक सभा झाली ४–५ वक्त्यानी त्यात भाषणे केली. श्रोत्याची संख्या बरी होती. सत्यकथेचे सपादक श्री. पु. भागवत या सभेला उपस्थित होते. त्यानीही अध्यक्षाच्या विनतीला मान देऊन आपले विचार शेवटी सभेत मांडले. पुरेसा वाचकवर्ग नाही, मराठीशी नव्या पिढीचा संबंध तुटतो आहे, सास्कृतिक प्रेरणा कमी होत आहेत, या संकटाचा सर्वांनीच विचार करावा असा एकूण त्यांच्या भाषणाचा शेवट होता. काही आकडेवारीही त्यांनी आपल्या भाषणात श्रोत्यासमोर ठेवली होती.

याच सभागृहातील वातावरण गेल्या १८ डिसेंबरला अगदी वेगळे होते. त्या दिवशी संध्याकाळी तेथे पुण्यातील अनेक नामवंत लेखक, प्रकाशक, सपादक, ग्रंथप्रेमी, पुस्तकविक्रेते, रसिक वाचक 'ग्रंथाली' या सस्थेच्या कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यासाठी आवर्जून उपस्थित होते. ग्रथालीने १ ते १८ डिसेंबर या काळात ग्रंथविस्तार व प्रसारासाठी एक धावती यात्रा आयोजित केली होती. नगरहून, अलीकडच्या मुक्कामाहून ग्रंथयात्रिकाना घेऊन येणारी बस बरोबर ४॥ वा. साहित्यपरिषदेसमोर आली व रसिक पुणेकर व ग्रंथयात्रिक यांच्या चहापानाबरोबरच्या गप्पाटप्पांमुळे पुढचा तास-दीड-तास परिषदेचे सभागृह गजबजून, फुलून गेले. ग्रथयात्रिकाचे दौऱ्यातील अनुभव फारच उत्साहवर्धक होते. ठिकठिकाणी वाचकाचा, सर्वसामान्य जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असे जो तो सांगत होता. पुस्तके कमी पडत होती. लहान-सहान गावांतूनही ग्रथ विकत घेण्याची हौस–आवड दिसून येत होती असे ग्रंथालीचे कार्यकर्ते सागत होते. केवळ लोकप्रिय लेखकांच्या पुस्तकाना मागणी होती असे नाही. अगदी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी याच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या भल्यामोठ्या लेखसग्रहाच्या नेलेल्या प्रतीही सपल्या, असे ग्रंथालीचा एक कार्यकर्ता कुमार केतकर सांगत होता. ज्या काळात सत्यकथा मासिक बंद पडते, पुस्तकपढरीसारखा केवळ दलित साहित्याला वाहिलेला यंदाचा चागला दिवाळी अंक पुरेसा खपत नाही, त्याच काळात, पुस्तके कमी-वाचक जास्त, असाही अनुभव ग्रथाली यात्रकरूंना येतो. तेव्हा खरे काय मानायचे?

या ग्रंथयात्रेची प्रसिद्धी चांगली झाली. ठिकठिकाणच्या ग्रंथप्रेमीचे सहकार्य मिळवण्यात ग्रंथालीचे चालक यशस्वी ठरले. ज्याच्याभोवती प्रसिद्धीचे, कीर्तीचे वलय आहे अशा लेखकाना पाहण्याची, त्याच्याशी बोलण्याची लोकाना हौस असते. ही हौस ग्रंथालीने भरपूर प्रमाणात पुरवली. अनेक ठिकाणी अशा लेखकांच्या प्रकट मुलाखतीचे, कवीच्या काव्यवाचनाचे कार्यक्रम योजण्यात आले होते. अधूनमधून जब्बार पटेल, अमोल पालेकर यांच्यासारखी चित्रपटक्षेत्रातील प्रसिद्ध मंडळी यात्रेत डोकावून जात होती. या सर्व योजकतेमुळे ग्रंथविक्रीला–प्रसाराला उठाव येणे – चालना मिळणे साहजिकच होते. ग्रंथाली कार्यकर्त्यांचे कष्ट तर मान्यच केले पाहिजेत. १८ दिवसाच्या गोवा, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा अशा धावपळीच्या दौऱ्यात काही कार्यकर्त्यांना तर सलग ३–४ तास झोपही घेता आली नाही, असे एकजण सागत होता. ग्रंथाली संस्था सुरू झाल्यापासून तिचे चालक, ही एक वाचक–चळवळ आहे असे सागत आले; परंतु 'चळवळ' या शब्दाला साजेशी कृती आजवर काही ग्रथालीकडून घडली नव्हती. पुण्या–मुबईत २–४ फिरक्याचे कार्यक्रम व पुस्तकप्रकाशन या–पलीकडे या संस्थेची मजल गेलेली नव्हती. या अठरा दिवसाच्या ग्रंथयात्रेमुळे ग्रंथालीने प्रथमच एक चळवळ म्हणून आपले अस्तित्व प्रकट केले. ही चळवळ वाचकाची व लेखकाची आहे असे ग्रंथाली सागते. 'वाचक–लेखक एकजुटीचा विजय असो' वगैरे घोषणाही पुण्यात शेवटी निघालेल्या ग्रंथमोर्चात दिल्या गेल्या; पण चळवळ टिकाऊ पायावर उभी राहायला हवी असेल तर लेखक आणि वाचकांना एकत्र आणणारा प्रकाशक–पुस्तकविक्रेताही लागतो. याचा सहभाग आज

नाही उद्या चळवळीत हवा. सध्या कार्यकर्ते आपापल्या नोकऱ्या साभाळून, हौस व ग्रंथप्रेम म्हणून, उरलेल्या वेळात हा सर्व पुस्तक-प्रकाशनाचा, विक्रीचा, सभासद-नोंदणी वगैरेचा उद्योग करीत आहेत. उद्या पसारा वाढला की, पूर्णवेळ कार्यकर्ते लागतील, जागा लागेल. यासाठी पैसा लागेल. हा सर्व खर्च पुस्तकांशिवाय कशावर टाकणार ? पुस्तके सतत लोकांच्या डोळ्यांसमोर ठेवायची असतील तर पुस्तकविक्री-दुकानांची मदत घ्यावी लागणार. या पुस्तक-विक्रेत्यांना कमिशन द्यावेच लागते. पुस्तक-प्रकाशन, विक्री हा शेवटी एक व्यवसाय आहे. व्यवसाय म्हटला की, २-४ लोक वाईट-चागले निघायचेच. ग्रंथाली चळवळीलाही पुढे-मागे या व्यावसायिक बाजूचा विचार करावा लागेलच. अगदी व्यंकटेश माडगूळकरांचेच उदाहरण घ्या पुण्यात निघालेल्या ग्रथमोर्चात ते पूर्ण वेळ उपस्थित होते. गुलालाने चागले रंगलेले होते. ग्रथाली-यात्रेच्या समारोप-कार्यक्रमातही ते सहभागी झालेले होते. व्यंकटेश माडगूळकरानी मराठी प्रकाशकांवर चागलीच आगपाखड नुकतीच केलेली आहे. प्रकाशकांना त्यानी 'लेखकांना लुबाडणारी जमात', 'सास्कृतिक दरोडेखोर' असे म्हटले आहे.(पहा-अक्षर दिवाळी अक-पृष्ठ २३०) आता अशी अपेक्षा करावी का की, व्यकटेश माडगूळकर आपली बहुसंख्य चागली पुस्तके तथाकथित सांस्कृतिक दरोडेखोरी करणाऱ्या, प्रकाशन हा व्यवसाय म्हणून करणाऱ्या व्यक्तीला किंवा सस्थेला न देता ग्रंथाली या वाचकचळवळीला कमी मानधनात देतील ?

अशी अपेक्षा धरू नये कारण ती पूर्ण होणे शक्यच नाही.

म्हणून लेखक, वाचक याच्याप्रमाणेच प्रकाशक-पुस्तकविक्रेते यांचाही ग्रथप्रसारात सहभाग हवा. अगदी मुद्रकांचाही. आज सगळेचजण या चळवळीकडे प्रेमाने, आपुलकीने पाहताहेत; पण या १८ दिवसाच्या ग्रंथयात्रेतील, मुंबईच्या मौज-पॉप्युलर किंवा पुण्याच्या कॉंटिनेंटल-मॅजेस्टिकसारख्या प्रमुख व नामवत प्रकाशनगृहाची अनुपस्थिती किंवा अल्प सहभाग दृष्टिआड करून कसा चालेल ?

—श्री. ग. मा.

पुणे वार्ता

# न रंगलेल्या तीन संगीत रात्री !

डिसेंबर महिना उजाडला की गावोगावी काही संवाद ऐकू येतात.

"काय भाऊ ? यंदा येणार की नाही पुण्याला ?"

"म्हणजे काय ? अहो सवाई गंधर्व चुकवून कसं चालेल ? त्याच वेळी आमच्या पोरीसाठी दोनचार स्थळं पण बघावी म्हणतो." इति संगीतप्रेमी वधूपिता.

"काय रे ? यंदा येणार की नाही पुण्याला ? गेल्या वर्षीची तुझी ती कदाचित यंदा पण भेटेल."

'छोड यार. तिच्यातला इंटरेस्ट संपला. यंदा दुसरी कुणीतरी.' उत्साही प्रेमवीर.

'काय काका ? यंदा सवाई गधर्वाला येणार की नाही ?'

'वा. हे काय विचारणं ? माझ्या एका नातेवाईकानं स्टॉलच टाकलाय. यायलाच पाहिजे.' आणखीन एक सगीतप्रेमी.

कुणी कशासाठी तर कुणी आणखीन कशासाठी, पण डिसेंबरच्या दुसऱ्या गुरुवारी तमाम शौकीन मंडळी पुण्यात हजर होतात. अर्थात यातली पन्नास टक्के मंडळी तरी सगीत शौकीन असतात हे नक्की. उरलेले हौशे, नवशे आणि गवशे. (या संगीत समारोहामुळे अनेकाची लग्ने जुळली आणि त्यांची सतती संगीता वगैरे स्वरमय नावे धारण करून या समारोहात वावरत असतात असेही काही जाणकाराचे म्हणणे आहे ) असो.

तर एक गोष्ट मान्य करायलाच पाहिजे. या सगीत महोत्सवाने महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारतातल्या सागीतिक जीवनात फार महत्त्वाचं स्थान मिळवलं आहे. प्रत्येक हौशी माणूस या महोत्सवाची आतुरतेनं वाट पहात असतो. या महोत्सवाला हजेरी लावणं ही ही अभिमानाची गोष्ट समजली जाते. मग प्रत्यक्ष गाणं समजो न समजो. गाण्याला हजर न राहता वडे चहाचा आस्वाद घेत गप्पा मारीत फिरलं तरी चालतं. पण मांडवात तीन रात्री हजेरी हवीच. म्हणजे मग वर्षभर 'आम्ही सवाई गंधर्व महोत्सवाला जाऊन आलो' अशी शेखी मिरवीत फिरायला मोकळे.

यंदाचा महोत्सव कसा झाला ? खरं सांगायचं म्हणजे गाजला पण रगला नाही. याला कारण संयोजनातला गलथानपणा. गोपीकृष्ण सारख्या आतरराष्ट्रीय कीर्तीच्या नर्तकाचा कार्यक्रम ऐनवेळी वगळला याला कारण संयोजकानी केवळ पत्र पाठवूनच त्याची संमती गृहीत धरली. फोन किंवा इतर साधनाचा विसर पडला. परिणामी पत्र न मिळाल्याचा निरोप, कार्यक्रम रद्द आणि हजारो रसिकाची निराशा. गोपीकृष्णासाठी ज्यानी तिकिटे घेतली त्याना एकप्रकारे फसविल्यासारखेच झाले. काही मंडळीनी पैसे परत मागण्याचा विचारही बोलून दाखविला. सवितादेवी नावाच्या गायिका आल्याच नाहीत. माधव गुडी आणि श्रीपती पाडिगार याची गायनाची जुगलबंदी जाहीर झाली होती. ऐन वेळी एकटे माधव गुडीच गायले. अर्थात संयोजकाना अनेक अडचणीना तोड द्यावे लागते हे तर खरेच. पण जनमानसावर मात्र विपरीत परिणाम होतो.

यंदाच्या महोत्सवाची सुरुवात गुरुवारी नऊ डिसेंबरला लोणकर आणि मंडळी यांच्या सनईवादनाने झाली. त्यानतर विवेक खाडिलकर नावाचे अमेरिकेत स्थायिक झालेले गृहस्थ रंगमंचावर येऊन 'सरस्वती' राग आळवू लागले अत्यंत सुमार कुवतीच्या या गायकाला या महोत्सवात का स्थान दिले गेले हे एक कोडेच आहे. सगीताच्या तयारीमुळे तर निश्चित नव्हे त्याचे सर्व स्वर 'इपोर्टेड' होते. सरस्वती सगळी कणसूर होती. आनंदाची बाब एवढीच की, त्यांनी हा ख्याल लवकर आटपला. त्यानतरचे भजन सुसह्य होते एवढेच अशा गायकाला स्थान दिल्यामुळे इतर बरेच हेतू साध्य होत असतील; पण लोकरंजन आणि उच्च संगीताचा प्रसार नक्कीच होत नाही.

माणिक वर्मा याच्यावर लोकाचे अपार प्रेम. जुन्या पिढीतल्या लोकानी त्याचे गाणे कौतुकाने आणि प्रेमाने ऐकले. त्याचा बिहाग अत्यंत नेटका आणि कर्णमधुर होता. ख्याल गायनाची शिस्त कशी असावी, माडणी कशी विशुद्ध असावी याचा तो आदर्श होता; पण ज्यानी माणिकताईंचे ऐन बहराचे गाणे ऐकले आहे त्याना मात्र या गाण्याने तृप्त केले नाही. त्याची सुकन्या भारती आचरेकर अधूनमधून स्वर लावीत होती आणि संगीत ही घराण्यातून येणारी परपरागत इस्टेट नव्हे

हे पटवून देत होती. तिच्यापेक्षा अर्चना कान्हेरे यांचा स्वर दर्जेदार लागत होता माणिकताईंनी ठुमरी सादर केली. त्या नतर 'दया छाया' हे गंधर्वगीत आणि शेवटी लोकाग्रहास्तव 'त्या चित्त चोरट्याला' हे भावगीत सादर केले.

पंडित जसराज यांचा दरबारी हा या महोत्सवातल्या कंठसगीतातला रसोत्कर्ष साधणारा एकमेव कार्यक्रम. त्याचा त्या नंतरचा बसंतही त्या उंचीला पोहोचू शकला नाही.

जसराजांच्या अत्यंत रंगलेल्या गाण्यानंतर सतार वाजविण्याची हिंमत दाखविली या बद्दल उस्मानखाचे कौतुकच करायला हवे. त्यानी जनसमोहिनी आणि त्यानंतर धुन वाजविली. आनद बदामीकर यानी तबला साथ छान केली.

शेवटी पहाटेच्या सुमाराला वसंतराव देशपांडे गायला बसले. त्यांनी अहिर भैरव, सालग वराळी आणि संन्यस्त खड्ग या नाटकातले पद सादर केले 'तेजो निधी लोहगोल' हे नेहमीचे पद गायले नाहीत हे एक बरे झाले. त्या पदाचा कंटाळा आलाय. वसंतराव छान गायले; पण नेहमीचा रंग नव्हता. कदाचित प्रकृती ठीक नसावी.

दुसऱ्या रात्री खळदकरांच्या सनईनंतर लगेच कुमार गधर्व गायला बसणार म्हणून मडळी लगबगीने आली होती खळदकरानी सनईवर मारू बिहाग वाजवला. त्यानंतर कुमार गंधर्व बसले. त्यांच्या गाण्याने प्रचड निराशा केली. कौंसी कानडा त्यानी आळवला. पहिली पंधरा मिनिटे तर तो बागेश्रीच वाटत होता हा बागेश्रीअगाचा म्हणावा तर चीज नेहेमीचीच 'राजनके' होती. धैवतसुद्धा नेहेमीच्या दर्जाचा नव्हता. पंचम घेण्याची पद्धत विचित्रच होती. (हीच बंडखोरी काय? की प्रतिभेची उत्तुग भरारी?) मध्यलयीतला ख्याल बरा झाला. त्यानतर त्यानी होरी सादर केली ती अगदीच सुमार होती. त्यानंतरचे भजन बरे झाले. पधरा दिवसापूर्वीच्या सगीत शिक्षक परिषदेतही कुमाराचे गाणे असेच सुमार झाले होते.

राजेंद्रसिंग या मुबईच्या कलाकाराने 'स्वरलीन' या निराळ्या वाद्यावर बागेश्री वाजवली. ती म्हणावी तशी जमली नाही. पण त्यानंतची पहाडी मात्र छान झाली.

उल्हास कशाळकर या नव्या दमाच्या तरुणाने कामोद आणि अडाणा हे हल्ली ऐकायला न मिळणारे राग मोठ्या तडफेने सादर केले.

पं. जगदीश प्रसाद याचा मालकंस हा या महोत्सवातला आणखीन एक अविस्मरणीय राग. पतियाला घरण्याची भरपूर छाया त्याच्या गाण्यावर उमटली आहे. त्यानी मालकंस अत्यंत नेटकेपणाने आणि आकर्षकपणे माडला. त्याची सरगम लडिवाळ आणि कल्पक होती. मूर्छनाभेद करून म्हणजे धैवताला षड्ज मानून त्यानी भूप रागाची सरगम दाखविली. (विद्वान संगीत समीक्षकात, जे समोरच्या रागेत बसून ऐकण्यापेक्षा गप्पात रंगले होते, थोडी खळबळ उडाली!) द्रुत ताना तर चकित करणाऱ्या होत्या. त्याची ठुमरी ढंगदार होती. इथेच त्यानी थाबायला हवे होते. पण पुन्हा सयोजकाची अदूरदृष्टी आड आली. यानतर उ. अलि-अकबर याचे सरोद वादन होते त्याचे सरोद लावून होईपर्यंत जगदीश प्रसाद याना गाणे सुरू ठेवायचा आदेश दिला गेला. त्यानी 'याद पिया की' सुरू केले आणि अधीर श्रोत्यांनी टाळ्या वाजवायला सुरुवात केली. जगदीश प्रसादानी गाणे आवरले आणि जरा खट्टू मनाने ते उठले. संयोजकानी आपल्या सोयीसाठी त्या बिचाऱ्याचा बळी दिला.

या महोत्सवातला सर्वोत्कृष्ट कार्यक्रम म्हणजे उस्ताद अलि अकबर याचे सरोद वादन. त्याच्याबरोबर जाकीर हुसेन याची तबला संगत आदर्श होती उस्तादानी नट भैरवात आलाप, जोड आणि झाला वाजवून तीन तालातल्या गती वाजविल्या. त्यानंतर ललित रागातली झपतालातली गत वाजविली आणि सिंध भैरवीत साडेआठ मात्रांच्या तालातली गत वाजविली. अप्रतीम!

तिसऱ्या रात्री बिडवे यांच्या सनई नंतर ख्यातनाम संगीत तज्ञ श्री वामनराव देशपाडे याचा सत्कार करण्यात आला. त्यानतर श्रीकात देशपाडे यानी भीमसेन जोशी याची नक्कल करून दाखविली. प्रसिद्ध सितारिये उ. विलायतखा याचे पुतणे निशातखा याचे सतार वादन हा या महोत्सवातला आणखीन एक अविस्मरणीय कार्यक्रम त्यानी मालकस रागात आलाप जोड आणि झाला वाजविला. तीन तालातल्या गतीबरोबर जाकीर हुसेन याचा तबला सुरू झाला तेव्हा तर बहार आली. मालकस नतर त्यानी सुहा रागातील गत मोठ्या तडफेने पेश केली त्या गतीतल्या त्यांच्या गतीयुक्त जलद ताना दीर्घकाळ स्मरणात रहातील.

प्रभा अत्रे यांच्या गायनाबद्दल खूप अपेक्षा होत्या. पण त्याची रागाची निवड चुकली. कीरवाणी हा कर्नाटकी राग त्यांनी ख्याल गायनासाठी निवडला. एवढ्या मोठ्या जनसमुदायासमोर प्रायोगिक गायन करणे काही बरे नव्हे. जनता कंटाळली. त्यांनी जेव्हा कलावतीतली परिचयाची चीज 'तन मन धन तोपे वारू' गायला सुरुवात केली तेव्हाच त्याचे गाणे सजीव झाले. त्यानंतरचा दादर ठीकच म्हणायचा.

पंधराच दिवसापूर्वी हरिप्रसाद चौरासिया याच जागेत तुफान बासरीवादन करून गेले होते. त्यानंतर रघुनाथ सेठ यांचे बासरीवादन म्हणजे अमृतानंतर ताक. अगदीच बाळबोध आणि नीरस. अभोगी आणि हसध्वनी नतरची धून बरी होती. बाळकृष्ण याची तबलासगत चागली होती. माधव गुडी हे आणखीन एक भीमसेनी नकलाकार. अगविक्षेपापासून ते तानापर्यंत सगळी नक्कलच. त्यांनी ललित भटियारात विलंबित ख्याल, ललितचा द्रुत ख्याल आणि अभंग (भीमसेन स्टाईल) सादर केला. गुरुचे गाणे आणि गुरुची नक्कल यातला फरक या शिष्यगणाला केव्हा कळणार?

संगमेश्वर गुरव यांनी कोमल ऋषभ आसावरी आणि भजन सादर केले. यंदा फिरोझ दस्तुरांचा आवाज नीट लागलाच नाही. तरी त्यानी हजेरी लावलीच. अहिर भैरव आणि जोगिया गायल्यानतर ठरल्याप्रमाणे 'गोपाला'चा आग्रह झाला आणि नेहमीप्रमाणे ते 'गोपाला' गायले. (वटहुकुम काढून गोपालावर बदी आणा — इति एक त्रस्त श्रोता)

शेवटी भीमसेनजींनी कोमल ऋषभ आसावरी आणि भैरवी सादर केली. त्याच्याबद्दल काय लिहिणार? उत्तम गायले; पण अविस्मरणीय नाही. त्यातल्या त्यात आनंद म्हणजे 'तीर्थविठ्ठल' गायले नाहीत.

शेवटी सवाई गधर्वांची भैरवीची रेकॉर्ड लावली सयोजकाचा गलथानपणा इथे संतापजनक होता टेपवर घेतलेली ही रेकॉर्ड अत्यत गचाळपणे ध्वनिमुद्रित केली होती. हीच का गुरुभक्ती? गुरुविषयी थोडासा जरी आदर असता तर अशी गचाळ रेकॉर्ड लावू दिली नसती; पण इथ सगळाच आनद.

हाच आनंद निवेदनाचा. दाजी करंदीकर नावाचे गृहस्थ अत्यंत बाळबोधपणे, शालेय विद्यार्थ्यांसमोर करतात तसे निवेदन करीत होते. या महोत्सवाच्या दर्जाला शोभणारा उत्तम निवेदक या मंडळाला मिळू नये काय?

स्मरणिका म्हणजे जाहिरातीचा गठ्ठाच. खाली टाकून बसायला बरा. या स्मरणिकेत दोन लेख आहेत. (बडल!) रसिकता म्हणजे काय याकर लेख लिहिणारे प्राध्यापक स्वत: मात्र पुढल्या रागेत बसून गायकाचे गाणे न ऐकता आपल्या माजी विद्यार्थ्याला व्याकरणाचा पाठ देत होते. त्यांचा हा पाठ सक्तीने आजूबाजूच्या लोकांना ऐकावा लागला.

अशी ही मैफल! अशी ही स्मृती!

—चतुरंग

## नागपूरवार्ता

# भोसले हटाव मोहीम का व कशासाठी ?

अंतुले यांची मुख्यमंत्रीपदावरून उचलबांगडी करावी या मागणीसाठी वसंतदादा, घोटे आणि काकी (प्रेमलाबाई चव्हाण) हे तीन परस्परविरोधी गट एकत्र आले होते. आता भोसले हटाव मागणीसाठी दादा, घोटे, चव्हाण, अंतुले यांचे परस्परविरोधी गट एकत्र आले आहेत. कॉंग्रेसी राजकारणाचं हे वैशिष्ट्य आहे. सुसंगतीपेक्षा विसगतीच तेथे दिसणार! नेतृत्वबदलाच्या मागणीसाठी सर्व परस्परविरोधी गटात असलेले असंतुष्ट एकत्र येतात. सत्ता कुणाकडे ? हा एकच सवाल इथे असतो. अंतुले हटावची ज्यांची मागणी होती तेच दादा, घोटे आज अंतुलेंशी संगनमत करून भोसले-विरोधी बंडाचे निशाण घेऊन उभे आहेत. फक्त काकींचा गट आता भोसलेंच्या सत्तेत सहभागी असल्याने तो बंडखोरांबरोबर नाही.

पण या दोन चित्रांत फरक आहे. तत्कालिन मुख्यमंत्री श्री. अंतुले यांच्याविरुद्ध वसंतदादा, जाबुवंतराव घोटे आणि काकी यांनी प्रत्यक्ष रिंगणात उतरून दंड थोपटले होते. महाराष्ट्र इंदिरा कॉंग्रेसच्या खासदारांच्या मुंबईत झालेल्या बैठकीच्या निमित्ताने हे नेते एकत्र आले होते. या वेळी बंडखोरांचे नेते प्रत्यक्ष आखाड्यात उतरलेले नाहीत.अंतुलेंचा तेवढा अपवाद. बाकी हालचाल आमदारांच्या पातळीवर उघडपणे चालू आहे आणि इथेच खरी गोम आहे. त्या वेळच्या बंडाला इंदिरा गांधी यांचा हिरवा कंदील होता. या वेळी मुख्यमंत्री भोसलेंना बाईंचं संरक्षण आहे. कारण हे बंड भोसलेंना हटविण्यापुरतं मर्यादित नाही आणि म्हणूनच इंदिरा कॉंग्रेस विधिमंडळ-पक्षातून सहा बंडखोरांना निलंबित करण्याच्या मुख्यमंत्र्यांच्या कृतीवर पक्षश्रेष्ठींनी त्वरेने शिक्कामोर्तब केलं.

### बंडाची दिशा वेगळी

गेल्या दीडदोन महिन्यांतील घडामोडींवर दृष्टिक्षेप टाकला तर या बंडाची दिशा समजू शकेल. त्याआधीची पार्श्वभूमी म्हणजे रामराव आदिक यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बंडाच्या प्रयत्नानंतर झालेला राज्यमंत्रिमंडळाचा विस्तार. ११ ऑक्टोबरला झालेल्या या मंत्रिमंडळविस्तारात रामराव आदिक आणि शालिनीताई पाटील सामील झाल्याने अंतुलेनिष्ठ आमदारांची अस्वस्थता अधिकच वाढली. मंत्रिमंडळ विस्ताराने नाराज झालेले इतर गटही अंतुलेबरोबर येण्याची प्रक्रिया येथे सुरू झाली. या मंत्रिमंडळविस्तारात चव्हाण, घोटे गटांना तर दूरच ठेवण्यात आले होते, तर दुसऱ्या बाजूला शुगर लॉबी-विरुद्ध मुख्यमंत्री जाहीर वक्तव्यें करीत होते.

ताज्या बंडखोरीसाठी पुढाकार घेतला अंतुलेनिष्ठांनीच. ३१ ऑक्टोबरला दीर्घकाळ चाललेल्या गिरणीकामगारांच्या संपाकडे पक्षश्रेष्ठींचे लक्ष वेधण्यासाठी आमदार भाऊराव पाटील, प्रेमानंद आवळे, अशोक पाटील यांच्या पुढाकाराने इंदिरा कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांचा मेळावा त्यादिवशी भरविण्यात आला होता. अंतुलेनिष्ठांच्या या मेळाव्यास अध्यक्ष म्हणून जाबुवंतराव घोटे उपस्थित होते. गिरणीसंपाच्या निमित्ताने भोसलेसरकारवर मेळाव्यात सडकून टीका करण्यात आली. अगदी शिवीगाळीच्या भाषेत. इंदिरा कॉंग्रेसमधील वाद हल्ली याच भाषेत जाहीरपणे होतात. सरकारविरोधी लाक्षणिक उपोषण करण्याचं त्याच दिवशी जाहीर झालं. दोन नोव्हेंबरला हुतात्मा-चौकात भाऊराव पाटील, प्रेमानंद आवळे आदींनी उपोषण केलं. परिणामी पक्षश्रेष्ठींनी शिस्तभंगाच्या नोटिशीचा बडगा उचलला आमदार अशोक पाटील माफी मागून मोकळे झाले; परंतु त्यापुढे पक्षश्रेष्ठींकडून फारशी हालचाल न झाल्याने बंडखोरांनी उचल खाल्ली.

या घटनेची शाई वाळते न वाळते तोच १३ नोव्हेंबरला सांगलीला वसंतदादा पाटील यांनी 'गरज पडली तर योग्य वेळी मी महाराष्ट्राचे नेतृत्व करीन !' अशी घोषणा केली. दादांचा ६२ वा वाढदिवस साजरा करण्याच्या निमित्ताने झालेल्या या प्रचंड मेळाव्यास अर्धा डझन खासदार आणि दोन डझन आमदार उपस्थित होते. भोसलेंच्या मंत्रिमंडळात असलेल्या दादांच्या पत्नी शालिनीताई पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या या मेळाव्यात भोसले सरकारवर सर्वच वक्त्यांनी जोरदार टीका केली आणि दादांनी महाराष्ट्राचे नेतृत्व करावे अशी एकमुखी मागणी केली.

आंध्र, कर्नाटक आणि त्रिपुरा या राज्यांतील निवडणुका तोंडावर असल्याने महाराष्ट्रातील बंडखोरांकडे कानाडोळा करण्याचे केंद्रीय नेतृत्वाचे धोरण होते; परंतु त्याचबरोबर शुगर लॉबीचा वरचष्मा वाढू नये याबाबत श्रेष्ठी दक्षताही घेत होते. वीस नोव्हेंबरला प्रवरानगर (जि.अहमदनगर) येथील एका जाहीर सभेत बोलताना मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांनी साखरसम्राटांविरुद्ध कडक कारवाई करण्याचा दिलेला इशारा या दृष्टीने सूचक होता. नव्याने सत्तेवर आल्यानंतर इंदिरा गांधी यांनी जुन्या मक्तेदाऱ्या मोडण्याचं धोरण अवलंबलं आहे.

महाराष्ट्रातील मराठा लॉबी ठेचण्यासाठीच अंतुलेंना बाईंनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी बसवलं होतं. आपल्या कारकीर्दीत अंतुलेंनी ते काम बरंच पूर्णही केलं. त्या वेळी त्यांनी गुलाबराव पाटील यांना पक्षाध्यक्षपदी आणून त्यासाठी त्यांचा वापर केला. आता बाबासाहेब भोसले या मराठा मुख्यमंत्र्याचाच उपयोग करून इंदिराबाईंनी आपले धोरण कायम ठेवले आहे. मराठा मुख्यमंत्र्याविरुद्धच मराठा लॉबी का याचं उत्तर येथे सापडेल.

वीस नोव्हेंबरनंतर घटना वेगाने घडत आल्या. शालिनीताईंच्या

उपस्थितीत सांगलीच्या मेळाव्यात भोसलेसरकारवर झालेल्या टीके-बाबत खुलासा करण्यासाठी ताईंनी २३ नोव्हेंबरला इंदिराबाईंची दिल्लीत भेट घेतली. त्याच दिवशी महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना महासंघाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत महाराष्ट्राचे नेतृत्व बदलण्याच्या मोहिमेत इंदिरा काँग्रेसचे सरचिटणीस वसंतदादा पाटील यांनी पुढाकार घ्यावा अशी एकमुखी मागणी करण्यात आली. दरम्यानच्या काळात दादा–चव्हाणांचे सख्य झाल्याने त्यांच्या गटातील असंतुष्ट आमदारांच्या वाटाघाटी सुरू झाल्या होत्या, तर अंतुलेनिष्ठ सर्वच गटाच्या असंतुष्ट आमदारांना बरोबर घेऊन समांतर इंदिरा काँग्रेस स्थापण्याची चाचपणी करीत होते.

राज्य इंदिरा काँग्रेसमधली बेदिली वाढत असतानाच प्रदेश पक्षाचे नेतृत्वही भोसलेंच्या विरोधातच कारवाया करीत आहे. उपाध्यक्ष खासदार बाळासाहेब पवार तर बंडखोरांचे नेतृत्वच करीत आहेत. राज्यमंत्रिमंडळाच्या विस्ताराच्या वेळी राज्यमंत्रिपद देऊन एकप्रकारे अवमानित झालेले पक्षाध्यक्ष गुलाबराव पाटीलही गप्प नाहीत. अंतुलेंच्याच सल्ल्याने त्यांनी त्या वेळी राज्यमंत्रीपद नाकारले होते. नागपूर इम्प्रुव्हमेन्ट ट्रस्टकडून निवासी क्षेत्रावर करआकारणी आणि अन्य स्थानिक प्रश्नावर राज्यसरकारविरुद्ध आंदोलन उभारण्याची तयारी भोसले विरोधी गटाने चालवली आहे. नागपूर शहर इंदिरा काँग्रेसला पाठविलेल्या पत्रात पक्षाध्यक्ष गुलाबराव पाटील म्हणतात, 'पक्षसंघटनेकडून करण्यात आलेल्या विनंत्यांकडे मंत्र्यांचे लक्ष गेलेले नाही ही दुर्दैवाची बाब आहे. पक्षकार्यकर्त्यांनी हा जनतेचा प्रश्न सोडविण्यासाठी जाहीर निदर्शनाचा मार्ग स्वीकारावा.'

**आपल्याच पक्षाच्या सरकारविरुद्ध जाहीर संघर्षाची पक्षाध्यक्षाने दिलेली चिथावणी पक्षश्रेष्ठींच्या नजरेतून सुटणे शक्य नाही. बेशिस्त खपवून घेतली जाणार नाही किंवा त्याबाबत तडजोड केली जाणार नाही हा पक्षश्रेष्ठींनी दिलेला इशारा प्रदेशाध्यक्षांनाही भोवणार आहे.**

राज्य इंदिरा काँग्रेसमधील या बेदिलीची उग्रता वाढली सहा व सात डिसेंबरला बंडखोरांच्या मुंबईत झालेल्या बैठकींनी. दादा, चव्हाण, धोटे आणि अंतुले या चारही गटाचे आमदार या बैठकांना उपस्थित होते. प्रत्यक्ष उपस्थिती ४०–५० हून अधिक नसली तरी नागपूरला जाण्यापूर्वी मुंबईतच नेतृत्वबदलाच्या मागणीपत्रावर ६५ ते ७० सह्या झाल्या होत्या. बंडखोर गटात फूट पाडण्याचा भोसले गटाचा प्रयत्न मात्र असफलच ठरला. काही आमदारांना आमिषे दाखविण्यात आली; परंतु त्याचा फारसा परिणाम झाला नाही. पक्षातून निलंबित करण्यात आलेल्या एका बंडखोर स्त्री आमदाराला सात डिसेंबरला दुपारी झालेल्या भेटीत एका मंत्र्यांनी नांदेडमध्ये सूतगिरणी काढण्याचे आश्वासन दिले आणि त्या बदल्यात श्रीमतीजींकडून बंडखोरांच्या बैठकीविरुद्ध सूर काढणारे पत्रक लिहून घेतले. तेच पत्रक श्री. काळे आणि माहिती राज्यमंत्री टी. जी. देशमुख यांनी पत्रकारांना दिले; परंतु त्याच सायंकाळी सदरहू श्रीमतीजी बंडखोरांच्या बैठकीला उपस्थितही राहिल्या होत्या. **नांदेडमधील एका वृत्तपत्रास भोसले सरकारने बंद केलेल्या सरकारी जाहिराती पुन्हा सुरू करण्याचे आश्वासनही मंत्र्यांनी दिल्याचे समजते.**

यावेळी बंडखोरानी काही गोष्टी निश्चित केल्या होत्या. एक, नेतृत्वबदलाच्या मागणीबाबत कोणतीही तडजोड नाही. आदिक, तिडके, शालिनीताई यांना शक्य तितके बदनाम करणे. अधिवेशनपूर्व आमदारांच्या बैठकीत आणि अधिवेशनातही भोसलेंवर टीकेचे हल्ले चढवणे व शक्य तिथे पेचात पकडणे.

नागपूरला रवाना होण्यापूर्वी एक दिवस आधी आमदार भाऊराव पाटील यांची भेट घेऊन त्यांना नागपूरला काय करणार असे मी विचारले. 'बंडखोरांची भूमिका अत्यंत उग्र स्वरूपाची असेल. काय घडेल ते आता सांगता येणार नाही,' असे ते म्हणाले. अधिवेशनानंतर योग्य तो बदल करू असे आश्वासन पक्षश्रेष्ठींनी दिले तरी आम्ही थांबणार नाही. कारण मागचा अनुभव लक्षात घेता अशा आश्वासनावर आम्ही विश्वास ठेवणार नाही असंही श्री. पाटील यांनी स्पष्टपणे सांगितलं.

बंडखोरांपुढे खरा प्रश्न आहे तो त्यांच्या नेतृत्वाचा. **अंतुले आज जरी पुढे आले तरी दोनशे आमदार त्यांच्यापाठी येतील. मग पक्षशिस्तीला भीक न घालता आम्ही सरकार बनवू असे काही बंडखोर आमदार खाजगीत सांगतात. दादा–चव्हाण कितीही सांगोत त्यांचा आमच्या बंडखोरीला पूर्ण आशीर्वाद असल्याचंही काही खाजगीत बोलून दाखवलं.**

बंडखोर विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत गोंधळ घालणार याचा सुगावा मुख्यमंत्री भोसले यांना तपशिलासह कळला होता. त्यामुळे नागपूरला त्या बैठकीच्या वेळी साध्या वेशातील पोलिसांचा कडक पहारा ठेवण्यात आला होता. **मुख्यमंत्र्यांच्या श्रीमुखातही दोन लगावण्याची तयारी काही बंडखोरांनी केली होती असे सांगण्यात येते.**



## आव्हान दिल्लीला

या वेळचं बंड हे भोसलेंपुरतं खचितच मर्यादित नव्हतं. यावेळच्या बंडाचं आव्हान होतं दिल्लीला. त्यामुळे पक्षश्रेष्ठींनी वेगाने पावलं उचलून सहा बंडखोर आमदारांना निलंबित केलं. तीन राज्यांच्या निवडणुका ऐनतोंडावर असल्याने बंडाला त्वरित वेसण घालणं महत्त्वाचं होतं. इंदिरा काँग्रेसमध्ये आता खरा यादवीला प्रारंभ झालाय. दिल्ली आणि प्रदेश सत्तांमधील हा शीत संघर्ष आता अनेक राज्यात उफाळू लागलाय.

**महाराष्ट्रातील मराठेशाहीचा बीमोड करण्याचे इंदिराबाईंनी निश्चित केलंय. त्यामुळे एकमेकांचे दावेदार बनलेले साखरकार-खान्यांचे वतनदार आता एकत्र येऊ लागते आहेत. 'आम्ही उगाच भांडलो, त्यामुळे महाराष्ट्राचे नुकसान झाले,' असे यशवंतराव आणि वसंतदादा म्हणू लागलेत.**

अर्थआयोगाचं अध्यक्षपद देऊन इंदिराबाईंनी यशवंतरावांना पेन्श-नीत काढलंय तर वसंतदादांना सरचिटणीस म्हणून दिल्लीत बसवून गणपती केलंय. महाराष्ट्रातील सत्तेवर पुन्हा पकड बसविण्याच्या चाललेल्या खटपटीबाबतच्या एका बातमीचा येथे उल्लेख केला पाहिजे. इंदिरा काँग्रेसच्या महाराष्ट्रातील संघटनात्मक निवडणुकी-साठी पक्षश्रेष्ठींनी श्रीमती विमला वर्मा यांची निर्वाचन अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांनी श्रेष्ठींना दिलेल्या अहवालात पक्षसदस्यत्वाचे उपलब्ध असलेले फॉर्म्स साखरसम्राटांनी हडप केल्याच्या तक्रारी असल्याचे म्हटले आहे आणि अन्य कारणांमुळे संघ-टनात्मक निवडणुका पुढे ढकलण्याचा पक्षश्रेष्ठींचा विचार असल्याचे बातमीत म्हटले आहे. राज्यपक्षातील संघर्षाचं चित्र स्पष्ट करण्यास ही बातमी पुरेशी बोलकी आहे.

**राजीव गांधी यांच्यासाठी चाललेल्या पूर्वतयारीचा संदर्भही इथे आहे. राजीव गांधी यांना पक्षाध्यक्षपद देण्यापूर्वी त्यांचं नवं केडर उभं करणं हे इंदिराबाईंच्या दृष्टीनं महत्त्वाचं आहे. त्यामुळे संजय-वादयांचं या ना त्या प्रकारे खच्चीकरण करण्याची प्रक्रिया पक्षात सुरू झाली आहे. परिणामी अंतुले निष्ठांमध्ये अस्वस्थता वाढणे स्वाभाविक आहे.**


सहा बंडखोरांची हकालपट्टी करताना पक्षश्रेष्ठींनी दिलेला इशारा हा सर्वांनाच आहे. घडलेल्या नाट्याचा दिग्दर्शक पुढे येताच त्यावर ही कडक कारवाई करण्यात येईल असं त्यात म्हटलं आहे. हा रोख अंतुलेंवर असला तरी दिग्दर्शक एकच नाही हे स्पष्ट आहे.

इंदिरा गांधी नामक महासत्तेविरुद्ध यशवंतराव, वसंतदादा, घोटे आणि अंतुले या महाराष्ट्रातील शक्तींचा सुरू झालेला हा शीतसंघर्ष कोणतं स्वरूप धारण करणार हे ठरायला आणखी थोडा काळ जावा लागेल एकाच दगडात दोन–तीन पक्षी मारण्याची नेहमीची खेळी इंदिराबाईंनी खेळायचं ठरवलंय.


तातडीने काही मोठं घडेल असं नाही; परंतु अशा स्थितीत भोसले-सरकार फार काळ टिकणंही कठीण आहे. त्यामुळे विधानसभेच्या मध्यावधी निवडणुका अपरिहार्य ठरतात. या जानेवारीतच ते चित्र स्पष्ट होईल.

प्रादेशिक स्थापनेचा विचारही या काळात कदाचित बळावेल; पण तो निवडणूक जाहीर झाल्यानंतरच जाहीर होईल.

—कपिल पाटील

**होणार होणार म्हणून गाजत-वाजत असलेले एशियाड अखेर संपले! त्याचा धुरळा खाली बसून आता महिना होत आला. या एशियाडच्या निमित्ताने आपण खूप काही चांगल्या गोष्टी केल्या, तशाच गमावल्याही. वर्षभराच्या काळात दिल्लीत ज्या अनेक गोष्टी घडत गेल्या त्याचे हे काही तुकडे. . . .**



# सात आंधळे आणि एक अप्पू


## डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर


## १

लोकमान्य टिळकांचे एक झकास वाक्य आहे : 'पैशाची भांग घेतली की, कल्पनाच कल्पना सुचतात!' पण हे केवळ तसेही नाही. तापात, गुंगीत असलेल्या माणसासमोर घटनांचे असंबद्ध संबंध उलगडत जातात. खरे पाहता काहीच समजत नसते; पण समजते आहे असा भास होतो. जी. ए. कुलकर्णींची कथा मज्जातंतूंचा गुंता करीत पुढे सरकत जाते. नक्की काय ते समजत नसताना मर्ढेकरांची कविता पुन्हा पुन्हा वाचावीशी वाटते आणि थोडे काही समजले आहे असे वाटत असतानाच समजलेले अधिक अधिक अस्पष्ट आणि गूढ वाटू लागते. तरीही पुन्हा एक सूर मारून आपण त्या कवितेत शिरतोच. उगाच वेळेचा अपव्यय की, कळत-नकळत भोगलेले आयुष्यातील काही फार मोलाचे क्षण. काही सुद्धा तसे समजत नाही. संवेदनाक्षम माणसाचे विसरा, तुमच्या–माझ्यासारख्या बधिर, संसारी माणसानेही अस्वस्थ व्हावे असे काही झपाट्याने गेले एक वर्ष माझ्याभोवती घडतंय. उद्यापासून त्याचा कळसाध्याय सुरू होणारे. – गेल्या वर्षभरातले सारे असंबद्ध तुकडे मनात कसे गर्दी करून उभे आहेत!

## २

प्रथम आशियाड हा शब्द सारेच जण तसा सहजपणे घेत होते. नक्की काय होणार आहे हे तसे कोणाच्याच लक्षात आलेले नव्हते. एकेकाचे नशीब असते ! आशियाडला राजनारायण आणि चरणसिंग यांनी विरोध केला होता आणि दोघांनी विरोध केलेली कोणतीही गोष्ट चांगलीच असणार असेही वाटत होते ! हळूहळू नकळत घटनांनी वेग घेतला. भोवळ यावी असा घटनांनी वेग घेतला. पुरात सापडल्यावर आपला स्वत:वर ताबा असूनही तो सुटलेला असतो. पाणी नेईल तसे थोडे वाहात जावे लागते. मिळतील त्या गटांगळ्या आणि डुबक्या खाव्या लागतात. आपण पुरात पोहलो वा पुरात पोहणारे लोक पाहिले एवढेच, म्हटले तर मोलाचे समाधान नंतर आपल्याबरोबर असते. आशियाड या शब्दाभोवती गेले वर्षभर नक्की असेच काही तरी घडते आहे. राजीवच्या मर्जीतून उतरलेले म्हणून जगमोहन यांची दूर गोव्याला बदली झाली. आशियाडच्या अखेरीस तेवढ्याच तातडीने या कार्यक्षम माणसाला पुन्हा दिल्लीचे राज्यपाल बनविले गेले. नको त्या ठिकाणी प्रचंड पूल उभे राहिले आणि पाहिजे तेथील हलवले गेले. विश्वास बसणार नाही अशा वेगाने कामे झाली. आग्रा येथील बुलंद दरवाजाने अवाक होऊन पहात बसावे अशा वास्तू उभारल्या गेल्या. अक्षरश: शेकडो कोटी रुपये पाण्यासारखे खर्च झाले! ठेकेदार एका रात्रीत कोट्याधीश बनले. या सर्वांची काही जरुरी होती का ? या सर्वांनी आपण नक्की काय मिळवले ? — खरे पाहता हे प्रश्नसुद्धा तसे मनात येत नाहीत. आपण नुसते भयचकित होऊन पहात उभे असतो; पण तुमची—माझी गोष्ट सोडा. मला अजिबात न आवडूनही मी ज्यांना अतिशय मानतो त्या इंदिराजी पण आयुष्यात प्रथमच बावचळलेल्या दिसतात. काल त्यांनी खेळनगरीत भारतीय खेळाडूंना संबोधित केले. त्या म्हणाल्या,


'आम्ही राज्यावर आलो त्या वेळी खूप काही निर्णय आधीच घेऊन ठेवलेले होते. डावपेचांच्या दृष्टीने त्यापासून परत फिरणे चुकीचे होते. आशियाड भरवणे चुकीचे आहे असे वाटणाऱ्यांनी आधीपासूनच काही ठाम निर्णय घ्यावयास हवे होते ... पण आशियाड भरवणे पण तसे चूक नाही. भारतासारख्या मोठ्या देशाला आपणही हे करू शकतो, आम्हीही कोणी आहोत (हम भी कुछ है) हे जगाला दाखवणे फार जरुरीचे आहे ... मला खरी भीती एकच वाटते आहे. तुम्ही खेळाडू तिथे काही करून दाखविणार आहात की नाही ? बाकी देशांच्यासमोर क्रीडास्पर्धेत तुम्ही आपली अब्रू तर घालवणार नाही? नाक तो नही कटवाअेंगे ? हसू तर नाही करून घेणार ?'

बाई वाटेल ते शब्दप्रयोग वापरत होत्या. बाईंना नक्की काय म्हणावयाचे आहे ते मला समजले नाही. बाईंनाही बहुधा समजलेले नसावे !

## ३

आपण कोणाच्या प्रेमात पडलो तर ते मोकळेपणे मान्य करावे. माणसाच्या, संस्थेच्या, कवितेच्या, कोणाच्याही. मी दिल्ली शहराच्या तसा प्रेमात पडलोय. अनेक शहरात स्वत:चे तंत्र उभारत आणि गुंडाळत मी मनसोक्त भटकलोय. या शहरात नक्की नवे असे काय आहे? नव्या दिल्लीतील हिरवळींनी वेढलेले प्रशस्त रस्ते. त्यावरून बागडणारी तुरळक वाहतूक. बघणाऱ्याच्या काळजाचा ठोका चुकावा अशी जुन्या दिल्लीतील माणसांची आणि वाहनांची गर्दी. सायकली, स्कुटर्स, सायकलरिक्शा, ऑटोरिक्शा, बैलगाडी, हातगाडी, घोडागाडी आणि इंपोर्टेड गाड्या, साऱ्या एकमेकांशी स्पर्धा करत या गर्दीत उभ्या आहेत. भाजून काढणारा उन्हाळा आणि गोठवणारी थंडी आहे. आपण अनेक शतके या साऱ्या देशावर सहजपणे आणि मन मानेल तसं राज्य केलंय याची जाण येथील प्रत्येक माणसात कशाला, प्रत्येक वास्तूत आहे ! परोठेवाल्यांच्या गल्लीतील राजनारायणने दहा पिढ्यात फक्त खानदानी माणसांसाठी परोठे बनविलेत. जामा मसजिदीजवळच्या करीमच्या हॉटेलात बेहतरीन कबाब मिळतात. त्याच्या खापरपणजाच्या पणजांनी खुद्द बाबराला कबाब खिलवलेत ! — दिल्लीतील प्रत्येक पिढीजात माणसाचा आवाज डेलकार्नेजीने त्याची शिकवणी ठेवावी इतका गोड आणि आदबशीर आहे. प्रत्येकाची नजर तेवढीच बेरकी आणि मतलबी आहे. यातील मला नक्की काय आवडले ? पण आपण कोणाच्या प्रेमात का पडलो याचा माणसाने कधी पंचनामा करू नये !

माझी ही आवडती दिल्ली माझ्यासमोर झपाट्याने बदलते आहे. दिल्ली स्वच्छ, सुंदर आणि प्रशस्त करावयाचा विडा उचलला गेला आहे. या सर्वांची खरी जरुरी आहे ती जुन्या दिल्लीला; पण तिला कोणी हातही लावत नाही ! नवी दिल्ली आधीच खरे पाहता या सर्व बिरुदावलींनी सुशोभित आहे; पण नवी दिल्लीच अधिक स्वच्छ आणि प्रशस्त करावयाचा प्रयत्न आहे. आश्रम, राजघाट, मुळचंद



हॉस्पिटल, तीन-चार ठिकाणी रिंग-रोड आणखी रुंद केला जातोय. रस्त्यावरील दिवे बदलताहेत. रंगसंगती, साफसफाई सुरू आहे. बागा आणि हिरवळी उठवल्या जाताहेत; पण छाती दडपून जावी अशी गोष्ट म्हणजे अनेक प्रचंड पूल (fly over) उठवले जाताहेत. हे पूल कसले, हे तर चक्क सेतू आहेत! नव्या दिल्लीची वाहतूक या बांधकामामुळे पार विस्कळित होऊन गेलीय. तिला पण जुन्या दिल्लीची कळा आली आहे. सुंदर दिल्लीसाठी आणि आशियाडसाठी हे सहन करा म्हणून जागोजाग फलक लावलेत. कोणी तरी टाइम्समध्ये मिस्किल पत्र लिहितो. आशियाडचे ब्रीदवाक्य 'Friendship fraternity forever' असे आहे, त्याऐवजी ते 'fraindship fraternity flyover' असे असावयास हवे होते! — या सेतूंनी लोकाना जाम वैताग आणलाय. त्यांची नक्की काय जरुरी आहे ते कोणालाच समजत नाही. दिल्ली हे बाळसे धरते आहे की, सूज चढते आहे असा प्रश्न पडतो. कारण हे पूल नक्की जेथे नको तेथे उठताहेत! फार पूर्वी लक्ष्मणचे एक अफलातून व्यंगचित्र आले होते. एका नदीवरील पुलाचे उद्घाटन होते. इंजिनिअर, मंत्र्यानी पैसे दिले म्हणून त्यांचे कौतुक करत होता. मंत्री इतका चांगला पूल बांधला म्हणून इंजिनिअरचे आभार मानत होता. इतक्यात मध्येच एक खेडूत हस्तक्षेप करत म्हणतो, 'साहेब, या पुलात काही तांत्रिक चूक झाली आहे. नदी पलीकडच्या बाजूला आहे!' इन्द्रप्रस्थजवळचा सेतू, मुळचंदजवळचा सेतू, जनक सेतू यांचे प्रयोजन लोकाना समजत नाही. इन्द्रप्रस्थजवळ बहुतेक सारी वाहतूक उजव्या बाजूला वळून बाराखांबाकडे जाते. सेतू मात्र त्या साऱ्या वाहतुकीचा आणखीनच खोळंबा करून सरळ पुढे निघून जातो. प्रत्येक ठिकाणी न चुकता असे होते. दिल्लीतील काही फार मोठ्या उद्योगपतींना गाझियाबाद, फरिदाबाद वगैरे ठिकाणच्या आपल्या कारखान्याला कोठेही न थांबता सरळ वीस मिनिटात पोचता यावे म्हणून हे सेतू उभारले जाताहेत. याचा आशियाडशी काडीमात्र संबंध नाही; म्हणून कुजबूज सुरू होते. — या कुजबुजीत अडकून पडलेले बहुसंख्य लोक जे पाहावयाचे ते नेमके पहात नाहीत. हे सेतू ज्यांच्यापुढे 'किस झाडकी पत्ती' ठरावेत अशा प्रचंड वास्तू सध्या दिल्लीत उठताहेत! दिल्लीतील जामा मसजीद, कुतुबमिनार, लाल किल्ला या गोष्टी कदाचित् या वास्तूपुढे खुज्या ठरतील. परकीय वास्तुशास्त्रज्ञ ज्याच्यावर विश्वासही ठेवावयास तयार नाहीत अशा प्रचंड गतीने तेथे काम सुरू आहे! — दिवसरात्र तेथे मुंग्यासारखी माणसे काम करताहेत आणि मरताहेत!

---

## ४

---

आमच्यासमोर जे घडते आहे ते अस्वस्थ करणारे, अंगावर शहारे आणणारे आहे. हा अमानुष असंस्कृतपणा आहे. मध्ययुगात गुलामाची पद्धत होती त्यांचे व्यापार चालत. इंग्रजी सिनेमात रोम वगैरेमधे चाबकाच्या फटक्याखाली मजुराच्या जथ्याकडून काम करवून घेतलेले आपण पाहतो. वेठबिगारपद्धती वगैरे सुद्धा आपल्या परिचयाची आहे; पण समोर जे घडते आहे ते त्यापेक्षा अनेक पटीनी भयंकर आहे! लाल किल्ल्याचे वा कुतुबमिनारचे दगड रचताना पण माणसाना असे वापरले नसेल! सारे कामगार-कायदे, कामगार-पुढारी, कामगारमंत्री वगैरे अस्तित्वात असताना विसाव्या शतकाच्या अखेरीस हे भारताच्या राजधानीत घडतय!


काही लोकाना रमीचे वेड असते. आम्हा काही मित्रांना टिवल्याबावल्या करत भटकावयाचे वेड आहे. बांधकाम सुरू असलेल्या प्रत्येक ठिकाणी जे काही घडतंय ते पाहून आम्ही मोडून पडतोय, चक्रावून जातोय. राजघाटच्या थोडे पुढे, पॉवरहौसच्या समोर इंद्रप्रस्थ स्टेडिअम उभा राहतोय. राजघाटाला अक्षरशः बगलेत घालून हा स्टेडिअम उभा राहात आहे. याचा एकूण आकार आणि प्रकार राक्षसांच्या गोष्टीतही मावण्याच्या पुढचा आहे एकशेदहा एकर जमिनीवर हा सारा पसारा उभा राहील. जमिनीची उंची यमुनेच्या पुराच्या पातळीवर नेण्यासाठी दहा लाख घनमीटर माती वापरली जाते आहे. दीडशे इंजिनिअर्स, पन्नासहून अधिक वास्तुशास्त्रज्ञ आणि पन्नासाहून अधिक बांधकाम करणाऱ्या कंपन्या या एका प्रकल्पात गुंतल्या आहेत! युद्धपातळीवर काम सुरू आहे. एका रात्री, खूप मातीची जरुरी होती. पाच हजार ट्रक्स एका रात्रीत जमा करून वापरले गेले जे येथे घडतंय तेच खेळग्रामात घडतंय. दोनशे इंजिनिअर्स इथे गुतलेत! फक्त खेळग्रामासाठी ज्या विटा वापरल्या जाताहेत त्या एका रांगेत उभ्या केल्या तर नव्या दिल्लीपासून कॅनडापर्यंत लांबीची एक रांग बनेल! जे पोलाद वापरले जाते आहे त्यातून यमुनेवर आरपार असे पूल तीनदा बांधून होतील. वापरले जाणारे सिमेंट सारा कॅनॉटप्लेस—विभाग सिमेंटखाली बुडवून काढू शकेल. जवाहरलाल नेहरू स्टेडिअमची भव्यता तर याहूनही अधिक आहे!

अगदी अद्ययावत यंत्रसामुग्री वापरलीय तरी इंद्रप्रस्थ स्टेडिअम बांधावयास सहा वर्षे आणि खेळग्राम बांधावयास पाच वर्षे लागतील म्हणून जर्मन आणि अमेरिकन तज्ज्ञांनी सांगितले होते. आपण हे दोन्ही स्टेडिअम फक्त दोन वर्षांत बांधून दाखवणार आहोत आणि प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी आल्यावर हे तुम्ही तसे सहज कराल म्हणून अमेरिकन आणि जर्मन तंत्रज्ञ मोकळेपणे मान्य करताहेत! मनुष्यबळ म्हणजे काय आणि ते कसे वापरले जाते हे येथे समजते फक्त इंद्रप्रस्थ स्टेडिअम बांधावयास बारा ते पधरा हजार कामगार वापरले जाताहेत. भाकरा धरण बांधण्यासाठी पण आपण एवढे कामगार उभे केले नव्हते. खेळग्रामावर दहा हजार कामगार खपताहेत! या देशात दारिद्र्य, उपासमार आणि बेरोजगार केवढ्या थराला पोचला आहे याचे हे एक जिते—जागते चित्र आहे. साऱ्या हिंदुस्थानातून ट्रक्स, रेल्वे मिळेल त्या वाहनानी ठेकेदारानी हे अर्धपोटी, अर्धनग्न, अस्थिपंजर लोक उभे केलेत! स्त्री, पुरुष, म्हातारे, तरुण, कोवळी पोरे सारे या फौजेत जमा आहेत. वेळेचे, सुट्टीचे कसलेही बंधन येथे नाही. दिवसरात्र यांना पिळून काढणारे कामाचे चक्र फिरतंय. जवळच त्याना फाटके तंबू दिलेत. दिल्लीच्या थंडीत आणि उन्हाळ्यात; लज्ज

---

**सारे रोम जळत असताना निरो सारंगी वाजवत होता; पण त्याने किमान इतरांना तरी त्रास दिला नाही. रशियात दुष्काळ असताना स्टॅलिनने भुयारी रेल्वे उभारल्या; पण कामगारांना किमान सोयी पुरविल्या. येथे मात्र काही ठेकेदार आणि सरकारी अधिकारी लक्षाधीश व्हावेत म्हणून चक्क माणसे मारली जाताहेत.**

---



किमत फक्त साडेतीन हजार रुपये !

**शेवटी ल्व्हाळीतला नामदेव सटकर आणि बिढार मधील चांगदेव पाटील हे आमचे प्रतिनिधी आहेत. इतिहास या वास्तूंना, त्या बांधणाऱ्यांना आणि त्या वेळी षंढाप्रमाणे हे सारे पाहणाऱ्यांना नक्कीच क्षमा करणार नाही !**

सुद्धा पुरी झाकू न शकणाऱ्या आपल्या कपड्यात; मद्रास, राजस्थान, केरळ, महाराष्ट्र येथील दुष्काळग्रस्त विभागातून आलेले मजूर खपताहेत. त्यांच्या तंबूंना लागून राजरोसपणे हातभट्टीची दुकाने चालविली जाताहेत. या कामगारांच्या मुलांच्यासाठी म्हणून एक शाळा चालवण्याचे नाटक होते आहे. मुले कामावर जातात आणि शाळेत येत नाहीत म्हणून शाळेला भले मोठे कुलूप कायमचे लावलेले आहे. ज्यांना कधीच पाणी येत नाही असे नळ आहेत. गुरांच्यासाठी असतात तसे शेवाळयांनी भरलेले हौद या लोकांना पाणी पुरवताहेत. संडास वगैरेची सोय कोणत्याच बांधकामावर नसते. पंधरा हजार कामगार एकाच ठिकाणी असलेल्या ठिकाणी हे शक्य पण नसेल! स्त्री, पुरुष, मुले 'लोटा'परेडी-साठी एका रांगेत बसताहेत. ओकारी यावी अशी दुर्गंधी पसरलीये. माशा घोंगावताहेत, त्याला लागून लांबलचक खानावळी आहेत आणि आधाशासारखे कामगार चहा, पकोडे, भात, रोटया ओरपताहेत !

माओने पण आपले मनुष्यबळ वापरून, रशियन तंत्रज्ञांना अशक्य वाटणाऱ्या गोष्टी झपाटयाने करून दाखवल्या होत्या; त्याने पण धरणे आणि कालवे बांधले. आपणही हे मनुष्यबळ आणि साधनसामुग्री वापरून राजस्थानचा कालवा पुरा करू शकलो असतो. हे आपण का आणि कशासाठी करतोय तेच आमच्या अजून लक्षात येत नाही ! सारे रोम जळत असताना निरो सारंगी वाजवत होता; पण त्याने किमान इतरांना तरी त्रास दिला नाही. रशियात दुष्काळ असताना स्टॅलिनने भुयारी रेल्वे उभारल्या; पण कामगारांना किमान सोयी पुरवल्या. येथे मात्र काही ठेकेदार आणि सरकारी अधिकारी एका रात्रीत लक्षाधीश व्हावेत म्हणून माणसे चक्क मारली जाताहेत! सारे बांधकाम एवढे धोकादायक आहे आणि ते एवढ्या झपाटयाने करावयाचे आहे की, काही माणसे मरणे अपरिहार्य आहे आणि जगभर साऱ्या मोठ्या बांधकामात असेच होते म्हणून दिल्ली विकास विभागाचे उपसंचालक व्ही. एस. अलवाडी यांनी जाहीरपणे सांगितले. मरणाऱ्या प्रत्येक माणसाच्या कुटुंबियांना आपण मोजून पसतीसशे रुपये देतो म्हणूनही ठणकावून सांगावयास ते विसरले नाहीत ! देवा, आम्ही कोणत्या काळात वावरतोय ? आमच्या डोळयांसमोर १०–१५ वर्षांची कोवळी पोरे शेकडो फूट उंचीवरच्या घुमटाकार छताला सुशोभित करावयास वर चढताहेत. कारण कोणतेच यंत्र हे काम करू शकणार नाही ! पाय घसरून ही मुले आमच्या नजरेसमोर नारळाप्रमाणे खालच्या लाकडी जमिनींवर फुटताहेत. याच जमिनीवर आणखी काही महिन्यांनी चिनी आणि जपानी कसरतपटू आम्हाला आपले कर्तृत्व दाखवतील ! मेलेली मने सुद्धा बंद करून

उठतात. दिल्लीतील काही तरुणांनी या कामगाराची संघटना बांधावयाचा प्रयत्न केला. आपण किती बच्चे आहोत ते त्याना समजून आले. फोडा आणि झोडा हे तंत्र ठेकेदाराना माहीत आहे. प्रत्येक प्रांतातील कामगार वेगळे ठेवलेत. आपापसात लढत ठेवलेत संघटना थोडी कोठे मूळ धरत होती; एका मद्रासी कामगाराने एका पंजाबी बाईची छेड काढली म्हणून आवई उठली. दोन्ही बाजूचे चारशे कामगार मिळेल ते हत्यार हातात घेऊन 'इज्जतचा सवाल' म्हणून मारामारीला आले. किमान चाळीस-पन्नास कामगार जबर जखमी झाले. दोन ठेकेदारानी व अंमलदारानी फार कुशलतेने परिस्थिती हाताळली म्हणून त्याना बक्षिसे देण्यात आली आणि उषा राई यानी त्यांचे खूप कौतुक केले !

त्यानंतर मजुराना जवळ वगैरे आणावयाचा प्रयत्न कोणी केला नाही. नरमेधयज्ञ अव्याहतपणे सुरू राहिला. सरकारी आकड्याप्रमाणेच चाळीस-पन्नास मजूर कामी आलेत. प्रत्येकी ३५०० रुपये घेऊन ! हा आकडा नक्कीच खूप जास्ती असेल. आम्हा मित्रांच्या डोळयांसमोर अठरा वर्षांचा एक तरुण चिंध्या होत उंचावरून खाली कोसळलाय; पण आम्ही पेटून उठूच शकत नाही. आम्ही सारे विझून गेलेले संसारी लोक आहोत. सध्याकाळची भाजी वेळेवर घरी पोचली नाही तर घरी काय महाभारत घडेल आणि ऑफिसात साहेब रागावला तर प्रमोशनचे काय होईल याची चिंता वाहणारे आम्ही मित्र अस्वस्थ होण्यापलीकडे काही करत नाही ! शेवटी लव्हाळीतला नामदेव सटकर आणि बिढारमधील चांगदेव पाटील हे आमचे प्रतिनिधी आहेत. आम्ही फक्त तिकडे फिरावयास जाणे बंद करतो आणि आमच्या अनेक रात्री झोपेशिवाय अस्वस्थ होत पुढे सरकतात! इतिहास या वास्तूना, त्या बांधणाऱ्याना आणि त्या वेळी षंढाप्रमाणे हे सारे पाहणाऱ्यांना नक्कीच क्षमा करणार नाही !

## ५

आज एक नोव्हेंबर. गुरुपरब, गुरुनानकजयंती ! आशियाड फक्त पंधरवड्यावर येऊन ठेपला. आज जेहलम एक्स्प्रेसने मचरच्या आवटे कॉलेजचे प्राचार्य पानवळ येणार आहेत. बहिणीचे पत्र आहे, त्यांना स्टेशनवर जाऊन भेट. बऱ्यापैकी मध्यमवर्गीय हॉटेलात त्याची सोय कर. साऱ्या हॉटेलात जागा मोकळया आहेत आशियाडसाठी लोकानी अजून फारशा जागा राखून ठेवलेल्या नाहीत म्हणून हॉटेलचालक थोडे नाराजच आहेत. आवश्यक वस्तूचे दर वाढलेले नाहीत. अंड्याचे दर एक-दीड रुपयापर्यंत चढतील असा सार्वत्रिक समज होता; पण अंडे अजूनही आठ आण्यालाच मिळते. दर वाढणार नाहीत म्हणून जगमोहन ठामपणे सांगताहेत आणि लोकाचा त्याच्यावर विश्वास आहे. वस्तु साठवून वगैरे टेवण्याच्या फंदात कुणी पडलेले नाहीत. निरनिराळया राज्यात वा परदेशांत पाठवलेली तिकिटे परत येताहेत अशा बातम्या आहेत. हे नक्की असे का होते आहे ते आता बरोबर समजले. माझ्या घरापासून दिल्लीस्टेशन म्हणजे २०-२५ मिनिटाचा गाडीचा रस्ता! पण त्या दिवशी गाडीने तब्बल दोन तास घेतले. माझे आणि पानवळांचे नशीब चांगले म्हणून जेहलम नेहमीप्रमाणेच दोन तास उशीरा होती !

दरवर्षी गुरुनानकजयंतीला चांदणीचौकातील प्रमुख गुरुद्वारात येणाऱ्या सरदाराची सोय व्हावी म्हणून तेथील वाहतूक वगैरे बंद ठेवतात. या वेळी दिल्लीत जेथे जेथे गुरुद्वार आहेत तेथे तेथे सरदारजीच्या मिरवणुकांना वगैरे त्रास होऊ नये म्हणून वाहतूक अडवून ठेवलीये. सारी वाहतूकव्यवस्था कोलमडून पडली आहे, पुण्यात प्रत्येक मारुतीमंदिराजवळची वाहतूक, मारुतीभक्तासाठी रोखली तर जे काही होईल त्यातला हा प्रकार आहे ! कोठून आणि कसे पुढे जावे हेच समजत नाही. चक्रव्यूहातून वाट शोधावी तसे गुरुद्वार नसलेले रस्ते शोधत मार्ग काढला. सरकार सरदारजीना जाम टरकलंय ! त्यानंतर दररोज दिल्लीवरचा ताण जाणवावा इतका वाढतोय. गांधीवधानंतरचा ब्राह्मण-ब्राह्मणेतर तणाव शिवसेनेच्या वेळचा मराठी-दाक्षिणात्य बेबनाव, बांगलादेशनिर्मितीच्या वेळची शेख मुजीबची भाषणे, हे सारे क्षण मनात कळत-नकळत गर्दी करतात. पंजाबातून येणारे हिंदू विश्वास ठेवू नये अशा बातम्या देताहेत. अकाली-सरकार वाटाघाटी सुरू होतात आणि मोडतात. दिल्लीबाहेरून दिल्लीत येणारी प्रत्येक गाडी अडवून तिची कसून झडती घेतली जाते आहे. तीन-चार ट्रक्स भरून तलवारी मिळाल्या म्हणून जबाबदार वृत्तपत्रातील बातम्यांमध्ये म्हटलंय. काही तरी अकल्पित भयंकर होणार हे प्रत्येक जण जाणून आहे. सरदारजीचे काही खरे नाही. ते स्वतःचे तरी बारा वाजवतील नाही तर आशियाडचे तरी ! विमानात केवढी कसून तपासणी घेतात; पण यानी दोनदा विमाने पळवून दाखवली. मुख्यमंत्र्यापुढे केवढा बंदोबस्त असतो; पण त्याच्यासमोर जोरदार बॉंब फोडला, स्टेडियमवर जरी बॉंब फोडला तरी झालेल्या गोंधळात बाहेर पडताना शेकडो लोक चिरडून मरतील. त्यानंतर हिंदू लोक अल्पसंख्याक असलेल्या सरदारांच्यावर सूड घेतील. माझ्या शिख मित्रानी या वेळी दिल्लीत न राहता पंजाबात जावयाचे ठरवलंय. साऱ्या दिल्ली शहरावर भीतीची एक दाट छाया आहे. सरकारी बंदोबस्त पण कडेकोट आहे. दररोज सुरक्षिततेची नवी नवी थक्क व्हावी अशी फर्माने सुटताहेत आपण राज्य करणे म्हणजे काय हे जाणतो म्हणून आपणाला मत द्या म्हणून बाईंनी निवडणुकीच्या वेळी सांगितले होते राज्य करणे म्हणजे काय ते बाई आणि जगमोहन आज दिल्लीकराना समजावून द्यावयास निघालेत. सारा कार्यक्रम शांतपणे पार पडेल म्हणून त्यानी आग्रहपूर्वक ठामपणे पुन्हा पुन्हा सांगितलंय. जवाहरलाल नेहरू स्टेडिअमवर जाणाऱ्या ऐंशी हजार स्त्री-पुरुषाची दया-माया न करता कडक तपासणी होईल हे त्यानी जाहीर केलय; पण हे कसे शक्य आहे? वेळ पडली तर सारा स्टेडिअम फक्त सात मिनिटात खाली करता येतो आणि अर्ध्या तासात बाहेर उभे असलेले बसगाड्याचे थवे तुम्हाला सुखरूपपणे स्टेडिअमपासून दूरवर घेऊन जातील म्हणून सांगितलंय. कार्यक्रम पाहावयास येणाऱ्या माणसानी ट्रान्झिस्टर, दुर्बिणी वगैरे राहू देत; खायचे डबे वा पाण्याच्या बाटल्याही बरोबर ठेवावयाच्या नाहीत. स्कूटर-चालकांनी शिरस्त्राणे स्कूटरमध्येच सोडावयाची आहेत. सारे वातावरण युद्धभूमीचे वा दंगलग्रस्त विभागाचे आहे. पोलिसाच्या छावण्या, गस्त घालणाऱ्या गाड्या याच्या-

पृष्ठ २८ वर



# मराठी विनोद

साहित्य परिषद व्याख्यानमाला । पुष्प तिसरे : मंगळवार १९ ऑक्टोबर १९८२

**डॉ. अंजली सोमण**

# उपहासाकडून परिहासाकडे वळलेला विनोदकार चिं. वि. जोशी

'चिं. वि. जोशी यांच्या विनोदाची वैशिष्ट्ये लक्षात घेतल्याशिवाय मराठी साहित्यातील विनोदाचा विचार पूर्ण होऊ शकत नाही.' अशी सुरुवात करून डॉ. अंजली सोमण पुढे म्हणाल्या–

मराठीतील विनोदी वाङमयाची परपरा श्रीपाद कृष्ण कोल्हटकरापासून सुरू झाली. राम गणेश गडकऱ्यांनी 'बाळकराम' उभा करून आपल्या अन्य काव्य–नाटकांतून या परपरेचा वारसा जपला. या परंपरेतील गडकऱ्यांनंतरचे महत्त्वाचे विनोदकार म्हणजे चिं. वि. जोशी. त्यांच्या नावे एकूण ३०-३५ विनोदी पुस्तके जमा आहेत. या पुस्तकातील विनोद कथा, नाटिका, बालवाङ्मय अशा विविध रूपात आकारलेला आहे. सर्वाधिक लोकप्रिय झालेला 'चिमणराव' त्यांनी 'आत्मचरित्रा'च्या स्वरूपात वाचकापुढे आणला; पण चिं. वि. जोशी यांचे श्रेष्ठत्व त्यांच्या लेखनाच्या विपुलतेने साठवलेले नाही, त्यांच्या लेखनाच्या 'जातकुळी'वर ते आधारलेले आहे. समग्र लेखनामागे जीवनाविषयीची एक निखळ जाण दडलेली असणे हेच चिं. वि जोशींच्या श्रेष्ठत्वामागील गमक आहे.

उत्तम निर्मिती करणारा लेखक काही वेळा आपल्या निर्मिति-प्रक्रियेचे मार्मिक विश्लेषण करून जातो. चिं. वि. जोशींच्या पुस्तकाच्या प्रस्तावना पाहिल्यानंतर आपल्या निर्मिति-प्रक्रियेचे किती जागरूक विवेचन ते करतात हे ध्यानात येते विनोदाने हास्यनिर्मिती होते, असे सरळ साधे विधान आपण चटकन करून जातो; पण हास्य का निर्माण होते याचा विचार आपण करू लागलो की, कोणतेही एक विवक्षित असे कारण 'हास्यकारण' म्हणून दाखवता येत नाही. हास्यकारणमीमांसा नेहमीच गुंतागुंतीची असते. एकीकडे ती हसणाऱ्या व्यक्तीच्या मनोधारणेशी सबधित असते तर दुसरीकडे विशिष्ट समाजात प्रचलित असलेल्या चालीरीतीशी निगडित झालेली असते. चिं. वि. आपली बांधिलकी प्रथमत विनोदनिर्मितीशी मानतात. 'मी विनोदाचा मिस्त्री आहे, शास्त्री नाही,' ही त्यांची कोटी त्यांची लेखनविषयक भूमिका स्पष्ट करणारी आहे. असे असले तरी त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना वाचल्यानंतर ते विनोदाचे 'मिस्त्री' तर होतेच; पण 'शास्त्रीही' होते, हेही लक्षात येते.

'हास्यचिंतामणी'ला जोडलेल्या प्रदीर्घ प्रस्तावनेत त्यांनी विनोदनिर्मितीमागील काही महत्त्वाच्या कारणाचा विचार केला आहे. या विवेचनातून विनोदाकडे बघण्याची त्यांची भूमिका स्पष्ट होते. 'उच्च दर्जाचा विनोद नेहमी बुद्धीतून निर्माण होतो' या त्यानी माडलेल्या सूत्राची प्रचीती त्यांच्या स्वतःच्या विनोदातच अनेकदा अनुभवायला मिळते. शारीरिक व्यंगातून निर्माण झालेला विनोद चिं. विना फारसा भावला नाही. असा विनोद सदभिरुचीला धरून नसतो. त्यांच्यामागे कुचेष्टेचा, टवाळीचा हेतू असतो, असे त्यांचे स्पष्ट मत होते. गडकऱ्यांच्या विनोदावर या संदर्भात त्यांनी टीकाही केलेली आहे. त्यांच्या लेखनात शारीरिक व्यंगावर आधारलेला विनोद आढळत नाही.

'स्वतःला हसणे' ही घटना विनोदनिर्मितीमध्ये चिं. वि. जोशी फार महत्त्वाची मानतात. प्रत्येक विनोदकाराने स्वतःला हसणे शिकले पाहिजे. दुसऱ्याला हसलं की 'उपहास' निर्माण होतो, स्वत.ला हसल्यानंतर 'परिहास्या'ची निर्मिती होते. 'उपहासा'कडून 'परिहासा'-कडे वळण्याची प्रेरणा आपले पालीभाषेचे गुरु प्रा. धर्मानंद कोसंबी यांच्याकडून मिळाली असे चिं. वि. जोशी सांगतात. 'चिमणराव'च्या रूपाने स्वत.मधील उणीवा शोधून स्वत ला हसविण्याचा प्रयत्न त्यांनी प्रत्यक्षात उतरवला विनोदकाराने केवळ हास्यनिर्मिती हे लक्ष न ठेवता समाजातील दोष, व्यगे नेमकेपणाने हुडकून ती माडण्याचे उद्दिष्ट ठेवले पाहिजे, अशी त्यांची धारणा होती.

अशी काही महत्त्वाची सूत्रे डोळ्यापुढे ठेवून चिं. विंच्या विनोदाचा प्रवास झालेला आहे. शब्दनिष्ठ विनोदाला मराठीत सपन्न परंपरा लाभलेली आहे. कोल्हटकराचा विनोद बव्हंशी शब्दनिष्ठ कोटिबाज होता. शब्दनिष्ठ विनोदाची काही झकास उदाहरणे चिं. विंच्या लेखनातही आढळतात. 'कपोझिटरचा सूड' ही त्यांची प्रसिद्ध कथा म्हणजे शब्दनिष्ठ विनोदाचे उत्तम उदाहरण आहे; पण या कथेत केवळ शाब्दिक कसरती नाहीत, तर विनोदाची मानवी स्वभावाशी सागड घातली आहे. या कथेतील लिंबाजीराव म्हणजे 'चरखा' नावाच्या वृत्तपत्राचा सपादक. अव्यवहारीपणामुळे नुकसान होऊन त्याला स्वत चे वृत्तपत्र बंद करावे लागते. दुसऱ्या एका सपादकाच्या हाताखाली काम करण्याची वेळ त्याच्यावर येते. हा संपादक वेळोवेळी लिंबाजीचा उपहास करत असतो. यामुळे चिडलेला लिंबाजी मजकूर जुळवताना करामती करायला सुरुवात करतो. 'लग्नसमारंभा'ऐवजी 'नग्नसमारंभ', माजी डेप्युटी कलेक्टरऐवजी 'पाजी डेप्युटी कलेक्टर' असे शब्द पडल्यानतर सबधित मंडळी रागावून संपदकावर चालून येतात. 'देवगड समाचार' हे आपले वृत्तपत्र बद करण्याचा प्रसंग या बिचाऱ्या सपादकावर येतो.

सस्कृत कथावाङमयातील अलंकारप्रचुर वर्णनाचे उत्तम विडंबन चिं. वि. जोशींनी 'चहाडखोर पोपट'मध्ये केले आहे, तर 'लंकावैभव' हे सपूर्ण पुस्तकच विडंबनाचा एक झकास नमुना आहे. रामाच्या काळात वृत्तपत्रे असती तर त्यांनी कशा बातम्या दिल्या असत्या, हे चिं. वि. जोशी 'लंकावैभव'मध्ये माडतात. रामाच्या विरहाने लकेत व्याकुळ झालेल्या सीतेने 'वत्सलावहिनींचा' सल्ला घेणे, प्रतिपक्षाची भूमिका समजून घेण्यासाठी नाक–कान कापलेल्या शूर्पणखेची मुलाखत घेण्यासाठी वार्ताहरानी रुग्णालयात जाणे, असे

यातील काही प्रसंग रंगतदार आहेत. हे सारे करत असताना वृत्तपत्र-व्यवसायातील व्यंग हेरून माडण्यास चि. वि. जोशी विसरले नाहीत. ' टीकाकार आणि न्हावी ' हा कोल्हटकरांच्या ' चोरांचे संमेलन 'ला आदर्श मानून लिहिलेला लेख. इथेही विडंबनातूनच विनोदाची निर्मिती केली आहे. कोल्हटकराप्रमाणे चि. वि. जोशी कल्पनेच्या उतरंडी रचू शकत होते, याचा हा पुरावा. टीकाकार आणि न्हावी यांच्यातील साधर्म्ये या लेखात चि. वि. जोशी मोठ्या खुबीने मांडतात. आपण न्हाव्याकडे आपणहून हजामत करून घेण्यासाठी जातो, तसाच नवोदित लेखक आपणहून हौसेने टीकाकाराकडे (हजामत करून घ्यायला) जातो. हजामतीचे जसे उलटी–सुलटी असे दोन भेद असतात, तसे ते टीकेचेही असतात. उलटी टीका म्हणजे उपरोधपूर्ण टीका. सुलटी टीका म्हणजे उघड उघड टीका. हजामत झाल्यानंतर न्हावी गिऱ्हाइकाचे डोके गोजारतो तद्वत मनसोक्त टीका करून झाल्यानंतर ' शैली बरी आहे ', ' हा लेखक भविष्यकाळात चांगली निर्मिती करेल असे वाटते ', असे काही तरी लिहून टीकाकार लेखकाला गोजारतो. लेखक–समीक्षक या ' नाजूक ' संबंधाबद्दल चि. वि. नी नोंदविलेली ही निरीक्षणे, त्यांच्या मार्मिकतेची साक्ष पटविण्यास पुरेशी आहेत.

## शेकडा शंभरातील एक

शाब्दिक कोट्या, उपरोध, विडंबन यांची उदाहरणे चि. विंच्या लेखनात सापडत असली, तरी अशा प्रकारच्या विनोदात ते खऱ्या अर्थाने रमले नाहीत. शारीरिक व्यंगावर आधारलेला विनोद त्यांनी जसा कटाक्षाने दूर ठेवला तसाच शब्दनिष्ठ विनोद आणि उपहास याचा अवाजवी मोहही स्वतःला पडू दिला नाही. विनोद करून लोकांना हसविण्यापेक्षा माणसाचं जग रंगविण्याकडे त्यांचं अधिक लक्ष असावं, असं त्यांचं लेखन वाचत असताना सतत जाणवत राहते. यामुळेच मराठीतील अन्य विनोदकारापेक्षा त्यांच्या विनोदाचे स्वरूप वेगळे झाले असावे. ' चिमणराव आम्हाला आता पूर्वीसारखा हसवत नाही ' या वाचकांनी केलेल्या तक्रारीला ' आणखी चिमणराव 'च्या प्रस्तावनेत चि. वि जोशींनी उत्तर दिले आहे. ' चऱ्हाटा 'तील चिमणराव वयपरत्वे गंभीर झाला आहे ', हे उत्तर म्हणज त्यांनी वाचकाचे केलेले केवळ समाधान आहे. प्रत्यक्षात त्यांना चिमणराव नावाचा ' हसवणारा ' माणूस रंगवायचाच नसावा. चिमणराव नावाचा ' शेकडा शंभरातील एक माणूस ' रंगवून त्यांना आपल्या सर्वांच्या जीवनातील विसंगती लेखनाच्या माध्यमातून निरखून बघायच्या असाव्यात.

चि. वि. जोशींकडे कल्पनांच्या भराऱ्या, शाब्दिक कोट्या, विडंबन, उपहास, उपरोध हे सर्व विनोदाला आवश्यक गुण विपुल प्रमाणात असले तरी केवळ त्यांच्या आधारे विनोदनिर्मिती हे त्यांचे लक्ष नाही. त्यांचे लक्ष सतत माणसाचे चित्रण करण्याकड आहे. त्यांच्या विनोदाचे श्रेष्ठत्व ते ' चिमण ' नावाचा एक माणूस साकार करतात यात आहे. कल्पनेच्या भराऱ्या, विडंबन, कोट्या यात न रमता ते तुमच्या–आमच्यासारखी माणसे उभी करतात आणि या माणसांच्या ओढीने आज इतक्या वर्षांनंतर आपण पुन्हा पुन्हा चि. विंकडे आकर्षिले जातो, पुन्हा पुन्हा ' चिमण ' वाचतो, दूरदर्शनवर तो पाहण्यात रमतो. ' संपूर्ण चिमणराव ' जर घेतला तर त्यात अनेक प्रसंगनिष्ठ विनोद आढळतात. उदा.–चिमणरावाचे डोळे येतात–म्हणजे दुखणे लहानसे पण उपचाराची मात्र जबरदस्त केवढी तरी रांग; गुंड्याभाऊचे दुखणे–यात गुंड्याभाऊ मुंबईला गेल्यावर त्याला साधे पडसे होते आणि तिथले लुच्चे डॉक्टर त्याला कसे फिरवतात व कोणतेही दुखणे झालेले नसताना त्याला कसे अनेक डॉक्टरांकडे जावे लागते, हे पाहण्यासारखे आहे यातील दंतवैद्याचे नाव त्यांनी 'ब्रोको–डेण्टो' असे ठेवले आहे आणि शाब्दिक कोटी साधली आहे. चिमणचा दुर्मुखलेला चेहरा पाहून डॉक्टर चिमणलाच पेशंट समजतात व त्याचे तीन दात काढतात. इथेही त्यांना शाब्दिक कोटी करण्याचा मोह होतो. चिमण म्हणतो, ' मी माझे सोन्यासारखे तीन दात गमावले; पण गुंड्याभाऊ मात्र दात काढून हसत होता. बाह्यतः हे विनोद शब्दनिष्ठ किंवा प्रसंगनिष्ठ वाटले तरी यातील सर्व प्रसंगांना माणसांच्या विशिष्ट स्वभावांची डूब मिळालेली आहे. मध्यमवर्गीय माणसाचे जग साकार करणाऱ्या चि. वि. जोशींच्या विनोदाची खरी मदार स्वभावनिष्ठ विनोदावरच आहे.

चि. वि. जोशींच्या विनोदाचे वेगळेपण जाणून घेण्यासाठी मराठी विनोदाची परंपरा तपासून पहाणे आवश्यक आहे. मराठी वाङ्मयात आनुषंगिक स्वरूपात वावरणाऱ्या विनोदाला श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी स्वतंत्र दालन उघडून दिले. ' सुदामा ' नावाचा मानसपुत्र निर्माण करून त्यांनी मराठीत विनोदी लेखनाची परंपरा सुरू केली. सुदामा नावाच्या सनातनी माणसाकडून वदविल्या गेलेल्या हकिकती असे ' सुदाम्याच्या पोह्यांचे ' स्वरूप असले, तरी प्रत्यक्षात कोल्हटकरांना सुदामा नावाचा ' माणूस ' रंगवता आला नाही. विनोद निर्माण करण्याचे आणि समाजातील व्यंगांवर टीका करण्याचे साधन म्हणूनच ' सुदामा ' या पात्राचा वापर कोल्हटकरांनी केला. ' सुदामा 'च्या रूपाने टीकाकार कोल्हटकरच वारंवार वाचकांसमोर येत राहिले. विनोदकार कोल्हटकरांचे हे अपयश आहे. त्यांच्या पुस्तकात त्या काळची माणसं भेटत नाहीत. ते समाजातील अपप्रवृत्तींवर टीका करत राहतात. त्यांची माणसे 'कॅरिकेचर्स' वाटतात. थोडासा अहंभावही त्यांच्या विनोदातून जाणवतो. समाजातील सर्वसामान्य माणसे चुकतात, रूढींचे अंधश्रद्धेने पालन करतात, धर्माच्या नावाखाली ते अनिष्ट गोष्टी करतात, हे ते सतत दाखवितात; पण हे दाखवत असताना या सगळ्यापासून मी लांब आहे असा एक भाव त्यांच्या लेखनातून जाणवत असतो. यामुळेच त्यांचा विनोद बोचरा असतो. तो शरसंधानाच्या स्वरूपाचा असतो. जीवनाच्या प्रवाहात न उतरता काठावर उभे राहून कोल्हटकर समाजातील व्यंग शोधत राहतात व स्वतःला समाजापेक्षा वेगळा मानून विनोदाच्या माध्यमातून समाजावर टीकास्त्र सोडत राहतात. त्यांचा विनोद हे ' सजीवच्छेदनशास्त्र आहे, ' असे ' सुदाम्याचे पोहे 'वरील टीकेत न. चिं. केळकर म्हणतात. जिवंत माणसांचे डिसेक्शन जसे निर्दयपणाचे असते, तसाच हा प्रकार आहे, असेही ते म्हणतात.

सुदाम्याची भाषा ही एका सनातनी माणसाची न वाटता कोल्हटकराचीच वाटते. त्यांचे अनुकरण करताना प्रारंभी चि. वि.नीसुद्धा नापितांच्या तोंडी आपली भाषा व आपले विचार लादले आहेत; पण असे त्यांच्या ' चिमण 'मध्ये कुठे आढळत नाही आणि इथेच

चिं. वि. जोशींनी मराठी विनोदात केलेला बदल जाणवतो. ते विनोदाला नवे वळण देण्याचा प्रयत्न करतात. चिमण हा साठ रुपये मिळविणारा आणि फावल्या वेळात अनुभव टिपणारा साधा कारकून आहे. अशा माणसाची भाषा कोल्हटकरांच्या सुदामासारखी भरजरी असणार नाही. तिच्यात बुद्धिमत्तेची चमक, कल्पकतेचे वैभव असणार नाही, याचे भान चिं. विं.नी राखल्यामुळे चिमण तुमच्या–आमच्यातलाच एक म्हणून राहून आपलीच भाषा बोलतो व जवळीक साधतो. चिमणराव या व्यक्तिरेखेचे खरे तर हेच वैशिष्ट्य आहे. मात्र त्या काळात दुर्दैवाने चिमणवर व त्याच्या भाषेवर टीका झाली. परंपरेच्या विरुद्ध काही तरी करण्याचा चिं. वि. प्रयत्न करत होते. 'गुड्याभाऊ'च्या प्रस्तावनेत या टीकेचा उल्लेख आढळतो. त्यांच्या प्रस्तावना या दृष्टीने महत्त्वाच्या, मुळातूनच पाहण्यासारख्या आहेत.

कोल्हटकरानंतरचे दुसरे महत्त्वाचे विनोदकार गडकरी. कोल्हटकरांना सुदामा गवसू शकला नाही. तो एक साधनच राहिला. गडकऱ्यांना 'बाळकराम' नावाचा माणूस बराचसा गवसला; परंतु ते आपल्या कल्पनावैभवाच्या मोहात अडकले. आपल्या उत्तुंग कल्पनाशक्तीच्या स्वैर विलासात गुतून पडले. अतिशयोक्ती करत राहिले आणि बाळकराम परत हातात येता येता दूर गेला. आपण विनोद करतो आहोत ही त्याना सतत जाणीव असल्याचे लक्षात येते. अपण 'एंटरटेनर' आहोत ही जाणीव त्यांच्या लेखनामागे दिसते.

मराठी विनोदात साधारणपणे दोन ठळक प्रवृत्ती दिसतात: एक म्हणजे सामान्य माणसाविषयीचा कुत्सितपणा किंवा सामान्य माणसाचा दुबळेपणा. त्याची अगतिकता रंगवून त्याच्याबद्दल करुणा निर्माण करण्याची वृत्ती. पु ल देशपांडेसुद्धा याला अपवाद नाहीत. उदा. :– त्याचा नारायण चितळे मास्तर किंवा अतू बर्वा पहा. लेख संपवताना थाळा फिरवून पात्रासाठी (सहानुभूतीचा) फंड गोळा करण्याच्या पु. लं.च्या प्रवृत्तीवर दिलीप चित्रे यानी टीका केलेली आहे. थोडक्यात कुत्सितपणा आणि सहानुभूतीची निर्मिती या दोन परंपरा मराठी विनोदात आढळतात. या दोन्ही परंपरामध्ये जाण्याचे चिं. वि. जोशी नाकारतात, हेच वैशिष्ट्य आहे. चिमणरावाच्या आत्मकथनात चिं. विं.च्या विनोदाची सारी वैशिष्ट्ये एकवटलेली आहेत.

'चिमणराव' हा सामान्य माणूस आहे; पण चिं. वि. त्याचे कुत्सितपणे अगर सहानुभूती गोळा करत जात वर्णन करत नाहीत. ते त्याचे शेवटपर्यंत सामान्य माणूस म्हणूनच वर्णन करतात, हे चिमणच्या यशाचे मर्म आहे चिमणच्या रूपाने १९२०–४० या मधील सर्व सदाशिवपेठ चिं. वि. आपल्यासमोर मांडतात. ही मांडताना त्याना अतिशयोक्तीचा वापर करण्याची गरजच भासत नाही. कारण ती मुळातच विसंगत आहे. ते त्या काळातील नेमका एक खंड उचलून जसाच्या तसा आपल्यापुढे मांडतात आणि इथेच ते कोल्हटकर–गडकरी यांच्या अतिरंजित परंपरेपासून दूर जातात. सामान्य माणसाच्या जीवनात जर खोल डोकावून पाहिले तर त्याचे जीवन अनेक प्रकारच्या विसंगतींनी भरलेले आढळते. त्या नेमकेपणाने हेरून जेव्हा एखादा विनोदकार तुमच्यापुढे वास्तव स्वरूपात मांडतो, तेव्हा तो विनोदकार आपल्या वेगळेपणाने उठून दिसतो. मराठीत हे चिं. वि. प्रमाणे अन्य कोणी यशस्वीपणे केलेले दिसत नाही.

सदाशिवपेठेबद्दल अनेक लेखकाच्या मनात प्रेम आहे. त्यांनी ते आपल्या लेखातून व्यक्तही केलेले आहे. काहीना आता 'सदाशिवपेठ' बदलते आहे, हरवते आहे याचे दुःख होते. काही लेखक जुनी माणसे, जुनी संस्कृती जात चालली आहे याचे दु:ख आपल्या लेखात व्यक्त करतात; पण चिं. वि. मात्र अशा कोणत्याही प्रकारच्या भावना बाळगून सदाशिवपेठेकडे पहात नाहीत. चिमणबद्दल चिं. वि. सागतात, 'शंभरातला कोणताही एक माणूस उचला, तो चिमण असेल!' चिमणजवळ बुद्धीचे वैभव नाही, त्यांच्या वडिलांनाही याची कल्पना आहे. ते म्हणतात, 'तू फार तर कुठे तरी ६० रुपये मिळवणारा मास्तर किंवा कारकूनच होणार!' त्याच्या आईलासुद्धा 'तो अंमळ डोक्याने बेताचाच' असल्याची जाणीव आहे. जिथे जिथे अडचणीचे प्रसंग तिथे तिथे ती गुड्याभाऊला बरोबर नेण्याविषयी बजावते. असा सामान्य बुद्धीचा माणूस कल्पनेच्या भराऱ्या कशा मारणार? म्हणूनच चिमणरावाचा विनोद हा त्याच्या कल्पनावैभवावर आधारलेला नसून त्याच्या कल्पनादारिद्र्यावर आधारलेला आहे. चिमणरावाला आपण हसतो; पण तो विनोद अतिशयोक्तीतून निर्माण झालेला नसतो. एका कारकुनाच्या जीवनात अतिशयोक्त प्रसंग घडणार तरी कोणते? चिं. वि. जोशींच्या विनोदाचे मर्म कल्पनावैभवात किंवा अति-


*With best compliments from*

**Artichem Laboratories**

952, Sadashiv Peth
Pune - 411 030

*Phone : 445134*

शयोक्तीत सापडत नाही. ते त्यांनी रंगविलेल्या जीवनवास्तवाच्या तपशिलामध्येच शोधावे लागते.

चिमणरावाला आमच्या सामान्यत्वाची पूर्ण जाणीव आहे, पण त्याची खंत मात्र तो करत नाही. येणाऱ्या प्रत्येक प्रसंगाला विनोदी वृत्तीने पण डोळसपणे सामोरा जाणारा तो एक माणूस आहे. तो काहीसा लवाड, बेरक्या–सुद्धा आहे. आई व बायको याचे भाडण झाले की ते सोडवताना तो एकीचे तत्त्व व एकीचा तपशील स्वीकारतो. अर्थातच स्वत.च्या फायद्याप्रमाणे; पण जेव्हा दोघी तत्त्वासाठी किंवा तपशिलासाठी अडतात तेव्हा तो गरजेप्रमाणे एकीची बाजू घेतो. आपली झालेली फजिती लपविण्याइतके चातुर्य त्याच्यात असल्याने त्याची कीव करण्याची गरज भासत नाही. तो साधा आहे, तसाच लवाडही आहे; पण त्याच्या लबाड्या लहान स्वरूपाच्याच असतात. त्याही तो केवळ तशी परिस्थिती निर्माण झाल्यावरच करतो, एरवी नाही.

चि. वि. जोशी चिमणराव नावाचा आरसा वाचकांसमोर धरतात व त्याचेच प्रतिबिंब त्यांना दाखवितात. चिमणप्रमाणे जीवनात किती तरी गोष्टी आपल्यावर लादल्या जात असतात, किती तरी गोष्टी आपण आपल्या मनाविरुद्ध करत असतो. चिमणरावावर त्याला न येणारी भाषा लादली जाते. स्वत.ला न येणाऱ्या इंग्रजी भाषेत साहेबाला डोळे आल्याबद्दल तो चिठ्ठी लिहितो. ( Respected Sir, My eyes have come, I shall attend the office when they will be gone ) आणि स्वत चे हसे करून घेतो. त्याचे सत्यवक्तेपणाचे प्रयोग त्याच्या गळ्याशी येतात. खरं बोलल्यामुळं उद्भवलेल्या प्रसंगातून त्याला खोटं बोलून स्वत.ची सुटका करून घ्यावी लागते. माणसानं निर्माण केलेली व्यवस्था त्याचं स्वातंत्र्य कसं हिरावून घेते, याचंच हे उदाहरण आहे समाजव्यवस्थेतील विसंगती हेरणाऱ्या पण तिला धुडकावू न शकणाऱ्या सामान्य माणसाचं रूप चिमणरावामध्ये मला जागोजागी दिसतं. आजही माणूस आणि व्यवस्था याच्यातील हेच संबंध कायम असल्याने चिमणरावाच्या काळातील सदाशिवपेठ आपलीशी वाटली नाही, तरी चिमणराव मात्र सगळ्याना आपल्यातलाच वाटतो. चिमणरावाच्या रूपाने जीवनातील अनेकविध विसगती चि. वि. जोशी आपल्यासमोर मांडतात; पण या विसंगती विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या प्रकाशात ते शोधत नाहीत. धर्म, कुटुंबव्यवस्था, नोकरशाही ही समाजाने स्वीकारलेली चौकट तपाशीत असताना विसंगत अशी मूल्यव्यवस्था नकळत त्यांच्या हाती लागत जाते.

कोल्हाटकराच्या आणि चि. वि. जोशाच्या विनोदात एक फार मोठा फरक आपल्याला दिसतो. कोल्हटकर हे विनोदाच्या रूपानं सतत शरसंधान करत राहतात. त्याना 'हसणारा वाघ' म्हटले आहे. त्यांनी 'सुदामा' नावाच्या सामान्य माणसाचं कातडं पाघरून सामान्य माणसामध्ये शिरण्याचा प्रयत्न केला; पण सामान्य लोकानी त्यांचे हे वेषातर ओळखलं. सुदामा म्हणजे एक प्रच्छन्न टीकाकार आहे हे त्यांच्या लक्षात आलं. त्यामुळंच पुढे कोल्हटकराना सुदाम्याचे कातडे काढून टाकून आपल्या टीकेमागचा हेतू स्पष्ट करावा लागला; पण चि. वि. ना अशा वेषातराची गरज भासली नाही. कारण 'चिंतामणराव' आणि 'चिमणराव' ही एकाच व्यक्तिमत्त्वाची दोन रूपे आहेत चिमणराव जगत असतो आणि चिंतामणराव चिमणरावाचं जगणं निरखत असतात, या जगण्यातली विसंगती टिपत असतात आणि सामाजिक चौकटीच्या कोंडीत सापडणाऱ्या स्वत:ला हसत असतात. चि. वि जोशीचा विनोद स्वत.ला हसण्यामधून निर्माण होतो, म्हणूनच तो बोचरा वाटत नाही. जीवनाचं हे रूप जसजसं तुम्ही न्याहाळून बघू लागता, तसतसा त्याचा विनोद तुम्हाला अतर्मुख करू लागतो.


'चिमण' या नावाचा इतिहास चिंतामणराव सांगतात की, त्यांचा पहिला लेख फर्ग्युसन कॉलेजच्या मासिकात प्रसिद्ध झाला तेव्हा त्याचे प्रोफेसर काळे यांनी 'चिंतामणरावा' ऐवजी 'चिमणराव' असे नाव नायकाला दिले. चितमणरावांनी ते तसेच ठेवले. जे जगणे त्याना उभे करायचे होते त्याच्याशी त्यांना ते सुसंगत वाटले असावे. चिंतामणराव 'चिमणराव' झाले हे फार चागलं झालं. ते जर 'चिंतामणराव'च राहिले असते तर कदाचित जीवनप्रवाहाच्या काठावर बसून जगणाऱ्याच्या जीवनातील व्यंग टिपण्याचा प्रयत्न त्यानी केला असता, चिमणराव होऊन ते जगत राहिले नसते, आपल्यात मिसळले नसते. □


## पाच हजारांपेक्षा जास्त स्त्री–पुरुषांची वजने कमी करण्याचा एक नवा उच्चांक

शास्त्रोक्त पद्धतीने व खात्रीशीर वजन कमी करून ते टिकविण्याचा उच्चाक फक्त "फिगरेल" करते "फिगरेल" प्रोफेशनल कोर्सेसमुळे आज किती तरी ब्युटिशिअन्सनी स्वत:ची पार्लर्स काढली आहेत. आपणही एक कुशल ब्युटिशियन होऊ शकता. वधू नटविण्याचे कामात तर फिगरेलचा नावलौकिक आहेच.

आता फिगरेलच्या तीन शाखा आहेत.

- **फिगरेल** — **मदाने एन्टरप्राईज**
  जंगली महाराज रोड, पुणे
  फोन : ५७०९०, ५३७९१
- **फिगरेल** — **पारिजात डिपार्टमेंटल स्टोअर**
  टिळक रोड, पुणे
  फोन : ३१८२२
- **फिगरेल** — डेक्कन जिमखाना क्लब समोर
  पुणे–४ फोन : ५२३५९



गौरादेवी – तिबेटच्या सरहद्दीवरील रेणी गावची एक अडाणी आदिवासी स्त्री; पण 'चिपको' आंदोलनात तिने एक तेजस्वी गौरवगाथा घडविली...
रेणीची गौरादेवी आणि मारवाडातली रणचंडी अमृतादेवी; आपली प्राणाहून प्रिय झाडं वाचवण्यासाठी अमृतादेवी आणि तिच्या साथीदारांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. एक-दोन नाही, तर फक्त ३६३ जणांनी !!
'चिपको' आंदोलनाची इतिहासात खोलवर रुजलेली मुळं शोधण्याचा एक प्रयत्न.


# प्रेरणा चिपकोची, भटकंती उत्तराखंडाची !

**जगदीश गोडबोले**

**लेखांक – चौथा**

अलकनंदेच्या खोऱ्यातील पीपलकोटी–जोशीमठ भागातील प्रदेशाचा व त्यातील काही गावांचा अभ्यास करण्याची कामगिरी या नं. ३ गटाकडे होती. पीपलकोटीपासून बेमरू स्युण, पोखरी, लांझी, ढिंग, तपोवन या मार्गाने लंगसीपर्यंत डोंगरवाटांवरून पायी प्रवास करायचा. नंतर बसने प्रवास करून रेणी आणि पाखी गावांना भेट द्यायची, अशी प्रवासाची सर्व-साधारण रूपरेषा होती. बद्रीनारायणाला जाणारा मोटररस्ता हा या भागातील एकमेव पक्का मोटार-रस्ता–हा रस्ता अलकनंदेच्या डाव्या काठावरून जातो. वरील सर्व गाव या रस्त्यापासून पाच ते दहा किलोमीटरच्या परिसरात आहेत. पाखी अथवा गरुडगंगा हे गाव मुख्य रस्त्यावरच आहे. रेणी गाव जोशी–मठाहून मलारीकडे जाणाऱ्या मोटररस्त्यावर, ऋषिगंगा व धवली–गंगेच्या संगमावर आहे. अलकनंदेच्या उजव्या काठावर बेमरू, पोखरी, ढिंग ही गावे आहेत. अलकनंदेला मिळणाऱ्या मैनागाडच्या (नाल्याच्या) काठी स्युण गाव आहे. या सगळ्या गावांची उंची समुद्रसपाटीपासून चार हजार ते सात हजार फुटांच्या दरम्यान आहे. गोपेश्वर, चामोली व जोशीमठ ही या भागातील प्रमुख डाकघरे. दशौली ग्रामस्वराज्यसंघाचे कार्यकर्ते भूपालसिंग (ऊर्फ मामुजी) आणि जगदीशप्रसाद हाटवाल यांना साथीला घेऊन ७ मार्चला सकाळी गोपेश्वर सोडले.

प्रथम पीपलकोटी गाठले. गाव बद्रीनाथ-रस्त्यावरच असल्याने दुकान–हॉटेलस् वगैरे भरभूर होती. भटकंतीत आमची राहाण्या–खाण्याची सोय मुख्यतः गावातल्या घराघरातूनच होणार होती; पण अडी–अडचणीच्या वेळेस म्हणून किरकोळ किराणामालाची खरेदी केली. प्रत्येकाने आपली टाकी फुल केली. कारण आठ किलोमीटर्स




पहाडी चढण चढून पाच हजार फुटांवरील बेमरू गाठेपर्यंत पार संध्याकाळ होणार होती. एका प्रचंड उतरणीनंतर अलकनंदा एका झुलत्या पुलावरून पार केली आणि बेमरुची बिकट वाट धरली.

## 'ऽऽ बीरो की यह बाट है भाईऽऽ!'


बेमरूची वाट तशी बिकट नव्हती; पण चढण आणि सतत चढण याने जीव सुरुवातीला जरा मेटाकुटीला येतो. मी आणि नागेश आलो होतो तेव्हाची गंमत आठवते. आम्ही पीपलकोटी सोडले आणि पावसाची कुरबुर चालू झाली. वर बेमरूला पाऊस–वर्फाचा मारा चालल्याचे दिसत होते. आमच्याजवळ छत्री–रेनकोट काही नव्हते आणि आतले गरम कपडे भिजले असते तर वांदा झाला असता. कारण आम्हाला हिमालयात अजून आठ–दहा दिवस काढायचे होते. आमच्याबरोबर दिल्लीची काही मंडळी होती. त्यांचा उत्साह दांडगा होता. जिगर दाडगी होती त्यातला एक तरुण पागळा होता तरी त्याने हेका धरला होता काही झालं तरी मी बेमरूला जाणारच. त्याला लगेच दिल्लीला परतायचे होते, पण आम्हाला असा ब्रेव्हडो परवडणार नव्हता वा आमची जिगर गारठली होती म्हणून आम्ही वर जाण्यास तितके उत्सुक नव्हतो. चंडीप्रसादजी सोबत होते. त्यांनी एकूण परिस्थिती ओळखली. त्यांनी आम्हाला वर चढण्याचा आग्रह–विग्रह केला नाही ते बेमरूला जाऊन परतेपर्यंत आम्ही खालच्या गावातच थांबावे असं सुचवलं आणि निघण्यापूर्वी सहजपणे एक कोरसगीत सुरू केलं–'चलता मुसाफिरहि पायेगा मंझील और मुकाम रे ऽ बीरोकी यह बाट है भाई कायर का नही काम ऽ नही कायरका काम।'

गीताचे संपूर्ण बोल आता नीट आठवत नाहीत; पण अर्थाने दिलेला झटका अजूनही आठवतो. कसला पाऊस आणि कुठला बर्फ आणि कसले गारठणे. एका तडाख्यात पहाड चढून गेलो आणि मग मात्र अंगावर अक्षरशः रोमाच उभे राहिले बर्फा–पावसातही पहाड चढून आलेल्या मित्राच्या स्वागतासाठी अख्खे गाव ढोल–नगारे–तुताऱ्या घेऊन लोटले होते. आम्ही आमच्याबरोबर अक्रोडाची ५०० रोपं नेली होती. जरा उघाड मिळताच ढोल–नगारे याच्या निनादात वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. परत हिमवर्षावाला सुरुवात झाली. अक्रोड, कांचुदा, पांगर आदि पतझडी वृक्षांना हिम व वर्षा दोन्हीची जरुरी असते. दोन्ही जोडीने आल्याने गावकरी खूष झाले. शाळेच्या ओसरीत पेटवलेल्या शेकोटीच्या भोवती आम्ही मस्तपैकी विसावलो. आभाळभर पिंजणारा कापूस. धगधगणारी शेकोटी. तोंडात उडदाची गरमागरम भजी आणि हातात वाफाळणाऱ्या चहाचे भरते प्याले! और क्या होना था–आनंदम्, परमानंदम्!

पीपलकोटीहून प्रस्थान ठेवल्यावर प्रथम लागले मठ नावाप्रमाणेच छोटेखानी मग थोड्या अंतरावर सुरेंडा. आम्हाला बेमरूला मुक्काम जायचे होते; पण उगाच मुसंडी मारून वा शिखर गाठायच्या ईर्षेने बेमरु गाठायचे नव्हते. त्यामुळे वाटचाल शक्यतो सावकाश व सर्व बघत–माहिती घेत करायची असं मुद्दामहूनच ठरवलं होतं. हा मुद्दा महत्त्वाचा होता. कारण अनेकदा अशा वाटचालीत (ट्रेकस्) प्रथम पोहोचण्याच्या ईर्षेने वा बहादुरीच्या चुकीच्या कल्पनेने मुख्य बघण्याचेच राहून जाते. आम्ही तो धोका टाळण्याचा प्रयत्न करणार होतो.

मठ, सुरेन्डा वा आम्ही नंतर पाहिलेल्या या डोंगरउतारावरील गावाची रचना एकदम टिपिकल असायची. गाव उतारा–उतारावर विखरून वसलेले असायचे घर दुमजली. रुंदीला कमी, लांबीला जास्त. तळमजल्यावर धान्य–पेंढा–चारा वगैरेची साठवणी, वरचा मजला राहाण्यासाठी. घराची बांधणी दगडाची. दोन मोठ्या दगडांमध्ये चिखल-मातीऐवजी परत छोट्या दगडाच्या चिपा. वर स्लेटच्या दगडाची पसरट कौले. वरती–आतून लाकडी छत, दारं–खिडक्या ठेंगण्या–ठुसक्या. वरच्या मजल्यावर कमानी–कमानीचा सुंदर सज्जा. बाकदार कमानीवर सुंदर नक्षी वा गणपती, हत्ती नाही तर कमळं कोरलेली. सौंदर्यदृष्टीची साक्ष देणारी. घरापुढे लांबट–चौकोनी अंगण. दगडाने माचलेले. मल्टीपरपज. गुडगुडी ओढत छानपैकी ऊन शेकत निवांत बसायला वा निवड–टिपण–शिवण करायला खूप उपयोगी. एखाद्या कोपऱ्यात धान्य कांडायला छोटेसे उखळ. राम–प्रहरी मुसळीचा लयबद्ध आवाज घुमायचा. जोडीला एखादे गुणगुणते गीत. बहिणाबाईंचे जाते असो वा इथल्या कुठल्या माय–भगिनीचे मुसळ असो, अशा वेळी त्या जात्याला नाही तर मुसळीलाच कंठ फुटून त्यातून सुख–दुःख, प्रीती–भक्ती उमटत असेल. पुरुष माणसाच्या हाती मोट आली की ती पण आपले मनीचे बोल असेच पोटातून मोकळे करते.

आम्ही पाहिलेली बहुसंख्य गावं छोटेखानी. पन्नाससाठ घरांची. वस्ती बहुधा जातवार विखुरलेली. ब्राह्मण–ठाकुराची घरं–गावच्या वरच्या अंगाला, दलित-वस्ती खालच्या बाजूला. जातीयता अगदी उघडी–नागडी नाही वा सावली–वारा लागू नये एवढी कर्मठ नाही तरी निश्चितच जाणवली. परंपरेने स्वीकारलेली, म्हणूनच कदाचित् जास्त धोकादायक. काही वेळा वरच्या सवर्ण वस्तीतले सांडपाणी खाली दलितांच्या वस्तीतून जाते. पावसाळ्यात प्यायच्या पाण्यातही



बातचीत – गावकऱ्यांशी

मिसळते; पण खाली गंगेला मिळालं की सर्व पवित्र झालं अशी भावना ! ! उत्तराखंड म्हणजे तीर्थक्षेत्रांचे आगर. धार्मिकतेचा व ( म्हणून ) जातीयतेचा पगडा फार. त्यामुळे अस्पृश्यतेच्या जाणिवेने एखादे वेळी रक्त पेटून उठायचा; पण मन आवरावं लागायचं. कारण आमच्या दोन-चार दिवसाच्या मुक्कामांत ते काही मोठं साधणार नव्हतं. मुख्य म्हणजे 'उस' देशसे गंगा वहती है और 'इस' देशसे–जाऊ दे !

गावाच्या आसपास पायऱ्या-पायऱ्यांची शेती. खरीपात भात, मुंडवा ( नाचणी ), सावा, वरईची पिके तर रब्बीला गहू, उडीद, सरसो वा मका. कुटुंबाला सरासरी तीस-चाळीस नाली जमीन ( १६ मुठी म्हणजे एक नाली, २० नाली म्हणजे १ एकर ). आपली जमीन आपणच कसायची. पुरुषवर्ग बहुतांशी दूरदेशी. ह्यामुळे आता काही ठिकाणी नांगरही बायकाच धरू लागल्या आहेत. भूमिहीन व शेतमजूर जवळ-जवळ नाहीच. घरोघरी 'धन' म्हणजे गायी-म्हशी असणारच. गोशाळा गावापासून दूर. सार्वजनिक स्वच्छतेच्या दृष्टीने ही बाब फार महत्त्वाची. पिकाचा-भाजीपाल्याचा नाश करतात म्हणून कुक्कुट–पालन अनेक ठिकाणी नाहीच. सुरेंद्राला प्रथम माल्टा नावाचे संत्र्यासारखे पण संत्र्यांहून मोठे फड चाखले. या भागात प्रत्येक घरी माल्टाचे झाड आढळलेच. मुशाफिरीत पुढच्या दहा जन्मांचे माल्टा खाऊन घेतले. नंतर खाऊन कंटाळा आला; पण लोकांचा प्रेमळ आग्रह मोडवायचा नाही.

## 'डालियों का दगडचा–वृक्षमित्र'

बेमरूला पोहोचायला संध्याकाळचे सात वाजले. आमच्या बरोबरचे 'मामुजी' याच गावचे असल्याने तशी काही अडचण नव्हती. बेमरू गाव चारही बाजूंनी पहाडांनी वेढलेले आहे. पहाड कठिण दगडाचा असल्यामुळे कडे कोसळणे इत्यादि प्रकार इथे होत नाहीत. शिवाय पहाड प्रचंड उतरणीचे असल्याने जंगलही कमी आहे. त्यामुळे जंगल–तोडीची समस्या नाही. गावच्या मालकीची दोन गायराने आहेत. आलटून–पालटून या गायरानांचा वापर केला जातो. लाकूड-फाटा ४–५ किलोमीटर दूर जाऊन आणावा लागतो. म्हणून 'चिपको' आंदोलकांची या गावातील कामाची दिशा प्रामुख्याने लाकूड–फाट्याच्या व फळ–झाडांची लागवड अशी दिसली. दशौली ग्राम स्वराज्य संघाची 'डालियोंका दगडचा' म्हणजे वृक्ष-मित्र नावाची तरुणांची एक संघटना आहे. शाळा–कॉलेजातील हे तरुण 'वृक्ष–मित्र' वृक्ष–संवर्धन मोहिमात भाग घेतात. बेमरूलाही त्यांनी १९७८ साली व नंतर शिबिर घेऊन पांगर, पमनी, खरसू, अक्रोड आदि वृक्षांची गावकऱ्यांच्या मदतीने लागवड केली आहे. प्रयोग चांगल्यापैकी यशस्वी झाल्याचे जाणवले.

पहाणी–पत्रकातील मुद्द्यांना अनुसरून अभ्यास व्हावा अशी अपेक्षा असल्याने गटातील प्रत्येकाने आपल्या आवडीनुसार व गरजेनुसार एक–दोन मुद्द्यांचा विशेष अभ्यास केला. गावाचे प्रातिनिधिक चित्र मिळावे व एकाच माणसाकडून सर्व माहिती घेण्याचा दोष टाळावा या हेतूने आम्ही जोडी–जोडीने गावात विखरून माहिती घेण्याचे ठरवले होते. सर्वच ठिकाणी ते शक्य झाले नाही; पण प्रयत्नांची दिशा ती ठेवली होती. बेमरू गावात आठवीपर्यंत शाळा व पोस्टऑफिस होते. गावातील बहुसंख्य तरुण बाहेरगावी नोकरीस व मुख्यत: सैन्यात आहेत. शेती–भातीही असल्याने गावची आर्थिक–स्थिती बऱ्यापैकी जाणवली.

'चिपको' आंदोलनात एक–दोन जणांनीच प्रत्यक्ष भाग घेतला असला तरी बहुतेक लोकांना आंदोलनाची माहिती होती. वन–संवर्धनाबाबत लोक सतर्क होते; पण अंधश्रद्धा, रूढिप्रियता, जातिभेद या दृष्टीने सामाजिक मागासलेपण फार जाणवले. गावची वस्ती ठाकूर–ब्राह्मण व हरिजनांची. एकूण घरं बत्तीस; पण गावात जर काही गोड–धोड केले तर तीस वाटे केले जातात व तीस कुटुंबांचा हिशोब सांगितला जातो. मात्र या हिशोबात दोन हरिजन कुटुंबांना धरले जात नाही !

बेमरूहून दुपारी जेवण करून निघालो. वाटेत लोलाँव नावाचे

संपूर्ण हरिजन वस्तीचे गाव लागले. इथेच दालचिनीचे जंगल होते व त्याचा सुवास दरवळत होता. गाव हरिजनवस्तीचे, मात्र आर्थिकदृष्ट्या बरे वाटले. मुख्य व्यवसाय शेती व लोहारकाम. लोहाराचा व्यवसाय बलूत-पद्धतीवर चालतो. गावाजवळ बऱ्यापैकी जंगल होते. हे गाव अतर्गत भागात असल्याने व्यापारी जंगल-तोड झाली नव्हती त्यामुळे गवत-लाकूड-फाटयाची अडचण नाही. साधी रहाणी व पोटापुरते दाणा-पाणी यामुळे लोक एकंदरीत समाधानी दिसले. मात्र काही जणांना क्षयबाधा असावी असे जाणवले. किंबहुना या सर्वच पहाडी भागात विशेषत: स्त्रियामध्ये त्याची बाधा जास्त असावी असे जाणवले.

आमचा पुढचा पडाव स्यूंण या गावी होता. चमोली तालुक्याच्या पहाडी इलाख्यातील (तसा सगळाच पहाडी इलाखा, पण हा पहाडातील पहाडी भाग !) हे शेवटचे खेडे. दोन पहाडाच्या मध्ये 'मैना' नदी व नदीपलीकडे जोशीमठ तालुका. संध्याकाळी गावात पोहोचलो तेव्हा आमचे जोरदार स्वागत झाले. होळीच्या नाचात गावातील जवान-पोरे मश्गुल होती. आम्ही पाठीवरची (आणि मनावरचीही) ओझी भिरकावली आणि नाचात सामील झालो. आमच्यातील आलमगीर मुलाणी, काळुराम धागडा आणि नामदेव ओव्हाळ म्हणजे नामी कलाकार ! काळूराम संघटनेची तशी गंभीर गाणी म्हणणारा; पण आलमगीर आणि नामा म्हणजे हरहुन्नरी ! 'झिंदाबाद' असो वा 'मथुरेचा बाजार' असो याचे सर्व काम 'जक्शनच!' त्यात हरिभाऊंचा ढोल आणि पब्लिकचा उत्साह. धमाल नाच झाला. लेझीम-टिपऱ्या झाल्या. मग चहाचे प्याले आले.गरमा-गरम चहाचे घोट घेता-घेता आमच्याबरोबरीच्या भगवतीप्रसादने आम्ही मंडळी कुठून व कशासाठी आलो वगैरे माहिती सागितली. इतक्या दूरची मंडळी आपल्या गावात येतात याचे गावकऱ्याना अप्रूप होते. त्यातून आपल्य अडी-अडचणीची माहिती घ्यायला आले आहेत म्हटल्यावर त्याचे प्रेम उतू जायचे !

सकाळी जरा उशीराच जाग आली. उठून पहातो तो आजूबाजूचे वर्फाच्छादित पहाड हात पसरून स्वागताला उभे ! पहाणीचे काम तर करायचे होते; पण हे आमत्रणही जबरदस्त होते. शेवटी आमच्यातले काही जणानी समजूदारीने गावात कामाला सुरुवात केली व काही जण बर्फिल्या पहाडात भटकून आलो. मग परतल्यावर सर्वांनी मिळून काम पूर्ण केले.

स्यूँण गाव पण छोटेसेच. बावीस घरांचे. सर्व वस्ती ठाकूरसमाजाची. गावच्या आसपास सूचिपर्णी व रुंदपर्णी वृक्षांचे भरपूर जंगल आहे. पूर-कडे कोसळणे अशा आपत्ती नाहीतच. एकूण अलकनंदेच्या या उजव्या तीरावर या आपत्ती अभावानेच आढळल्या. या उलट स्थिती डाव्या किनाऱ्यावरची. गावच्या आसपास वनखात्याचे जंगल आहे. तसेच गावच्या मालकीचे पण जंगल आहे. या जंगलाचे कुटुंबाप्रमाणे हिस्से केले आहेत. प्रत्येक कुटुंब आपल्या ठरलेल्या हिस्स्यातील गवत व लाकूड तोडून नेते. हे हिस्से सर्वांना समान आहेत गावाला अजून 'सुधारणे'चा वारा न लागल्याने परस्पर वाटणीची समंजस परंपरा अजून टिकून आहे. गावच्या उजव्या बाजूला डोंगरावर संघाने गावकऱ्याच्या मदतीने वृक्षारोपण केले आहे. कागदी लिंबू व इतर फळझाडे लावली आहेत.

गावात तरुण मुले जास्त आढळली. त्यांचे एक 'नवयुवक मंगल दल' आहे. दलातर्फे गावाकरिता रस्ता तयार करणे, दीवार बंदी (दगडाचे कुंपण) वृक्षारोपण आदि विकास-कार्यक्रम राबविले जातात. 'चिपको' आंदोलनात गावातले अनेक तरुण सहभागी झाले आहेत आपल्या गावात तशी विशेष समस्या नसताही सामाजिक जाणिवेने व भविष्याचा वेध घेऊन या तरुणानी आंदोलनात सहभागी होणे आम्हाला फार महत्त्वाचे वाटले.

गावात दुधापासून तूप करण्याचा व बकरी-पालनाचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर आढळला. त्यामुळे दुधा-तुपाची रेलचेल होती. अधिक माहिती घेण्याच्या निमित्ताने म्हणा की, दूध-तुपाचा परिणाम म्हणा आमचा गावातील मुक्काम एक दिवसाने वाढलाच !

स्यूँणच्या दुधा-तुपाने चढलेली आमची चरबी दुसऱ्याच दिवशी उतरली. सकाळी द्विंगकडे प्रयाण केले तर सुरुवातीपासूनच उभा रस्ता आडवा आला. त्यातून रस्ता नावापुरताच; बाकी बिकट वाट. खाली मुंडी घालून, घामाघूम होऊन, एकमेकाला आधार देत कशीबशी वाटचाल, वाटचाल कसली पायपीट करत होतो ! पहाडी लोकांच्या सहनशक्तीला-चिवटपणाला मनातल्या मनात हज्जारदा शरण जात होतो. एका बाजूला अलकनंदा, समोरून गरुडगंगा व पाठीमागून मैनानदी आमची फटफजिती पाहून खळाळून हसत होत्या ! बरीच पायपीट केल्यावर एक छोटी वस्ती लागली हरिजनांची, थांबा असं न सागताही एकजात सर्वांनी बैठक मारली. मामुजीने न सांगताच आमच्यासाठी फर्मास चहा मागविला ! हा आनंद काही औरच होता. ही वस्ती पोखरी गावची होती ! लगेचच पुढे पोखरी गाव होते.

डोंगरमाथ्यावर विस्तीर्ण असे मैदान व मध्ये एक छोटेसे तळे होते. तळयाला पोखरी असे म्हणतात त्यावरूनच गावचे नाव पोखरी असं पडलं असेल. १९७०च्या अलकनदेच्या पुराने गावच्या शेतजमिनीचे थोडे नुकसान झाले आहे. शिवाय गावच्या पाठीमागील कडा कोसळून काही शेतजमिनी नष्ट झाल्या आहेत. अलकनदेचा पूर वा कडे कोसळण्याचा संबंध गावकरी जंगलाशी जोडताना आढळले; पण तरीही गावकरी जगल-लागवडीच्या प्रयत्नांबद्दल विशेष उत्सुक दिसले नाहीत. गावठाणाच्या मागचा पहाड कठीण व जास्त उताराचा आहे. तिथे पूर्वीपासून जगल नव्हते व मृद-संधारण खात्याने तिथे जंगल लावण्याचा केलेला प्रयत्न तीन वेळा फसला; हे कदाचित त्याचे कारण असावे. मात्र पोखरी गावातून अलकनदेच्या डाव्या किनाऱ्यावरील गरुडगंगेपासून पाताळगंगेपर्यंतचा जो प्रदेश एका दृष्टिक्षेपात दिसतो त्या प्रदेशात सुरू असलेल्या भूस्खलनाच्या खुणा जागोजागी दिसतात. भूस्खलनामुळे जागोजागी खंडित झालेला बद्रीनाथचा रस्ता व त्यावरून धावणाऱ्या बसगाड्या फार केविलवाण्या दिसतात. अगोदरच या अवाढव्य पसाऱ्यात त्या किडा-मुंगीसारख्या भासतात. त्यातून असा पायाखाली घसणारा रस्ता. आपण अशा वेळी बसमध्ये नसतो याचा किती प्रचंड दिलासा वाटतो !


पोखरी तसे मैदानी व रस्त्यापासून जवळ असल्याने बरेच शहरी वाटले. गावात सुशिक्षितांचे प्रमाण पण चागले होते. गावकऱ्यांचा ओढा पांढरपेशा नोकरीकडे व शहरी रहाणीमानाकडे असल्याचे जाणवले. गावकऱ्यांची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी वाटली. अनेकांच्या

घरात रेडिओ,फर्निचर,पितळेची भांडी, तवला–पेटी वगैरे गोष्टी आढळल्या.गावकऱ्यांना 'चिपको' आंदोलनाची माहिती होती; पण प्रत्यक्ष सहभाग नव्हता. उलट निरुत्साहच जाणवला. पोखरीप्रमाणे पुढच्या लांजी गावातही थोडी–बहुत हीच परिस्थिती आढळली. लांजीची प्राथमिक शाळा मात्र फारच छान वाटली. स्वच्छ पांढराशुभ्र चुना लावलेल्या भिंती, भिंतीवर भारताचा नकाशा आणि थोरा–मोठ्यांची (छोट्यांना न पेलणारी) वचने वगैरे. मैदानाच्या कडेने माल्टाची झाडं, आम्हाला शहरातील शाळा नामक खुराडी आठवली. अशा शाळा पाहिल्या की परत एकदा बालपण यावेसे वाटते. अगदी भरपूर खाल्लेल्या छड्यांसकट आले तरी !.

पोखरीहून थेट ड्विंग गाठले. (याचा अगम्य उच्चार गढवालीच करू जाणोत! श्यूंणचेहि तसेच. असो.) आत्तापर्यंत पाहिलेल्या गावापैकी या गावाची आर्थिक स्थिती फारच हलाखीची वाटली. गावातील सर्व पंधरा–वीस घरे ठाकुरांची आहेत. १९७० चा अलकनंदेचा पूर व गावाजवळ झालेली दरड-कोसळ (Land-slide) यामुळे सुमारे पन्नास टक्के शेतजमीन बरबाद झाली. गावकऱ्यांना त्याचे भीषण परिणाम भोगावे लागत आहेत. शेतीला पाणी काय, पिण्याच्या पाण्याचीही बोंब आहे.अनेक गावांमध्ये ही हालत आढळली. सर्व गटांना हिमालयाच्या तोंडचे पाणी पळाले असेल ही कल्पनाच आम्हाला खरी वाटली नसती. दुर्दैवाने तशी वस्तुस्थिती आहे. ड्विंगचे दुर्दैव इथेच संपत नाही. गावात शाळा नाही. जवळपास आठ–दहा किलोमीटर्सपर्यंत दवाखाना नाही. डॉक्टर पाच-सहा महिन्यांतून कधी तरी तोंड दाखवतात; पण त्यांच्याकडे औषधे नसतात ! अलकनंदा ओलांडायला धड पूल नाही. आहे त्या अर्धवट पुलावरून काही वेळा गुरं–ढोरं खाली नदीत पडतात. एकूण काय सर्वसाधारण भारतीय खेड्याच्या वाट्याला जे भोग येतात ते ड्विंगच्या वाट्याला पुरेपूर आले आहेत !

गावाच्या आसपास तीन प्रकारचे जंगल आढळले. एक गावचे जंगल. इथे गावकऱ्यांनी बॅन्केकडून कर्ज घेऊन फळ व इतर झाडांची लागवड केली आहे. सात वर्षांनंतर कर्जाचे हप्ते सुरू होतील. ही योजना खूप यशस्वी झाल्याचे जाणवले. दुसऱ्या प्रकारचे जंगल दशौली ग्राम–स्वराज्य संघाच्या मदतीने अलकनंदाच्या किनाऱ्यावर लागवड केलेले आहे. शिवाय गावकरी व संघाचे प्रयत्न बघून वन–खात्यानेही गावाच्या पाठीमागील डोंगरउतारावर जंगलाची लागवड केली आहे; पण हा प्रयत्न तितकासा यशस्वी वाटत नाही. गावकऱ्यांना पर्यावरण व पर्यावरणात जंगलसंबंध याची चांगली जाण असल्याचे जाणवले. पूर–दरड–कोसळ थांबविण्यासाठी वनसंवर्धनाचे प्रयत्न करण्यासाठी गावकरी उत्सुक आहेत, प्रयत्नशील आहेत.गावकऱ्यांना चिपको आंदोलनाची चांगली माहिती व सहभाग असल्याचे जाणवले. गावातील तरुणांनी 'नव–युवक मंगल दल' स्थापन केले आहे व त्याच्यातर्फे आपले प्रश्न सोडविण्याची त्यांची कोशिश चालू आहे.

दुसऱ्या दिवशी दुपारी जेवण आटपून ड्विंगहून निघालो. अलकनंदा पार करून आम्हाला डाव्या किनाऱ्यावरील गणाई गावाला जायचे होते. वाटचालीला सुरुवातही केली; पण आमच्यातील अलकनंदेची–अलका कुलकर्णीची तब्बेत बिघडली. अलका अलकनंदेपेक्षा जास्त अवखळ, त्यामुळे प्रकरण जरा काळजीचेच. शेवटी तिला तिच्या



काकांकडे जोशीमठला पोहोचवायचे व रात्री जोशीमठला मुक्काम करून दुसऱ्या दिवशी रेणीला जायचे सर्वानुमते ठरले. साडे-सात हजार फूट उंचीवरील या गावाबद्दल सर्वांच्याच मनात विलक्षण कुतूहल होते. एक तर तिथल्या आदिवासी भोटिया लोकांबद्दल आणि मुख्य म्हणजे गौरादेवीबद्दल. गौरादेवीने 'चिपको' आंदोलनात एक तेजस्वी पर्व लिहिलं होत.

## गौरादेवीची गौरवगाथा

रेणी ही तिबेटच्या सरहद्दीजवळील भोटिया या आदिवासी जमातीची छोटीशी वस्ती. १९६० पासून अलकनंदेच्या या पाणलोटक्षेत्रात जंगलतोडीस सुरुवात झाली. १९७० साली अलकनंदेने केलेल्या हाहा:-कारानंतरही सरकार–ठेकेदारांचे डोळे उघडले नाहीत. सहाजिकच आहे. कारण त्यांची बायकामुले दूर सुरक्षित होती. रेणी व आसपासच्या गावांच्या डोक्यावर मात्र प्रत्यही असुरक्षिततेची टांगती तलवार होती. त्यातच १९७४ च्या जानेवारीमध्ये रेणीच्या जंगलातील पाच-पन्नास नाही तर तब्बल अडीच-हजार झाडांचा लिलाव जाहीर झाला! आंदोलकांनी प्रत्यक्ष लिलावच होऊ न देण्याचा प्रयत्न केला; पण तो फसला. मागील अनुभवावरून सावध झालेल्या सरकार-ठेकेदारांनी आपला बेत उघडपणे पुढे न रेटता चालबाजी केली. संघाच्या कार्यकर्त्यांना त्यांनी गोपेश्वरला वाटाघाटीत गुंतवून ठेवले आणि त्याच वेळी जुने कसले तरी पेमेंट देण्याचा बहाणा काढून रेणीच्या पुरुष–मंडळींना चामोलीला बोलावून घेतले. कार्यकर्ते–लोक असे गाफील असताना ठेकेदारांचे भाडोत्री मजूर आडमार्गाने गुपचुप रेणीच्या जंगलाकडे निघाले. त्यांचा कट जवळ–जवळ सिद्धीस गेलाच होता; पण त्यांच्या दुर्दैवाने ही अनोळखी फौज जंगलात मेंढ्या चारणाऱ्या एका छोट्या मुलीने पाहिली. जीव तोडून धावत येऊन तिने गावाला ही खबर दिली; पण गावात होतेच कोण ? फक्त वीस बाया आणि त्यांची कच्ची–बच्ची! पुरुषमंडळींना निरोप पाठवून ते येईपर्यंत, दोन–तीन दिवस जाणार आणि तेवढ्यात झाडं कटणार! अशा या आणीबाणीच्या क्षणी गौरादेवी नावाची वृद्धा पुढे आली आणि

सर्व बायका-पोरांना घेऊन जंगलाकडे निघाली. आंदोलनाची माहिती सांगायला चंडीप्रसादजी या भागात पहिल्याप्रथम आले होते, तेव्हा याच बायका 'चिपको' ह्या नुसत्या शब्दालाच वात्रटपणे फिदीफिदी हसल्या होत्या. आज मात्र गौरादेवीच्या नेतृत्वाखाली त्या झपाटल्यागत जंगलाकडे निघाल्या होत्या.

ही फौज पहाताच, इतक्या हुशारीने आखलेला आपला बेत धुळीला जाणार म्हणून ठेकेदाराचे हस्तक भडकले. त्यातून नुस्त्या बायका-बायका पहाताच त्याच्यातला पुरुषी-राक्षस जागा झाला. काहीजण दारू पिऊन तर्र होते. बायकांना विवस्त्र करण्याची धमकी देण्यापासून ते गौरादेवीच्या तोंडावर थुंकण्यापर्यंत सर्व प्रकार त्यांनी केले. बंदुकीची नळीही छातीवर टेकवली ! एका तळीरामाने तर 'आम्ही उच्चवर्णीय आहोत. आम्हाला माघारी न्यायचे असेल तर, तुमच्या खांद्यावरून डोलीतून न्या !' असेही फर्मावले. अवघड परिस्थितीत सापडलेल्या बायकांनी त्याला तयारी दर्शवलेली पाहून इतरांनी त्याला आवरले. बायका-पोरांनी झाडाला 'चिपकून' 'पुरुषमंडळींना येऊ द्या, मग पुढचे काय ते ठरवू !' या एकाच मागणीचा धोशा लावला होता. शेवटी त्यांची हिंमत पाहून भाडोत्री मजुरांनी कच खाल्ली. कारण कुठलेही झाड तोडायला गेले की, एवढीशी पोरं पण फटाफट झाडाला मिठी मारून बसत ! या मजुरांनाही बायका-पोरं होती. अखेर या लोकांना पुढं घालूनच बायका जंगलातून माघारी फिरल्या. परतताना त्यांनी एका अवघड जागेवरील छोटा पूल उचकटून फेकून दिला. म्हणजे आता परत कोणी जंगलात गुपचुप जाण्याची धास्ती नको !

## 'हमने हमारा मायका (माहेर) बचाया'

सरकार-ठेकेदारांच्या चालबाजीतून सावरलेली चंडीप्रसाद व इतर पुरुष-मंडळी जेव्हा धास्तावूनच रेणीला पोहोचली, तेव्हा या शूर बाया धावतच पुढे आल्या आणि त्यांनी मोठ्या अभिमानाने सांगितले, हमने हमारा मायका (माहेर बचाया है !')

गौरादेवींना भेटण्यासाठी आम्ही झपाटल्यासारखे चाललो होतो. त्यांच्या विषयी खूप ऐकले-वाचले होते. वाटेतच एक गोरी तरतरीत प्रौढा भेटली. भगवतीप्रसादने आपल्या गढवाली भाषेत आमच्याबाबतची माहिती दिली व आम्ही गौरादेवींना भेटण्यास उत्सुक आहोत म्हणून सांगितले. बोलत-बोलत आम्ही एका घराजवळ आलो आणि गौरादेवींची वाट पहात थांबलो थोड्या वेळाने त्या सोबतच्या प्रौढेने हळूच सांगितले 'मीच गौरादेवी – बोला काय बोलायचं ते !' आम्हाला पार गुगली पडला होता, त्यामुळे काय बोलावं तेच सुचेना. गौरादेवी अगदी मनमोकळ्या प्रेमळ वाटत होत्या; पण मनाच्या या गोंधळलेल्या अवस्थेत आमच्यातील काही जणांना काय बोलायचं, कसं बोलायचं ते सुचलं नसावं कारण एका साथीदाराने एकदम त्यांचा फोटो घेण्याचा प्रयत्न केला. खरं म्हणजे त्यात विशेष काही नव्हतं. अनेक देशी-विदेशी प्रकाशनातून त्यांचे फोटो झळकले आहेत. नैरोबीच्या जागतिक ऊर्जा-परिषदेत इंदिरा गांधींबरोबरीने गौरादेवींचे फोटो छापले गेले आहेत; पण बाईंच काही तरी बिनसलं आणि पार्वतीचे दुसरे रूप बघायला मिळाले. 'आमच्याकडे पाहुणे म्हणून आला आहात तेव्हा आता निमूटपणे चहा प्या आणि चालू लागा ! नाही तर माहिती नाही आणि फोटो नाही; पण एकेकाला हाकलून काढीन !' असा त्यांनी खुल्ला दम भरला. अचानक झालेल्या या माऱ्याने आम्ही हादरलोच; पण आमच्यापेक्षा भगवतीप्रसाद जास्त हादरला ! झाला प्रकार त्याच्या लक्षात आला असावा. आम्ही कोण-कुठले याबद्दल गौरादेवींना काही तरी संशय आला असावा. कारण मध्यंतरी अशीच कोणी तरी जपानी पाहुणे-मंडळी माहिती वगैरे घ्यायला आली आणि त्यानंतर सी. आय. डी. नी गौरादेवींना फार सतावले. सरकार-विरोधी आंदोलन, त्यातून सरहद्दीचा प्रदेश, त्यामुळे मामला जरा नाजुकच. त्यातून भगवतीप्रसादची गौरादेवींशी प्रत्यक्ष ओळख नव्हती. त्या चंडीप्रसादजींना खूप मानतात. आम्ही खरखुरं चंडीप्रसादजींकडूनच आलो आहोत हे परत एकदा नीट पटवून द्यायला लागलं. मग मात्र कसलीच अडचण आली नाही.

गौरादेवींनी अगदी तपशीलवार सर्व घटना सांगितल्या. ठेकेदाराकडून अजूनही आपल्याला फितवण्याचे, बदनाम करण्याचे कसे प्रयत्न केले जातात त्याची माहिती सांगितली व त्याविरुद्ध खंबीरपणे उभे रहाण्याचा निर्धार व्यक्त केला; पण एक जाणवलं. एक गौरादेवी ठीक आहे; पण एवढ्या मोठ्या ऐतिहासिक घटनेनंतर गाव-पातळीवर महिलांचं परिणामकारक संघटन उभं रहाण्यासाठी जे प्रयत्न व्हायला पाहिजेत ते इथे झाले नसावेत. कारण इतर कोणतेही ठोस कार्यक्रम नाहीत खुद्द गौरादेवींच्या बोलण्यात वारंवार येत होतं की, 'उस समय शंकरजीके शक्तीसे सब हुवा। पता नही अभी वैसा होगा या नही।'

## 'चिपको ! हुतात्मे – फक्त ३६३ !'

गौरादेवीवरून आठवली मारवाडातील अमृतादेवी ! आपली झाडं वाचविण्यासाठी या बहाद्दर बाईने आणि तिच्या सग्या-सोयऱ्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली ! एक-दोन जणांनी नाही तर तब्बल ३६३ जणांनी ! खेजडीच्या वृक्षाबरोबर त्यांचीही खांडोळी उडाली होती. डॉ. माधव गाडगिळांकडून प्रथम ही हकीकत ऐकली तेव्हा आम्ही थरारून गेलो होतो. तुम्हीही जाल –

खूप-खूप वर्षांपूर्वीची गोष्ट. मारवाडचा इतिहास एके काळी फुला-पानांनी डवरला होता. माणसाने रेगिस्तान जन्माला घातले नव्हते, रेगिस्तानने आजच्याएवढे हात-पाय पसरले नव्हते – तेव्हाची गोष्ट, म्हणजे शेकडो वर्षांपूर्वीची ! मारवाडच्या माळरानात खेजडी, बोरी, केर, सागरीची अमाप झाडं पसरली होती. काळवीट, चिंकारे, नील गायींचे मस्त कळप त्यातून विहार करत होते. भिल्लांच्या टोळ्याही वस्ती करून होत्या. बोरी-केरं चवदार फळांनी लगडायच्या, खेजडीला भरपूर शेंगा यायच्या शिकार रग्गड होती. खावे-प्यावे, उद्याची फिकीर न करता मस्तपैकी जगावे असा सिलसिला हजारो वर्षं चालला होता.

सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी मध्यआशियातून माणसांच्या धाडीवर धाडी येऊ लागल्या. हे होते मुख्यतः गुराखी. यातील अनेक जाट आणि राजपूत हळूहळू मारवाडात पसरले. भिल्लांशी मारामाऱ्या करून हातपाय पसरू लागले. मारवाडची आबादी वाढू लागली. मुलुख तसा भरपूर, त्यामुळे तसा काळजीचा प्रश्न नव्हता.

पण शतकामागून शतके लोटली तसा गुरा-माणसांच्या या प्रचंड दबावाचा भार खेजडी-बोरी-सागरीता पेलवेना. झाड-झाडोरा झपाट्याने कमी व्हायला लागला. त्याची पैदास कमी झाली. गुराख्याच्या कुऱ्हाडीने *जंगल ओसाड व्हायला लागले, उदास व्हायला लागले.* वनवासी-आदिवासी भिल्ल परागंदा होऊ लागले. अखेर तेराव्या शतकात कनोजच्या राठोडानी भिल्लाचा पराभव करून मारवाडात *आपले राज्य स्थापले आणि त्याच्याबरोबर आलेले* राजपूत सर्वदूर पसरले.

## अचाट जाती मारवाडात

इ स. च्या पंधराव्या शतकापर्यंत राठोडाचे राज्य मारवाडात पक्के पाय रोवून होते. त्याच्यातल्या एका पराक्रमी राजाच्या-राव जोधाजीच्या–कारकीर्दीत जोधपूर राज्यातील नागोर परगण्यातील पीपासार गावी इ. स. १४५१ मध्ये एका लोकविलक्षण आसामीचा जन्म झाला. बापाचे नाव लोहाटा. आई हंसादेवी. ठाकूर लोहाटजी होते ग्रामपती. व्यवसायाने शेतकरी आणि पशु-पालक. खाऊन-पिऊन सुखी-संपन्न. मुलगा एकुलता एक. लहानपणी कमी बोलायचा म्हणून सगळे ' गुगा ' चिडवायचे. राना-वनात जावे, गुरं वळावी आणि झाडा-झुडपात निवात पडून काळवीट-चिंकाराचे कळपच्या-कळप निरखीत राहावे हा शोक. वय वाढू लागले तसे हे गुगे पोर अचाट काम करू लागले म्हणून गमतीने सर्व जण त्याला ' जाम्भा ' ( अचम्भा ) म्हणू लागले त्याचेच पुढे जंबाजी झाले.

जबाजी पचवीस वर्षांचा झाला आणि सबध मुलखावर संकट आले. थोडा-फार का होईना; पण नेमाने पडणारा पाऊस येईनासा झाला. एक वर्ष-दोन वर्ष घरातील साठवलेला दाणा-पाणी-कडबा संपला. तिसरं वर्ष-चौथं वर्ष. *गुरं-माणसं झाडा-पाला ओरबाडू लागली;* पण आठ वर्षं लोटली तरी अवर्षण चालूच! दुष्काळाने हाहा:कार केला. खेजडीच्या शेंगावर आणि बोरीच्या बियांच्या *पिठावर गुजारा करण्याचे दिवसही गेले. लोक सागरीच्या झाडाची* साल कुटून खायला लागले. भुकेल्या लोकानी भुकेल्या काळवीटाचा केव्हाच फडशा पाडला होता. आता उरली-सुरली बोरं-सागरोही संपली. आकाशात आणि पोटात जाळ पडला. लोक चारी दिशांना वणवणू लागले.

जंबोजीच्या आजोबाच्या लहानपणीही असाच दुष्काळ पडला होता; पण ते म्हणायचे की, असे हाल झाले नाहीत. गवत, सुकले तरी खेजडी अमाप होती. तिच्या पाल्या–शेंगावर गुरं–माणसानी जीव जगवला होता; पण असा हा कल्पवृक्ष दोन पिढ्यात नाहीसा होत गेला होता आणि जंबारीच्या डोळ्यादेखत तर त्याचे बेणंच संपुष्टात आल होत.

जबोजीचं संवेदनाशील मन दुष्काळाच्या आगीनं पोळलंच; पण त्याहीपेक्षा होरपळलेले अफू–दारूच्या धुंदीत आपसात निरर्थक झुजणाऱ्या जाट–राजपुतांच्या वणव्यात ! दुष्काळाचा आतंक फैलावला होता, त्यातच व्यभिचार–व्यसनाला ऊत आला होता. लोक जबान आणि लंगोटाचे पक्के राहिले नव्हते. निसर्गाशी फारकत घेऊन टेढी पगडी बांधून अहपणाने आपलीच छाया निरखत चालले होते. जंबोजीने हे सगळं बदलायचं ठरवलं. मारवाडात जर पुन्हा आयुष्य उभं करायचं असेल तर माणसातलं माणूसपण जागं करायला पाहिजे होतं. खेजडी–बोर–केरीचे आच्छादन घालायला हवे होते. काळवीट चिंकारा बागडायला हवे होते. इ. स. १४८१ मध्ये जंबाजीने आपला *धर्म जगाला सागायला सुरुवात केली.*

## ' बीस और नोई – बिश्नोई ! '

जंबाजीच्या ' धर्माज्ञा ' त २९ मूलभूत आज्ञा होत्या म्हणून त्याच्या अनुयायानी नाव पत्करले बिश्नोई–बीस और नोई. दोन प्रमुख आज्ञा होत्या. ' हिरवे झाड केव्हाही तोडू नये आणि प्राणिहत्या कधीही करू नये ! ' जंभाजीचा भूतदयेचा आणि मानवतेचा सदेश फैलावत चालला. जाट, राजपूत, ब्राह्मण मोठ्या प्रमाणात त्याच्या पंथात सामील झाले. जंभेश्वरानी आयुष्याची पुढची ५१ वर्षे मननात, चिंतनात आणि आपल्या संदेशाचा प्रसार करण्यात घालवली. दिल्लीच्या सिकंदर लोदीला भेटून गोहत्या बद करवली. आपल्या अनुयायांमार्फत धरतीला सुजलाम्–सुफलाम् बनविण्याचे कार्य सुरू केले. हळू–हळू बिश्नोईंच्या खेड्याभोवती वृक्षवल्ली दाटी करू लागले. जमिनीचा कस वाढू लागला. गुरा–ढोरांना चारा मिळू लागला काळवीट–चिंकारांचे कळप बागडू लागले. मोर साद घालू लागले. बिश्नोईला जीवनाचा सूर आणि निसर्गाची लय सापडली. जीवन हरे–भरे झाले. बिश्नोई पंथ मारवाडातून राजस्थानच्या इतर भागात, मध्य–प्रदेश–हरयानात पसरू लागला.

मारवाडच्या मरुभूमीत परत एकवार हिरवळ दाटली, तरी इतरत्र रेतीस्तान पसरत होते. आणखी–आणखी रखरखीत होत होते. लोकाना कळत नव्हते. कळत होते ते वळत नव्हते. पिढ्यामागे पिढ्या गेल्या. राठोडाचे स्वातंत्र्य जाऊन ते मोगलाचे माडलिक झाले. *राव जोधाजीच्या वंशातल्या आठ पिढ्या लोटल्या आणि* महाराज अजितसिंग गादीवर आले.

अजितसिंग मोठा पराक्रमी राजा. औरंगजेबाने त्यांना पकडायला *जंग–जंग पछाडले;* पण शेवटी वयाच्या अवघ्या एकोणिसाव्या वर्षी त्यांनी जोधपूरची गादी पुन्हा मिळवली. सतत लढायाना तोंड देत गादी राखली. जन्म लढायाच्या धामधुमीत गेला. आयुष्याच्या शेवटी इ. स. १७३० मध्ये त्यानी जोधपूरला एक मोठा राजवाडा बाधायचं ठरवलं जोधपूरच्या सुदर लाल दगडाचा राजवाडा. तो बाधायला चुना हवा. तसा चुना या प्रदेशात भरपूर; पण एवढ्या चुन्याची कळी करायला जळणही भरपूर हवे. आता या वाळवंटात एवढ्या प्रचड भट्टीसाठी जळण पैदा करायचे म्हणजे काही सोपी गोष्ट नव्हती; पण जोधपूरपासून सोळाच मैलावर बिश्नोई लोकांचे खेजडली गाव होते. या खेजडली गावाजवळ चुन्याच्या खाणी होत्या आणि खेजडीची शेकडो झाडेही होती. झालं ! दिवाणांचा हुकूम निघाला ' खेजडली गावी चुन्याच्या भट्टया सुरू करा ! '

## रणचंडी–अमृतादेवी

कामगार कुऱ्हाडी घेऊन खेजडलीला पोहोचले. झाडावर घाव घालणार एवढ्यात गावचे बिश्नोई आडवे आले. त्यांनी विनविले. *' आम्ही ही झाडं जिवाभावाने वाढवली आहेत, जपली आहेत.* ती तोडणं आमच्या धर्माज्ञेविरुद्ध आहे. कृपा करून असा अधर्म करू

नका !' कुऱ्हाडी म्यान करून कामगार परतले. हकीम ( दिवाण ) भंडारी गिरधरदासच्या कानावर ही हकीकत गेली. महाराजांचे काम—हकिमाचा हुकूम आणि त्याची अशी ही अवज्ञा ! हकिमाचे माथे भडकले. फौज–फाटा घेऊन हकीम जातीने खेजडलीला पोहो-चला. कामगारांना हुकूम केला–' बिश्नोईंचे ऐकू नका, झाडं तोडा !'

## रणचंडी–अमृतादेवी

कामगार कुऱ्हाडी घेऊन सरसावले. सारा गाव खेजडीच्या वनात जमा झाला. हकिमाच्या विनवण्या करू लागला. ' झाडं तोडू नका. आमचा धर्म तुडवू नका !' हकीम हट्टाला पेटलेला. तो गरजला, ' घाव पडणारच, झाड तुटणारच !' पण हकिमाला माहीत नव्हतं की गावात होती एक रणचंडी – बिश्नोई–रामखोडची बायको अमृतादेवी. ती हकीमावर कडाडली, ' झाड तुटेल आम्ही तुटल्यावरच, आधी नाही !' तिने आणि तिच्या मुलींनी झाडांना मिठ्या घातल्या ! एवढा अप-मान आणि एका यःकश्चित बाईकडून ? हकिमाचे माथे भणाणले ! ' बघता काय ? घाला घाव– ' हकिमाचा हुकूम पुरा व्हायच्या आत चौघींचे झाडासकट तुकडे उडाले ! पुढचा कामी आला म्हणून मागे हटणारी अवलादच नव्हती ती ! अमृतादेवी आणि मुली धारातीर्थी पडल्यावर पुढे धावला रामखोड, मग चाचोजी, उधोजी, कान्होजी, किसनोजी. सर्वस्वाच्या या ' तागात ' (त्यागात) गावच्या बायकाही काकणभर मागे नव्हत्या. अमृतादेवी अपवाद नव्हती. पुरुषांच्या बरोबरीनेच गावच्या, दामी, देऊ, चिमाने उभे आयुष्य भिरकावून दिले. गावकऱ्यांना उचंबळून आलं. झाडा-झाडाला त्यांनी मिठ्या घातल्या हकिमाच्या मस्तकात खून चढलेला ! बघता–बघता ३६३ बिश्नोई वीर खेजडीच्या झाडासकट तोडले गेले !

खेजडीच्या बलिदानाची वार्ता चोहो दिशाना वाऱ्यासारखी फैला-वली. गावोगावचे बिश्नोई खेजडलीला धावत आले. दरबारात महा-राजांना वर्दी गेली. महाराज जातीने घोडेस्वार होऊन खेजडलीला आले पहातात तो काय शेकडो बिश्नोईंची जमात आक्रोश करीत आहे आणि हजारोंनी ' तागा 'ला सिद्ध आहे. महाराज सुज्ञ होते तिथल्या तिथे लोकाची माफी मागून महाराजांनी वचन दिले ,' यापुढे बिश्नोईच्या गावापासचे एकही हिरवे झाड तुटणार नाही. पशुहत्या होणार नाही. एवढेच नाही तर कोणी बिश्नोई दुसऱ्या गावी गेला आणि त्याला कोणी झाड तोडताना वा शिकार करताना दिसला तर मना करण्याचा अधिकार आहे. सर्वांनी तो मानलाच पाहिजे !'

खेजडलीचे बिश्नोई आजही आपल्या तेजस्वी परंपरेला जपत आहेत. हुतात्म्याच्या स्मरणार्थ उभारलेल्या ध्वजस्तभापेक्षा खेजडलीच्या आसमंतात बहरलेले खेजडी–बोरी आणि त्यातून निर्भयपणे विहरणारे कृष्णमृगाचे कळप आपल्याला खूप काही सांगून जातात !

¤

गौरादेवींनी आम्हाला गुगली टाकला, तसं काहीसं ' भोटियां '–बाबतही झालं....

आम्ही भोटियांचं ' आदिवासी ' म्हणून जे चित्र मनातल्या मनात रेखाटलं होतं, त्यापेक्षा वस्तुस्थिती खूप वेगळी आहे. तिबेटच्या सर-हद्दीवर राहाणाऱ्या या भोटिया वा भूतिया लोकाचे चीनशी पूर्वापार व्यापारी संबंध होते. त्यावर ते चागले गबरही झाले आहेत. शिक्ष-णाचे प्रमाणही चांगले आहे. चीन युद्धानंतर हा व्यापार बंद झाला तरी भोटिया लोकांनी आपल्या हुशारी व कष्टाळूपणाने अंतर्गत व्यापारात-ही चांगला जम बसवला आहे. उत्तमपैकी लोकरीचे व कलाकुसरीच्या गालिच्यांचे काम ते करतात.

आंदोलन व इतर गप्पा–गोष्टी होईपर्यंत गौरादेवीच्या सुनेने सत्तूचे पीठ व तूप टाकलेला मस्त गरमागरम चहा करून आणला. चहानंतर गौरादेवींनी आपणहून आपल्या नातवाबरोबर व आमच्याबरोबर फोटो काढून घेतले. विश्वासाची खूण एकदा पटल्यावर मग कसलेच आडबंद नव्हते. गौरादेवींना सलाम करून आम्ही निघालो, पार्वतीची नाना रूपं आठवत !

रेणीहून परतताना ट्रक पकडली आणि रात्री नऊ वाजता जोशी-मठला परतलो. वास्तविकतः अशा रात्रीच्या वेळी इथे प्रवास करत नाहीत; पण कसेही परतणे भाग होते. रात्रीच्या अंधारात, अंधारात उबलेल्या अंधुक पहाडातून प्रवास करणे हा एक विलक्षण अनुभव असतो–मृत्यूसारखा. एकाच वेळी ओढ आणि भीती लावणारा !

पाखी गाव बद्रीकेदारच्या रस्त्यावरच आहे. आमच्या मुशा–फिरीतले हे शेवटचे गाव. गाव अलकनदेची उपनदी गरुडगंगेच्या काठी आहे. १९७० च्या पुरामध्ये गावची बाजारपेठ, देवालय पार धुऊन गेले ! अजूनही पुराची व कडे–कोसळीची टांगती तलवार डोक्यावर आहे. म्हणूनच आंदोलकांनी गावकऱ्यांच्या मदतीने धोकादायक भागात वृक्षारोपण करून निसर्ग–सतुलन सावरण्याची कोशिश चाल-विली आहे. मजनु–भीमक आदि हजारो वृक्षाची लागवड केली आहे. आंदोलकांची कामाची पद्धतही महत्त्वपूर्ण वाटली. गावकऱ्यांच्या सल्ल्याने कोणते वृक्ष लावायचे, कुठे लावायचे, गुरं चराईच्या जागा व वाटा कोणत्या ठेवायच्या हे ते ठरवतात. ' डालियोका दगडया 'च्या साहाय्याने दीवारबंदी व खड्डे खोदतात. मग मात्र प्रत्यक्ष वृक्षारोपण, खत–पाणी, संरक्षण ही जबाबदारी गावकऱ्यांची. साहाजिकच त्यामुळे ' सरकारी वृक्षारोपण ' होत नाही ! मागे नागेश आणि मी पाखी गावच्या वृक्षारोपण शिबिराला आलो होतो तेव्हा खड्ड्याचे काम पूर्ण झाल्यावर त्यात शेणखत भरायला गावातील बाया–बापड्या अशा उत्साहाने मिरवीत आल्या की लग्नाची एखादी वरात वाटावी ! फक्त डोक्यावर कळशांऐवजी पाठीवर शेणखताच्या टोपल्या होत्या !

गावातील अनेक तरुण उत्साही ' वृक्ष–मित्र ' आहेत; पण ब्राह्मण –ठाकूर–हरिजनांची मिश्र वस्ती असलेल्या या गावात ब्राह्मणाचे व ब्राह्मण्याचे नि.सशय प्रस्थ जाणवले. संघाचे कार्यकर्ते पण त्याला अपवाद नव्हते. सामाजिक अभिसरणाच्या या अपूर्णतेचे परिणाम आज आंदोलनात थोडेबहुत जाणवतात. भविष्यात ते जास्त प्रकर्षाने जाणवतील. स्वतः चडीप्रसादजी ' चिपको–आदोलन ' म्हणजे केवळ झाडे वाचवण्याचा व वन–सवलतीचा लढा मानत नाहीत तर सामाजिक अन्याय, आर्थिक शोषणाच्या एका व्यापक युद्धाची एक आघाडी, एक माध्यम मानतात. सहाजिकच या दृष्टीने खुद्द आंदो-लकाना अजून खूप वाटचाल करायची आहे हे जाणवते. अर्थात एकाच वेळी सर्व आघाड्यावर लढणे शक्य होत नाही; पण निदान याचे जाणीवपूर्वक भान असावे अस मनोमन वाटत.

पाखी आमच्या मुशाफरीतले शेवटचे गाव. आता वेध लागले होते गोपेश्वरचे. प्रथम गोपेश्वर आणि तिथून १५ तारखेला श्रीनगरला सर्वांना भेटण्याचे !

( क्रमशः )

## पुस्तके

### प्रासंगिक–आर्थिक

# नवलकथा

सार्‍या जगताला तिन्ही त्रिकाळ व्यापून टाकणारी धर्माप्रमाणेच परंतु तरीही धर्मातीत अशी गोष्ट म्हणजे पैसा ! माणूस जाणता झाल्यापासून तो त्याने शेवटचा श्वास घेईपर्यंत जर कोणते एक भान त्याला सोडता येत नसेल तर ते म्हणजे अर्थकारण. रस असो वा नसो, इच्छा होवो वा न होवो प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरूपात अर्थव्यवहार हा प्रत्येकाला अटळ असतो.

आपल्याला ज्ञात असलेल्या इतिहासाचा मागोवा घेऊ जाता असे दिसते की, बहुतांशी प्रत्येक महत्त्वाचे युद्ध आर्थिक कारणापोटीच लढले गेले आणि प्रत्येक आक्रमण हे पैशाच्या त्यायोगे येणार्‍या सुबत्तेच्या हव्यासानेच पार पडले. सर्वच जेत्या आणि जित राष्ट्रांचा भूतकाळ याला साक्षी आहे आणि आज विसाव्या शतकाच्या शेवटीही सर्व घटनांचा मूलाधार अद्यापही अर्थकारणच आहे.

अर्थव्यवस्था, अर्थव्यवहार, व्यापार, बँकिंग अर्थशास्त्राची सर्व उपांगे, एवढेच नव्हे तर आर्थिक पिळवणुकीसारख्याही विषयावर जगात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर वाङ्मय निर्माण झाले आहे, होते आहे. आपला त्याच्याशी संपर्क इंग्रजीच्या माध्यमामार्फत नित्य येतो आहे. मात्र प्राचीन प्रगत सिंधु-संस्कृती आणि सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वीच्या कौटिलीय अर्थशास्त्राचा वारसा सांगणार्‍या भारतात मात्र अर्थविषयक लिखाण अद्यापिही इंग्रजीतसुद्धा दुर्मिळच आहे. म्हणून या पार्श्वभूमीवर गंगाधर गाडगीळ यांच्या 'आर्थिक नवलकथा' या मराठी लेखसंग्रहाचे महत्त्व जाणवते.

एकंदर चव्वेचाळीस पुस्तकांची संपदा नावावर असणार्‍या गाडगिळांचे हे चौथे अर्थविषयक पुस्तक. त्यांनीच प्रस्तावनेत लिहिल्याप्रमाणे १९७८–८१ या काळात 'महाराष्ट्र टाइम्स' व 'लोकसत्ता' या दोन वृत्तपत्रांमध्ये त्यांनी लिहिलेल्या प्रासंगिक लेखांचा हा संग्रह. तसा थोडासा जुना, कालबाह्य झालेला; परंतु तरीही आकडेवारी कालनिहाय संदर्भ वगळता आजच्या (किंबहुना सध्याच्या कोणत्याही) परिस्थितीत तंतोतंत लागू पडणारा.

'आपण समाजवादी असल्याचा' दावा गाडगीळ करीत नाहीत. त्यांच्या दृष्टिकोनातील पूर्वग्रह (असल्यास) बाजूस सारता आपल्याला आज जे काही आजूबाजूस दिसते आहे तो खरा समाजवाद, वर्गरहित अर्थव्यवस्था आहे काय ? सरकारने कायद्याच्या एका फटक्यासरशी जातिव्यवस्था, सरंजामशाही नाडणूक, पिळवळूक रद्द करून टाकली; परंतु आज त्याची जागा एका वेगळ्या वर्गव्यवस्थेने घेतली आहे. प्रमाणे, मापदंड बदलले; पण समस्या तशाच राहिल्या. किंबहुना काही प्रमाणात वाढल्याही !

आज समाजवादाच्या नावावर खरोखरच चालू आहे तो अनाचार आणि भ्रष्टाचार ! त्यात तसा प्रत्येकाचाच थोडाफार भाग आहे; परंतु राज्यकर्त्यांचा फार मोठा वाटा आहे. कारण या सर्व गोष्टी ते कळून-सवरून करत असतात. कधीही प्रत्यक्षात न येणार्‍या (हिंदी सिनेमालाही लाजवतील अशा) भपकेबाजपणात स्वप्नांची, आश्वासनांची जनतेवर खैरात करून, आपल्या अशा कृतींना तत्त्वज्ञानाचा मुलामा देण्यात तर त्यांच्याइतके वाकबगार कोणी नाही. परंपराप्रिय भारतीय जनता मग अशाच स्वप्नरंजनावर हा ओढगस्तीचा गाडा पुढे रेटते ... पिढ्यानपिढ्या निमूटपणे कष्ट करण्याच्या भांडवलावर !

गाडगीळ केवळ सरकारच्या, तथाकथित समाजवादाच्या चुकांकडे अंगुलिनिर्देश करून थांबत नाहीत. सोबत भरपूर उदाहरणेही देतात. 'फायद्यात चालणार्‍या खाजगी उद्योगांचे गळे समाजवादाच्या नावावर आवळून दरवर्षी हजारो कोटींचे नुकसान करणारे ऐतखाऊ सार्वजनिक ऐरावत निर्माण करणे आणि त्यासाठी सतत करवाढ व चलनवाढ करणे म्हणजेच समाजवाद काय ?' असा बोचक प्रश्न ते विचारतात

आपले म्हणणे त्यांनी सुस्पष्टपणे आणि सहज लक्षात येईल अशा रीतीने मांडले आहे. सरकारीकरण, राष्ट्रीयीकरण झालेल्या प्रत्येक संस्थेची तव्येत त्यानंतर बिघडतच गेल्याचे त्यांनी दाखवून दिले आहे. विमा कंपन्या, बँका, पोलाद कंपन्या, कोळसा कंपन्या दरवर्षी अब्जावधींचा तोटा करीत आहेत...त्याचबरोबर जरुरीपेक्षा किती तरी अधिक कामगारभरती, वाढती निष्क्रियता इत्यादींमुळे सरकारी पर्यायाने देशाच्या तिजोरीवरील हा बोजा दरवर्षी चक्रवाढ वेगाने वाढतोच आहे. प्रकल्पांच्या वाढत्या कालावधीमुळे नुकसान होणे, परदेशी कंत्राटे रद्द होणे हे तर नेहमीचेच आहे आणि त्यात भर पडते आहे चलनवाढीमुळे सतत कुरतडल्या जाणार्‍या चलनाच्या क्रयशक्तीची.

सर्वांत खेदाची गोष्ट म्हणजे याचे सोयरसुतक कोणालाच नाही. वारेमाप आश्वासने, प्रादेशिक दृष्टिकोन, नियोजनाचा अभाव अशी संकटे सर्व बाजूंनी येत असताना अर्थव्यवस्था तरी कशी तग धरणार ? जमा व खर्च या दोन्ही तोंडांची मिळवणी करण्यासाठी मग शेवटी परकी (व अंतर्गत) कर्जे भरमसाठ करवाढ, तुटीचा अर्थभरणा व चलनफुगवटा या सर्वांची कास धरावी लागते. परिणामस्वरूपी महागाई आणखीनच भडकते.

या होमामध्ये आहुती पडते तुमच्या-आमच्यासारख्या सामान्य लोकांची. आयुष्यातील महत्त्वाची ३०–४० वर्षं माना मोडून काम करणार्‍या, पोटाला चिमटा घेऊन म्हातारपणासाठी थोडी पुंजी मागे ठेवणार्‍या नोकरदारांची. वाढत्या महागाईचा सर्वांत मोठा जबर फटका त्यांनाच बसतो आणि बघता-बघता आयुष्यभर जमलेली पुंजी कवडीमोलाची होऊन बसते. व्याज तर सोडाच; पण मुद्दलही कापरासारखे उडून जाते !

वानगीदाखल गाडगिळांनी उदाहरण दिले आहे. एक लाख छप्पन्न हजार कोटी रुपये इतक्या (दर्शनी) प्रचंड रकमेच्या सहाव्या पंचवार्षिक योजनेचे ('वाढता वाढता वाढे, भेदिले सूर्यमंडळा !") त्यातील तरतुदी. परकी कर्जे, कर्जफेडी, तुटीची रक्कम आणि शेवटी किंमतवाढ लक्षात घेता या रकमेची प्रत्यक्षात काय गत होते हेही त्यांनी दाखवून दिले आहे.

खरा कल्पनेतील समाजवाद म्हणजे वर्ग-

रहित, वर्णरहित समाज; पण आपण आपल्या समाजवादाने वर्गच जास्त निर्माण केले आहेत. सरकारी प्रशासक, नोकरदार, बँक कर्मचारी, नेते, अनुयायी, कमिटयाचे मेंबर, संघटित कामगार आदी अनेकजण. प्रत्येकजण आपल्या कुवतीप्रमाणे, मगदुराप्रमाणे स्वार्थ साधण्यात मश्गुल आहे आणि हे सर्व चालू आहे समाजवादाच्या नावावर ! सामान्य माणसाला कोणी विचारतही नाही किंवा तोही कोणाला जाब विचारण्याच्या अवस्थेत नाही याचे गाडगिळांना दु.ख आहे. हेच दु.ख त्यांनी आपल्या खुसखुशीत संवादपूर्ण शैलीमध्ये वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. हे पूर्णपणे ललित लेखन नव्हे, असे त्यांनी प्रस्तावनेतच स्पष्ट केले आहे. आपले म्हणणे मुद्देसूद रसाळ व सरळ शैलीत, सुबोधपणे त्यांनी समोर मांडले आहे, भाषेला कोणतेही शब्दजडत्व न येऊ देता !

विख्यात चित्रकार श्री. शि. द. फडणीस यांचे मुखपृष्ठही तितकेच अर्थवाही आहे. सामान्य करदात्याच्या मानेला फास लावून पोसलेल्या सरकारी पांढऱ्या हत्तीची तारेवरील कसरत त्यातून सर्वार्थाने प्रतीत होते.

या संग्रहातील महत्त्वाची खटकणारी बाब म्हणजे त्यातील 'तोचतोपणा'. कदाचित् वृत्तपत्रातील लेखांच्या संग्रहामुळे हे झाले असावे : सुमारे दोन-अडीच वर्षांच्या कालावधीमध्ये वृत्तपत्रामधून प्रसंगोपात प्रसिद्ध झालेल्या या लेखामध्ये तीच शैली, तसेच उल्लेख येणे साहजिकच आहे. वृत्तपत्रामध्ये ते जाणवतही नाहीत. मात्र हे सर्व लेख आता पुस्तकरूपाने एकत्र वाचताना ते जाणवते हे खरे !

दुसरे म्हणजे या संग्रहात अगदी ठराविक विषयांनाच स्पर्श केला आहे. सरकारी करव्यवस्था, अदाजपत्रक, सार्वजनिक प्रकल्प इत्यादी. बँकिंग, खाजगी क्षेत्रे, परदेशी व्यापार या विषयांना पूर्णपणे फाटाच दिला आहे. कदाचित् ते विषय यानंतर हाताळले जातील.

मात्र अर्थशास्त्र या जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणाऱ्या महत्त्वपूर्ण विषयावर मराठीमध्ये लेखन एकूणच कमी आहे. उपलब्ध आहेत ती केवळ काही 'वादावर' लिहिलेली पुस्तके किंवा शाळा-कॉलेजांच्या अर्थशास्त्रविषयाच्या अभ्यासक्रमाच्या अनुरोधाने इंग्रजी क्रमिक पुस्तके समोर ठेवून लिहिलेली 'भाषांतरे !' साहजिकच तीही समजावयास इंग्रजी पुस्तकाहूनही दुर्बोध व क्लिष्ट. अर्थकारण सर्वसामान्यांसाठी सोपे करून सांगणारे लेखन (त्यामुळेच त्यांचे वाचनही) मराठीत जवळजवळ नाहीच आणि म्हणूनच गंगाधर गाडगिळांच्या या सुबोध लेखसंग्रहाची महती अधिक !

—प्रभाकर खोले

आर्थिक नवलकथा
गंगाधर गाडगीळ
सुपर्ण प्रकाशन, पुणे ९.
पृष्ठे १४०; किंमत २२ रुपये.

---

## 'प्रिस्क्रिप्शन फॉर डेथ'

---

अमेरिका किंवा युरोपमधील प्रगत देशांतील सरकारे आपल्या नागरिकांच्या आरोग्याबद्दल फार जागरूक असतात. तिकडे डबाबंद अन्न व खाद्यपदार्थांचे अनेक प्रकार आहेत; परंतु ते सर्व पदार्थ अत्यंत काळजीपूर्वक तपासून मगच त्यांच्या विक्रीला संमती दिली जाते. बाजारामध्ये विक्रीसाठी येणारी औषधेही सूक्ष्मपणे तपासली जातात व त्यात काही अपायकारक नाही ना याची खात्री केली जाते. तसेच एखाद्या औषधाचे काही दुष्परिणाम होण्याची शक्यता असेल किंवा त्या औषधाचे काही विशेष पथ्य असेल तर ती सर्व माहिती औषधाबरोबरच्या कागदावर, वेष्टणावर छापणे सक्तीचे असते. बाजारात विकली जाणारी औषधे इस्पितळाच्या व सरकारच्या प्रयोगशाळांत सतत तपासली जातात. प्रचारात आल्यानंतरसुद्धा एखाद्या औषधात काही दोष असल्याचे लक्षात आले तर त्या औषधावर सरकार बंदी घालते. ते औषध बाजारातून काढून घेतले जाते. डॉक्टरांच्या मार्गदर्शनासाठी आरोग्यखाते सर्व औषधाची माहिती—औषधातील रासायनिक द्रव्ये, त्यांचे प्रमाण, त्यांचे आनुषंगिक परिणाम (Side-effects) व त्यावरील उपाय—देणारे 'गाईड' प्रकाशित करते.

भारतातही अन्न व औषधे यांवर नियंत्रण ठेवणारे सरकारी खाते आहे; परंतु ते म्हणावे तितके कार्यक्षम नाही. आफ्रिका, आग्नेय आशिया किंवा दक्षिण अमेरिकेतील कित्येक देशांत असली काहीच व्यवस्था नसते. येथील डॉक्टराना औषधकंपन्या जी माहिती पुरवतील (मुख्यत: जाहिरातीतून) तीवरच अवलंबून रहावे लागते. 'तिसऱ्या जगातील' डॉक्टराना इतके काम असते की, स्वत: प्रयोग करण्याइतका किंवा सविस्तर वाचण्याइतका वेळही त्याना मिळत नाही. या सर्व परिस्थितीचा औषधकंपन्या मोठाच फायदा उठवतात. विशेष म्हणजे या सर्व बहुराष्ट्रीय कंपन्या युरोप किंवा अमेरिकेतल्याच आहेत. पाश्चात्य देशांत अपायकारक म्हणून बंदी घातलेली, कडक निर्बंध असलेली औषधे या कंपन्या आफ्रिका, आग्नेय आशिया प्रदेशातील देशांत सर्रास विकत असतात. त्यांची विक्री वाढावी म्हणून वर्तमानपत्रे, रेडिओ, टी. व्ही. इ. माध्यमातून प्रचंड जाहिरात करीत असतात. तसेच डॉक्टराना लाचही देतात. अर्थात या सर्वांच्या मोबदल्यात या कंपन्याना कोटयवधी डॉलर्सचा फायदा होत असतो.

औषधी कंपन्यांच्या या प्रकारच्या भ्रष्टाचाराचा सॅन–फ्रॅन्सिस्को येथील कॅलिफोर्निया विद्यापीठातील औषधी–विज्ञानाचे प्राध्यापक श्री. मिल्टन सिल्व्हरमन यांनी तपशीलवार अभ्यास केला आहे. ते, त्यांच्या पत्नी व विद्यापीठातील त्यांचे सहाय्यक डॉ. फिलिप ली व कु. लायडेकर ही चौघे गेली आठ वर्षे या भ्रष्टाचाराची माहिती गोळा करीत होते. या माहितीच्या आधारे आता त्यांनी 'प्रिस्क्रिप्शन फॉर डेथ' या नावाचे १७२ पृष्ठांचे एक पुस्तक प्रसिद्ध केले आहे. पुढील नावनिशीवार माहिती त्या त्या अहवालवजा पुस्तकातून घेतली आहे.

फिलिपाइन्समध्ये क्लोरॅम्फेनिकॉल हे जालिम प्रतिजीवांतक (Antibiotic) अगदी साध्या फ्लूवर किंवा कातडी खरखरीत होणे, खाज सुटणे यासाठी डॉक्टर लिहून देतात. या औषधाच्या सेवनाने एक प्रकारचा प्राणघातक अॅनिमिया होण्याची शक्यता असते; पण फिलिपाइन्समधील डॉक्टरांच्या 'मार्गदर्शकात' ही माहिती दिलेलीच नाही. केनियात भूक मंदावणे, गळून जाणे, कसेसेच

वाटणे अशा किरकोळ तक्रारीवर डॉक्टर स्टेरॉइड हार्मोन्स लिहून देतात. हे औषध सतत जास्त प्रमाणात घेतल्यास मुलीना टक्कल पडते व दाढी उगवते. इंडोनेशियात क्लायोक्विनॉल हे भयंकर औषध 'एंटरो व्हायोफॉर्म' या पेटंट नावाने रस्त्यावरील अगदी किरकोळ दुकानात पेपरमिंटच्या गोळ्यासारखे मिळते. आमाश / हगवणीवरील हे जहाल औषध गुणकारी असले तरी त्यामुळे तीव्र पोटदुखी होण्याचा संभव असतो व कधीकधी मेंदूला कायमचा अधूपणा येतो. यामुळेच जपानने त्या औषधावर १० वर्षांपूर्वीच बंदी घातली व अमेरिकन बाजारातूनही ते तेव्हाच काढून घेण्यात आले; परंतु इंडोनेशिया किंवा भारतातही त्याचा पुरवठा चालूच आहे. अशा प्रकारची शेकडो उदाहरणे 'प्रिस्क्रिप्शन फॉर डेथ' या पुस्तकात दिली आहेत.

श्री. सिल्व्हरमन व त्याचे सहकारी यांचा असा आरोप आहे की, औषधे तयार करणाऱ्या मोठमोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या सरळसरळ दुटप्पी धोरणाने वागतात. एखाद्या जहाल औषधाबद्दल सावधगिरीची सूचना, अनुपान किंवा त्यावरील उतारा या गोष्टीची माहिती औषध विकतानाच द्यायला पाहिजे. तसेच डॉक्टरांनाही या औषधाची सर्वांगीण माहिती असली पाहिजे. बहुराष्ट्रीय कंपन्या पाश्चात्य देशात औषधे विकताना ही खबरदारी घेतात; पण केनिया, भारत, सिंगापूर मलेशिया इ. अविकसित राष्ट्रात ती औषधे विशेष काळजी न घेता सर्रास विकतात. अपायकारक म्हणून सिद्ध झालेल्या टेट्रासायक्लिन,क्लायोक्विनॉल,ॲमिनोपायरिन... अशा किती तरी औषधावर अमेरिका व युरोपीय राष्ट्रांत बंदी घातलेली आहे; परंतु बहुराष्ट्रीय कंपन्या तीच औषधे निरनिराळ्या पेटंट नावांनी 'तिसऱ्या' जगात विकतात.

औषधे निर्माण करणाऱ्या कंपन्यात स्वित्झर्लंडच्या सीबा-गायगी कंपनीचा जगात चौथा क्रमांक लागतो. ही कंपनी क्लायोक्विनॉल व ॲमिनोपायरिन ही औषधे आपल्या खास नावानी अविकसित देशांत विकते असे श्री सिल्व्हरमन यांना आढळून आले. हेक्स्ट (Hoechst) ही जर्मन व एस. आर. स्क्विब ही अमेरिकन या कंपन्या आग्नेय आशियातील देशात टेट्रासायक्लिन विकतात; पण त्याने मुलाचे दात बिघडण्याची शक्यता आहे, अशी सावधगिरीची सूचना देत नाहीत. सिंगापूर, मलेशिया इ. देशात सिंटेक्स कार्पोरेशन ही कंपनी संततिप्रतिबंधक गोळ्या विकते; पण त्या घेताना काय धोके संभवतात ते गिऱ्हाइकांना किंवा डॉक्टराना कळू देत नाही. आशियाई बाजारात पार्क-डेव्हिस क्लोरॅम्फेनिकॉलची विक्री करते; पण त्या औषधाच्या सेवनाने निर्माण होणाऱ्या दोषांची माहिती पुरवीत नाही.

आपली अशी सदोष व अपायकारक औषधे जास्त प्रमाणात विकली जावीत म्हणून बहुराष्ट्रीय औषधकंपन्या अनेक लेबुरे उपाय योजतात. काही कंपन्या डॉक्टराना व इस्पितळाच्या शासकीय अधिकाऱ्यांना स्कूटर्स, मोटारी इ ची लाच देतात. कित्येक वेळा त्यांच्या मुलां-मुलींच्या कॉलेज-शिक्षणाचा खर्च परस्पर भागवतात. डॉक्टरांना सॅम्पल औषधे फुकट देतात व ती 'विकलीत तरी चालतील' असे सांगतात. फिलिपाइन्समधला एक एजंट तर अश्लील चित्रपट (ब्लू फिल्म्स) व वेश्या यांचाही वापर करताना दिसून आला असे श्री. सिल्व्हरमन यांनी नमूद केले आहे.

'प्रिस्क्रिप्शन फॉर डेथ' चा बहुतेक सर्व औषधनिर्मात्यांनी कडक शब्दात निषेध केला; काही कंपन्यांनी आपली भूमिका विशद करणारी निवेदने काढली; पण कोणीही यापेक्षा जास्त काही केले नाही. आंतरराष्ट्रीय औषध निर्माता संघटनेच्या (I. F. P. M. A.) वॉशिंग्टनमध्ये भरलेल्या अधिवेशनात असे सांगण्यात आले की, 'कोठे तरी अपवादाने घडलेल्या एखाद दुसऱ्या गोष्टीवर' 'प्रिस्क्रिप्शन' मध्ये अवाजवी भर देण्यात आला आहे. तसेच 'अविकसित राष्ट्रात औषधकंपन्यापुढे असणाऱ्या प्रमुख प्रश्नांचा व अडचणीचा श्री. सिल्व्हरमन यांनी काहीच विचार केलेला नाही. जनतेतील अज्ञान, पुरेसे ज्ञान नसलेले डॉक्टर, रेफ्रिरेटर व तत्सम साधनांचा अभाव या व अशा इतर अडचणीवर मात करून रोग्यांना औषध पुरवणे ही साधी गोष्ट नाही !' पार्क-डेव्हिस, डो (Dow) केमिकल्स आणि हेक्स्ट यानी असा खुलासा केला आहे की, आमचे धोरण जगभर सारखेच आहे. आमच्या औषधाचे जर कुठे दुरुपयोग होत असतील तर त्याची कारणे औषधे आयात करणाऱ्या राष्ट्रातच आहेत. स्क्विब आणि सिंटेक्स कार्पोरेशनचे म्हणणे असे की, आमच्या औषधाची सर्व माहिती द्यायला आम्ही तयार आहोत; पण त्या त्या देशातील 'मार्गदर्शके' काय छापतात आणि काय छापणार नाहीत हे आम्ही पहात नाही. सीबा-गायगीचा प्रवक्ता म्हणाला की, आशियाई राष्ट्रात ॲमिनोपायरिनसारखी औषधे विकण्याचा परवाना आमच्या जवळ आहे म्हणून ती औषधे आम्ही तेथे विकतो. एखाद्या औषधात कोणती द्रव्ये आहेत हे छापण्याबद्दल जेथे जसे नियम असतील तेथे आम्ही ते काटेकोरपणे पाळतो. त्या देशानी काय नियम करावेत हे आम्ही ठरवू शकत नाही.

औषधकंपन्यांची ही उत्तरे आणि त्यांच्या सर्व युक्त्याही श्री. सिल्व्हरमन व त्याचे सहकारी जाणून आहेत. आशिया व आफ्रिका खंडातील कित्येक अविकसित देशांत औषधीद्रव्यासंबंधी सविस्तर व काटेकोर नियम नाहीत हे त्यांना माहीत आहे. तसेच नियम असले तरी त्यांची अंमलबजावणी होईलच असे नसते. अमुक एका औषधात एखादे रासायनिक द्रव्य किती प्रमाणात आहे हे ठरविण्यासाठी लागणारी प्रयोगशाळा व तज्ज्ञ माणसे प्रत्येक देशात असतीलच असे नाही. ही सर्व परिस्थिती असली तरी औषधकंपन्यांनी आपली जबाबदारी ओळखली पाहिजे एवढीच श्री. सिल्व्हरमन यांची अपेक्षा आहे. एखादे औषध एखाद्या देशातच अपायकारक असते असे नाही. म्हणून अपायकारक ठरलेले औषध निर्माणच करू नये हे औषधकंपन्याना सहज शक्य आहे. आपली ही जबाबदारी ओळखणाऱ्या मर्क ॲण्ड कं. व एलिलिली ॲण्ड कं. या दोन कंपन्या आहेत असे श्री. सिल्व्हरमन यांनी मुद्दाम नमूद केले आहे. त्यांना एवढेच म्हणावयाचे आहे की, चांगली औषधे विकूनही फायदा मिळवता येतोच !

—भा. रा. बापट

'टाइम' वरून वारणानगर

# सात आंधळे आणि एक अप्पू : पृष्ठ ११ वरून



बरोबरच सकाळपासून हेलिकॉप्टर्स स्टेडिअमवर घिरट्या घालून निरीक्षण करावयास लागतात. सुरक्षा विभागात फार वरचा अधिकारी असलेला माझा एक मित्र मला तरीही निरोप पाठवतो, कार्यक्रमाला जाण्याचा वेडेपणा करू नकोस ! केवळ म्हणूनच मी या कार्यक्रमाला जावयाचे नक्की करतो. आपल्याला असले काही बघावयासच अधिक आवडते हे नाकारण्यात काय अर्थ आहे ?


¤

स्टेडिअमवर जाताना माझी गाडी वाटेत अडवली जाते. काही खास गाड्या सोडून स्टेडियमच्या जवळपाससुद्धा गाडी उभी करावयास परवानगी नाही. चार-पाच मैलांवर असलेल्या प्रगती–मैदानासमोर गाडी उभी करावी लागेल. तेथून बस घ्यावी लागेल. माझा ड्रायव्हर दिल्लीकर आहे. पुरा बेरकी ! गाडीच्या चाव्या माझ्या हातात सोपवत तो समोरच्या गर्दीत नाहीसा झाला. पाच मिनिटात 'खास पाहुण्यांसाठी' म्हणून असलेला गाडीवर चिकटवण्यासाठी असलेला कागद तो घेऊन आला. कोणा हवालदाराला पन्नास रुपये देऊन त्याने तो मिळविला होता. दिल्लीत काय आणि कसे चमत्कार होतात त्याचा तो पुरावा होता. स्टेडिअमवर जे होणार त्याची ती चाहूल पण होती. पास बरोबर घेऊन गेलेल्या हजारो लोकांना निष्ठुरपणे स्टेडियमवरून परत पिटाळण्यात आले होते. हे दोन-तीन कारणांनी झाले होते. स्टेडियम उद्घाटनसमारंभाला ओथंबून वाहात होता म्हणून कोणीही कितीही आर्जवून सांगो. पोलिसांना असलेल्या आदेशाप्रमाणेच स्टेडियम ८०–८५ टक्क्यांहून अधिक भरावयाचे नव्हते. कोणतीही आफत आली तर परिस्थिती हाताळावयास सोपे जावे म्हणून हे केलेले होते. त्यातून प्रत्येक रांगेत दोन-तीन साध्या वेशातील पोलीस पण बसवले होते. त्यांच्यासाठी आणखी दहा टक्के लोकांना प्रवेश नाकारणे जरुरीचे होते. साऱ्या कार्यक्रमाच्या रंगीत तालमी एवढ्या झाल्या होत्या की, स्वयंसेवक, पोलीस, राखीव पोलीस, सीमा सुरक्षा दलाचे लोक यांचे छान साटेलोटे जमले होते. आपल्या ओळखीच्या अनेकांना त्यांनी 'गेटावर भेटावयास' सांगितले होते. हे सारे होऊनही काही हजार लोकांनाच परत जावे लागले, याचे कारण इतकेच की, काही तरी अकल्पित होणार असे समजून तिकिटे असलेले अनेक लोक घरीच बसले होते !

–गाडी उभी करावयाचा खास पास तर मिळाला; पण तेथे उतरल्यावर महाभारत होते. पोलीसतपासणी म्हणजे काय ते आयुष्यात प्रथमच बघावयास मिळाले. काही तपासावयाचे त्यांनी बाकी ठेवले नाही. वाटेत कुत्रे उभे होते. वासावरून दारूगोळा शोधावयास तयार केलेले ते कुत्रे भेदक नजरेने जाणाऱ्या माणसांकडे बघत होते. गेल्या चार दिवसांत हे कुत्र्यांचे पथक स्टेडियमच्या कानाकोपऱ्यातून फिरवले होते. ही एवढी सारी सुरक्षाव्यवस्था असूनही स्टेडियमच्या बाहेर एक निदर्शन सुरू होते. सात अपंग खेळाडू ते निदर्शन करत होते. इराण–इराक युद्धात पांगळा झालेला, मॉंट्रियल ऑलिंपिक सामन्यातील कुस्तीचा सुवर्णपदकविजेता मोरादाली शिरानी त्यांचे नेतृत्व करत होता. अमेरिकन साम्राज्यवाद आणि युद्ध यांच्यावर बहिष्कार घाला म्हणून त्यांचे सांगणे होते. शिरानीची नजर मनावर कोठे तरी एक चरा ओढून गेली !

¤

स्टेडिअममध्ये आलो आणि मनावरचा ताण क्षणात नाहीसा झाला. रंगाच्या आणि सुरांच्या प्रवाहात आकंठ बुडून गेलो. आपला देश






एशियाडनंतर आता ऑलिंपिक्सच्या पदकामागे—

**समाज नेहमीच आपल्या संस्कृतीपेक्षा हीरोंच्यावर अधिक प्रेम करतो. आज आम्हा सर्वांना चीनच्या ‘ जीआनी वू ’ने झपाटलंय ! या वेळी म्हाताऱ्या बिजोंदरवर कोण विश्वास ठेवणार ?**

हे सारे करू शकतो हा विश्वास बसू नये असा सुखद अनुभव होता. इंदिराजी आल्यावर, आज त्यांचा वाढदिवस आहे याची आठवण करून देण्यात आली. साऱ्या स्टेडियमने उत्स्फूर्तपणे जोरदार टाळ्या वाजवल्या. इंदिराजी या स्वागताने मनोमन सुखावलेल्या दिसल्या. बरोबर तीनच्या ठोक्याला राष्ट्रपती आले आणि त्यानंतर ठरल्या-बरहुकूम सेकंदाप्रमाणे नव्वद मिनिटे पुढील कार्यक्रम झाला. प्रत्येक प्रांताचे नृत्यसंघ होते. खरे पाहता २६ जानेवारीला होतो त्यापेक्षा हा कार्यक्रम वेगळा नव्हता; पण रंगसंगती अधिक चांगली होती. दर वेळी महाराष्ट्र कोळयांचा नाच वा लावणी असा लोकांना न आवड-णारा कार्यक्रम करतो. या वेळी कसलेल्या संघांनी साऱ्या प्रेक्षकांना दिवाणे करत लेझमी वाजवल्या. लेझीम वाजवत वाजवत सहजपणे आशियाडचे जंतरमंतर आणि अप्पू करून दाखवले. केरळातून आण-लेले शृंगारलेले हत्ती डौलात हिंडले. जी ज्योत पुढील काही दिवसात दहा लाख रुपयांचा गॅस खाणार ती पेटवली गेली. रंगीबेरंगी कपड्यांतील खेळाडूंनी संचलन केले. भारतीय चमूचे नेतृत्व करण-सिंग करत होते. जपानी खेळाडूंनी आपल्या सर्वांत उंच आणि सर्वांत बुटक्या खेळाडूला जवळ उभे करून कार्यक्रमाला खेळाडूपणाचा स्पर्श केला. एकाची उंची होती सहा फूट पाच इंच. दुसऱ्याची चार फूट चार इंच. आपल्या चमूसमोरून स्त्री खेळाडूने जाणे इस्लामच्या विरुद्ध आहे म्हणून त्याला नकार देणाऱ्या इराणी खेळाडूंनी आपल्या गमतीजमतीने लोकांची मने जिंकली आणि स्त्री प्रेक्षकांच्याकडे उत्साहाने हातातील फुले फेकली ! पण प्रेक्षकांनी सर्वांत अधिक टाळ्या वाजवून स्वागत केले ते पाकिस्तानी खेळाडूंचे ! हे का घडले ? दूर झालेल्या भावांच्यात कोणती शतकाशतकांची नाती गुंतून पडलीत ? लोकांचा आनंद शिगेला पोचला तो प्रचंड अप्पू आकाशात सोडला आणि दोन हजार फुगे आणि पाच हजार पांढरीशुभ्र कबुतरे आकाशात उडाली तेव्हा ! साऱ्या कार्यक्रमाला परिकथेतील वातावरणाचा गंध होता. नरेंद्र शर्मांनी लिहिलेल्या आणि पंडित रविशंकर शर्मांनी स्वरबद्ध केलेल्या ‘ आनंद मंगल मंगलम् अथ स्वागतम् शुभ–स्वागतम् ’ या गाण्यांनी ! आपण कोठल्या कोठे अंतराळात फेकले जात आहोत असे वाटत असतानाच अमिताभने वाचलेले त्याचे इंग्रजी भाषांतर सुरू झाले. रुबाबात उभे राहून अमिताभने लोकांना नेहरूंच्या थाटात हात हलवून अभिवादन केले. रंगांच्या आणि स्वरांच्या लाटांवर सारे प्रेक्षक हेलावत होते.–बाहेर पडलो त्या वेळी आयुष्यातील एक दिवस वसूल झालाय, तो खराखुरा जगलोय असे वाटत होते.

साऱ्या दिल्लीकरांनी हा कार्यक्रम पाहिला. साऱ्या दिल्लीला त्या दिवशी दुपारी सुट्टी होती. सारे रस्ते त्या वेळी सूर्यग्रहणाच्या वेळी मागे झाले तसे झाडून निर्मनुष्य झालेले होते म्हणे ! सरकारने अनेक ठिकाणी दूरदर्शन लावलेले होते.–पण लोक शेवटी अजब असतात. आम्हा कार्यक्रम पहावयास गेलेल्या लोकांना कोणीच हा कार्यक्रम कसा वाटला म्हणून विचारले नाही. रंगीत दूरदर्शनवर हा कार्यक्रम पाहणाऱ्याला प्रत्येकजण हा सोहळा कसा वाटला ते विचारत होते. रंगीत दूरदर्शनवर हा कार्यक्रम पाहणारे भाग्यवान लोक देहभान विसरून पुन्हा पुन्हा तेच रंगसंगतीचे चऱ्हाट लावत होते. घरात रंगीत दूरदर्शन असलेल्या लोकांनी घरावर ‘ हाउसफुल्ल ’चे फलक लावावयाचेच काय ते बाकी ठेवले होते.–आपल्या दृष्टीने आशि-याडचे हिरो खरे दोनच आहेत. एक अप्पू आणि दुसरे रंगीत दूरदर्शन ! मात्र तेरा नोव्हेंबरच्या ‘ कॉमर्स ’मध्ये सरकारचा एक अस्वस्थ करणारा लेख आहे. साखर, तांदूळ, सिमेंट या जीवनावश्यक वस्तू निर्यात करून भारत शेकडो कोटी रुपयांचे परकीय चलन कसे



मिळवतो आहे व ते सारे पैसे रंगीत दूरदर्शनवर कसे उधळले जाताहेत ते त्यात साधार आकडेवारीने दाखवलंय ! हा लेख या वेळी वाचला नसता तर बरे झाले असते !

---

## ६

---

आमच्या लहानपणी कसोटी सामने सुरू झाले की,पावसाळी छत्र्यांप्रमाणे आमचे क्रिकेटचे खेळ सुरू होत– आज माझ्या आठ वर्षांच्या मुलीने आणि तिच्या मैत्रिणींनी घरातल्या साऱ्या गाद्या गोळा करून त्यावर उलटया-सुलटया कोलांटया उडया मारावयास सुरुवात केली आहे. त्या सर्वांच्यात माझ्या मुलीचा भाव अधिक, कारण भारतातर्फे खेळणारी मुलगी करंदीकर म्हणजे कर वरून मराठी वगैरे असावी म्हणून! साऱ्या दिल्लीकरांना चिनी आणि जपानी कसरतपटूंनी वेड केलंय. रबराप्रमाणे त्यांची शरिरे लवचिक आहेत. वेताच्या छडीप्रमाणे ती लवलवताहेत. तालबद्ध, लयबद्ध! बाकी सारे स्टेडिअम मोकळे जात असताना कसरतपटूंच्या भोवतालचे प्रेक्षागृह तुडुंब भरून वाहतंय. आम्हा लोकाचे एक बरे आहे. खेळ कसे बघावयाचे असतात हे सुद्धा आम्हाला नीटपणे माहीत नसते. कसरतपटूंचे गुण वगैरे आता कुठे थोडे थोडे लक्षात यावयास लागलेत. दूरदर्शनसमोर बसून पंचांनी सांगण्याच्या आधी आपण गुण सांगावयाचे व त्यावर पैजा खेळावयाच्या येथवर दिल्लीकरांची प्रगती झाली आहे. कसरतपटू हे दिल्लीकरांचे आज हिरो आहेत. चीनच्या सोळा वर्षांच्या जीआनी वूने दहापैकी दहा गुण मिळवून रशियाच्या नाडिआने यापूर्वी केलेला उच्चांक गाठला. त्या वेळी आपल्या घरच्याच कोणी तरी पराक्रम केलाय असा लोकांना आनंद झाला. लोक खेळाडूंच्या किती चटकन प्रेमात पडतात !

आता अशा वेळी या म्हाताऱ्या बिजंदरवर कोण विश्वास ठेवणार? त्याचे ऐकावयास तरी कोणाला कोठे वेळ आहे? बिजंदर हा राजस्थानातील वंजारी म्हणजे डोंबारी माणूस. आपल्या परिवारासह तो काल इंद्रप्रस्थ स्टेडिअमवर हे कसरतीचे प्रयोग पहावयास गेला होता. स्टेडिअमवर चिनी आणि जपानी खेळाडूंना पडणाऱ्या टाळया पाहून हा म्हातारा बेफाम झाला. शेलारमामाच्या आवेशात म्हणाला, 'साहेब, मला परवानगी द्या. कदाचित माझे डोके फुटेल; पण या वयात यातील प्रत्येक कसरत मी याच्यापेक्षा अधिक चांगली करून दाखवेन!'–त्याचा मुलगा भूरानट याने नतर 'हिंदुस्थान टाइम्स'च्या वार्ताहराची भेट घेतली- ' देशभर आपल्या बिरादारीतील दहा हजार डोंबारी ढोलकी बडवीत आणि पोट वाजवीत दिवसातून वीस-तीस वेळा हे खेळ करून दाखवताहेत आणि खेळ पहावयास लोक येण्याची मारामार होते आहे हे समजावून दिले. आज कदाचित आम्ही येवढा चांगला खेळ करून दाखविणार नाही; पण आमच्या रक्तात या उडया भरल्यात. फक्त पाच वर्षे आमच्यातील निवडक शंभर मुलांच्या पोटापाण्याची काळजी घ्या,आम्ही यांच्यापेक्षा चांगल्या कोलांटया मारू म्हणून त्याने सांगितले. भूरानटाचा मुलगा शाम आणि सून शामराणी पण त्याच्याबरोबर होती. सारा परिवार त्याच खेळात आहे. अगदी शामराणीच्या चार वर्षांच्या मुलापासून सारे जण ! शाम आणि शामराणी यांना खरोखरच काही होईल असे वाटते आहे. म्हाताऱ्या भैरोसिंगचा मात्र यावर विश्वास नाही. अनेक वेळा अनेक जण काही करू म्हणून सांगून बेपत्ता झालेत असे तो निराशेने म्हणाला. खरे सांगावयाचे तर अगदी आज सुद्धा दिल्लीत कोणीच भैरोसिंगचे काही ऐकण्याच्या मन.स्थितीत नाहीत. अगदी मीसुद्धा ! समाज नेहमीच आपल्या संस्कृतीपेक्षा आपल्या हिरोंच्यावर अधिक प्रेम करतो. आज आम्हा सर्वांना चीनच्या 'जीआनी वू'ने पार झपाटलंय !

---

## ७

---

प्रचंड, अतिप्रचंड, भव्य हे सारे शब्द येथे थिटे पडतात. इंद्रप्रस्थ स्टेडिअम मी बांधताना अनेक वेळा पाहिला होता; पण या भव्यतेवर, रंगसंगतीवर विश्वास बसत नाही. या भव्यतेचे वर्णन करावयास आचार्य अत्रेच हवेत! त्यांनी याच्यावर सरळ अग्रलेख लिहिला असता! गेल्या दहा हजार वर्षात आपण असले काही पाहिलेले नाही आणि पुढील दहा हजार वर्षात आपण असले काही नवे पाहू शकणार नाही म्हणून सरळ सांगितले असते ! लाल किल्ल्यात एक श्लोक लावलेला आहे 'गर फरदौस बर रूला जमी अस्त, हमी अस्त, हमीअस्त, हमी अस्त ' म्हणून. या जमिनीवर स्वर्ग कोठे असेल तर तो येथेच आहे म्हणून ठामपणे सागणारा तो श्लोक इंद्रप्रस्थ स्टेडिअमवर शोभून दिसेल ! दिल्लीत नव्याने येणाऱ्या माणसाने आता लाल किल्ला आणि कुतुबमिनार यांच्याबरोबर इन्द्रप्रस्थ स्टेडिअमला पण भेट दिली पाहिजे. या स्टेडिअमवर २५ हजार लोक बसू शकतात आणि आशियातील हा सर्वात मोठा स्टेडिअम आहे, यावरून याच्या भव्यतेची कल्पना येणार नाही. पंधरा मजली इमारत आपल्या पोटात घेईल येवढया उंचीवर याचे छप्पर आहे घुमटाकार छपराचा व्यासच मुळी १५० फूट आहे आणि अॅल्युमिनियमच्या या घुमटाखाली साडेचार एकर जमीन बंदिस्त झालेली आहे. जवळजवळ ऐंशी फूट व्यासाच्या वर्तुळावर पक्के लाकूड चढवून आतले क्रीडांगण बनवलंय. आतल्या खुर्च्या, क्रीडांगण, छत, इंद्रधनुष्याची आठवण यावी अशी कलात्मकपणे रंगांची उधळण या सर्वांच्यावर केलीये. तीस हजार टन शक्तीचे शीतयंत्र लावून साऱ्या स्टेडिअमला गारवा पुरवलाय. पाहिजे तर जमिनीवर बर्फ तयार करून बर्फावरचे खेळ खेळता येतील अशी व्यवस्था आहे. ध्वनी आणि प्रकाशव्यवस्था अप्रतिम आहे ती तशी नसेल तरच नवल ! फक्त प्रकाशव्यवस्थेवर १ कोटी रुपये खर्च केलेत; पण या स्टेडिअमचा खास विशेष म्हणजे, या स्टेडिअमचे दोन स्टेडिअममध्ये रूपांतर करू शकणारा, स्टेडिअमच्या मध्यभागी लावलेला घडीचा पडदा! हा पडदा लावण्याची कल्पना भारतीय तंत्रज्ञांची. प्लॅस्टिकच्या बनलेल्या ह्या पडद्याची उंची २२ मीटर आणि एकूण क्षेत्रफळ ५००० मीटर वर्ग आहे. त्याचे वजन चाळीस टन आहे. तो ध्वनिरोधक आहे आणि केवळ सात मिनिटात तो उघडता वा बंद करता येतो. या पडद्याला लागून असलेल्या क्रीडांगणावरील खेळ कोणत्याही कोपऱ्यात बसून पाहिला तरी छान दिसतो. रंगीत पडद्याला लागून असलेल्या दाट हिरव्या रंगाच्या क्रीडांगणावर रंगीबेरंगी कपडयांतील खेळाडू व्हॉलीबॉल खेळताहेत आणि रंगीबेरंगी कपडयातले उच्चभ्रू लोक

डोळ्यांवरचा गॉगल सावरत खेळ पाहताहेत. हे सारे भोगणे म्हणजे पण एक अनुभव आहे.

मी गेलो त्या वेळी भारत विरुद्ध कोरिया हा मुलींचा हॉली-बॉलचा सामना सुरू होता. कोरियाचा संघ काही चांगला नव्हे. तो अंतिम फेरीतसुद्धा पोचला नाही; पण आपल्या संघाला त्यांच्या-विरुद्ध एकसुद्धा गुण करता आला नाही. चक्क शून्यावर आपण दोन्ही खेळ हरलो! काहीही येत नसताना खेळाडू निवडले कसे जातात आणि आपण खेळतो तरी का हा तसा अनेक खेळांबाबत विचार करण्यासारखा प्रश्न आहे, पण खरे सांगावयाचे तर पहावयास आलेले अनेक लोकही खेळ वगैरे पहाण्यापेक्षा थोडे भटकावे, स्टेडिअम वगैरे बघावा, अमिताभ, जया, शत्रुघ्न सिन्हा वगैरे मंडळी आलीत का ते शोधावे म्हणून आलेले वाटले आणि हे असे बघत हिंडावयाचे असेल त्यांना या आशियाडमध्ये खूप पाहण्यासारखे आहे. खेळनगरी हीसुद्धा अशीच एक यक्षनगरी आहे. आखीव, रेखीव, चकचकीत एक हजार इमारती; त्यात असलेल्या पाच–सहा हजार खोल्या; दोनशे–तीनशे बंगले; प्रत्येक घर, प्रत्येक बंगला, प्रत्येक खोली वास्तुशास्त्राचे आणि सजावटीचे नवे मानदंड निर्माण करणारे. ऑलिंपिक असोसिएशननं घालून दिलेले सारे कस सहजपणे पास करणारे. हिरवळी, बागा, झाडी आणि सहजपणे डौलात इकडून–तिकडून जाणारे छोटे–मोठे रस्ते. या रस्त्यांचीच लांबी चाळीस किलोमीटर होईल; पण हे सारे सांगूनही हे सारे एकत्रित पाहताना मनाला जो सुखद हळुवार स्पर्श होतो तो शब्दात आणता येत नाही. या अजबनगरीत काय नाही ? अडीच हजार प्रेक्षकांना सहजपणे सामावून घेईल असे भव्य थिएटर आहे. ज्यात सातशे–आठशे माणसे मावतील अशी तीन–चार सभागृहे आहेत. एकाच वेळी ज्यात दोन हजार लोक बसून जेवण घेऊ शकतात, असा भव्य जेवणाचा हॉल आहे. ज्यात लावलेल्या विद्युतभट्टीची किंमतच दोन कोटी रुपये आहे असे भव्य सुसज्ज स्वयंपाकगृह आहे; पण या सर्वांवर शब्दशः कळस चढवलाय तो छपन्न मीटर उंचीच्या मिनारामुळे. हा मिनार म्हणजे या देशातील अनेक गोष्टी एकाच वेळी सामावून घेणारी सर्वांत उंच इमारत आहे म्हणून सांगितलं जातंय. मिनाराच्या पहिल्या मजल्यावर नाचण्यासाठी प्रशस्त दिवाणखाना आहे. दुसऱ्या मजल्यावर सुसज्ज उपहारगृह, घरे, खोल्या, कार्यालय वगैरे. सर्वांत वरून जुन्या आणि नव्या दिल्लीचा मनोहारी देखावा दिसतो. अठरा मीटर व्यासाच्या एका प्रशस्त गोलात हे सारे सामावलंय. हा असला प्रचंड गोल पण या देशातील पहिलाच आहे !

मेहमानबाजीत आपण कोठेच कमी पडणार नाही याची आपण कसून काळजी घेतोय. सुरक्षाप्रबंध फारच कडक आहेत; पण एकदा आत घुसलात तर सारी मजाच मजा आहे! सर्व प्रकारची शीतपेये फुकटात मिळताहेत. फळांचे ढीग इथे आहेत. सत्री, चिक्कू, अननस, सफरचंदे पाहिजे तशी फळे पैसे न मोजता उचलून तुम्ही जाऊ शकता. जेवताना चिनी, युरोपियन, भारतीय साऱ्या पद्धतीचे जेवण पैसे मोजून पण रुचकर मिळतंय. सातशे आचारी, पाणके आणि वाढपी तुमचा वेळ फुकट जाणार नाही याची काळजी घेताहेत. खेळाडू आधीच भोजनप्रिय असतात ! त्यातून स्पर्धकाच्या अन्नातून रोज पाच हजार कॅलरीज पोटात जातील याची खास काळजी घेतली जाते आहे, हे खेळाडू दररोज वीस हजार अंडी, दहा हजार लिटर दूध आणि पावाच्या वीस हजार फोडी न्याहारीला फस्त करताहेत ! त्यांच्या जेवणासाठी दररोज तीन हजार कोंबड्या आणि तीन हजार किलो मटण शिजवले जाते आहे पाव दिल्ली बाहेर नेण्यावर आपण प्रतिबंध घातलाय तो दिल्लीत कमी पडू नये म्हणून!

मात्र या जगातील श्रीमंत–गरीब ही दरी आपल्याला कल्पना येणार नाही एवढी वाढलेली आहे खेळनगरीतील एकूण व्यवस्था फार जुजबी आहे असे समजून कुवेती संघातील लोकांनी बाहेर पंचतारांकित हॉटेलात जाण्याची इच्छा प्रदर्शित केलेली आहे. नशीब येवढेच की प्रथम ते मुंबईच्या पंचतारांकित हॉटेलात राहून दररोज तीन चार खास विमानांनी येऊन परत जाणार होते. शेवटी कसेबसे दिल्लीतील मौर्या हॉटेल काही बदल करून त्यांना पसंत पडलंय. दिवसाला हजार ते चार हजार रुपये खोलीमागे देऊन तेथे खोल्या राखून ठेवल्या आहेत; पण कुवेती लोकांचे सोडा. कोकणातल्या आमच्या शेतात पेट्रोल लागले तर मीसुद्धा उद्या असाच वागेन ! पण आपल्या या असल्या मेहमानबाजीने आपण आशियात बनलेली आपली प्रतिमा बदलू शकतो का हा खरा प्रश्न आहे. मलेशियाचे खेळाडू येताना बरोबर चारशे किलो तांदूळ आणि बटाटे घेऊन आलेत. त्यातून भारतातले पाणी दूषित असते म्हणून पिण्याचे दोनशे गॅलन पाणी त्यांनी बरोबर ठेवलंय. दिल्लीत मध्यंतरी 'फ्ल्यू 'सारखा डेंगू ताप आला होता. क्रोसिन आणि रेसोचिन ही दोन औषधे त्या वेळी कमी पडली होती. पाकिस्तानी खेळाडू बरोबर दहा हजार क्रोसिन आणि रेसोचिनच्या गोळ्या घेऊन आलेत. दिल्लीच्या दूषित हवेत खेळाडू आजारी पडू नयेत म्हणून ते आपल्या खेळाडूंना त्यांच्या खुराकावर ठेवणाराहेत. हा म्हणजे अगदी कहर झाला. 'बुंदसे गयी वह हौजसे नही आती' हे शेवटी अनेक अर्थांनी खरे असते !

८

तीन दिवसापूर्वी मलेशियाचा राष्ट्रीय खेळ असलेल्या मलेशिया बॉलचे प्रात्यक्षिक झाले. फारच थोडे लोक खेळ बघावयास गेले होते; पण त्या खेळाची झलक रात्री दूरदर्शनवर दाखवली आणि दिल्लीकर त्या खेळाने झपाटले गेले. खेळाची झलक आधी दूरदर्शनवर दाखवली असती तर क्रीडांगण प्रेक्षकांनी फुलून गेले असते. दिल्लीकर या खेळावर खूष आहेत. खेळावर गप्पा मारणारा

**वीस हजार अंडी, दहा हजार लिटर दूध, वीस हजार पाव, तीन हजार कोंबड्या रोज फस्त होतायत !**




जपानची सुमी मॅत्सु
आशियाई उच्चांक मोडताना
भालाफेक

प्रत्येकजण या खेळाबाबत न चुकता चार शब्द कौतुकाने बोलतोय. खेळ काहीसा व्हॉलीबॉलसारखा आहे; पण खेळ हाताऐवजी पायाने खेळला जातो. बॉल हॉलीबॉलसारखाच; पण वजनाने व आकाराने थोडा लहान वाटत होता प्रत्येक संघात फक्त चारच खेळाडू होते; पण खेळात एक विलक्षण गती होती. व्हॉलीबॉलमध्ये सूर (drop) मारतात तसा पायाने जाळीवरून सूर मारून बॉल पाडण्याचे कौशल्य तर अप्रतिम होते ! खेळ कौशल्यपूर्ण आणि मनोरंजक तर खराच; पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे एखाद्या नव्या खेळाचे प्रात्यक्षिक कसे दाखवावे याचे ते सुंदर उदाहरण होते.

आज माझ्या आवडत्या कबड्डीचे प्रात्यक्षिक आहे. ‘ माझ्या आवडत्या ’ या विशेषणाचा उपयोग करणे दोन कारणांनी जरुरीचे आहे. हा खेळ माझा आवडता नसता तर त्याचे प्रात्यक्षिक झाले हे मला समजलेच नसते ! प्रात्यक्षिक सामन्याची प्रसिद्धी सुमार आणि अपुरी आहे. आमच्या कचेरीत आलेल्या आमंत्रणपत्रिका कोणीही जराही उत्सुकता न दाखवल्याने तशाच रद्दीच्या भावात पडून आहेत. मी. ऑफिस वगैरे चुकवून इतर खेळ सोडून हा खेळ बघावयास जाणार म्हटल्यावर साऱ्या मित्रमंडळीत हास्याची एक लकेर पसरून जाते. हुतुतू या खेळात बघण्यासारखे काही आहे हेच मुळी कुणाला पटत नाही ! मला मनोमन वाईट वाटते. मी या खेळावर खूप प्रेम केलंय. लहानपणी या खेळाच्या नादात स्वतःचे कपडे फाडून घेतलेत. तरुणपणी या खेळात गुडघ्यांची आणि घोटयांची हाडे सरकवून घेतलीत. राष्ट्रीय पातळीवर या खेळात खेळलोय. माझ्या आयुष्यातील पहिला लेख कॉलेजात असताना मी कबड्डीवर लिहिला होता. लेखाचे नाव होते ‘ कबड्डी आमचा राष्ट्रीय खेळ होईल का ?’ किर्लोस्कर मासिकाने त्या वेळी तो लेख प्रसिद्ध केला होता. ही गोष्ट १९६० सालची.

माझ्यासमोर पडलेल्या आमंत्रणपत्रिकेवर ‘भारताचा राष्ट्रीय खेळ कबड्डी याचे प्रात्यक्षिक’ म्हणून लिहिलेले आहे. आमंत्रण-पत्रिका रद्दीच्या भावात जाताहेत. खेळ बघावयास प्रमुख पाहुणे म्हणून पंतप्रधान, राष्ट्रपती, राजीव यांपैकी कोणीच येणार नाहीये. कसेबसे बूटासिंग यांनी यजमानपद स्वीकारलंय. कोणताही प्रमुख स्टेडिअम या खेळाच्या वाटयाला आलेला नाही. नवी दिल्ली रेल्वेस्टेशनसमोरच्या एका आडरस्त्यावर रेल्वेचे स्टेडिअम आहे. त्या जागेवर या खेळाची बोळावण झालीय. खेळ ठीक साडेचार वाजता सुरू होणार होता. मी चार वाजताच तेथे पोचलो. स्टेडियमवर तसा शुकशुकाट आहे. आमच्या लहानपणी हा खेळ बघावयास जागा मिळत नसे ! हेच सामने मुंबईच्या कामगार–विभागात झाले असते तर क्रीडांगण प्रेक्षकांनी दुथडी भरून वाहून गेले असते. आपल्याकडे समाजाच्या प्रत्येक स्तरात आणि प्रत्येक प्रांतात वेगवेगळा खेळ अमाप लोकप्रियता मिळवून आहे. या साऱ्या देशाला एका सूत्रात गोवेल अशी भाषा राहू दे असा एखादा खेळही आम्ही गेल्या पस्तीस वर्षांत विकसित केलेला नाही ! असो. हळूहळू तुरळक गर्दी जमू लागते. सव्वाचार वाजता श्री. शरद पवार आणि दादा साळवी येतात. त्यानंतर थोडया वेळाने बूटासिंग. त्यानंतर मोकळया स्टेडिअमवर श्री. यशवंतराव चव्हाण येतात. भारतीय कबड्डी फेडरेशनचे अध्यक्ष श्री. शरद पवार त्यांना फारशी ओळख वगैरे दाखवत नाहीत. श्री. यशवंतराव थोडा वेळ खेळ पाहून उठून जातात.

मजा म्हणजे बांगला देश, पाकिस्तान यांचे संघसुद्धा खेळात भाग घ्यावयास आलेले नाहीत. हे संयोजकांना का जमू नये हे समजत नाही. खरे पाहता या आशियाडमध्ये अधिकृत खेळ म्हणून कबड्डीचा समावेश का करता येऊ नये हे एक गूढ आहे. राजकीय नेत्यांना स्वत:ची प्रतिमा बनवावयास सहकारी संस्था, महाविद्यालये आणि खेळ ताब्यात हवे असतात. त्यांच्या दृष्टीने त्यांच्या हातातील प्याद्यां-पेक्षा या गोष्टींना महत्त्व नसते. त्यांच्या राजकीय चढउतारावर या खेळांचे चढउतार ठरतात !

भारत विरुद्ध भारत आणि नेपाळ विरुद्ध भारत असे स्त्री-पुरुषांचे दोन सामने ठेवलेत. पाकिस्तान कबड्डी फेडरेशनचे अध्यक्ष पण खेळ पहावयास आलेत. खरे पाहता हुतूतू हा एक दमदार खेळ आहे. व्यक्तिगत आणि सांघिक कौशल्यातील सारे गुण येथे कसाला लागतात. प्रत्येक क्षणी प्राप्त परिस्थितीचा अंदाज घेऊन आपले धोरण बदलणारा कर्णधार लागतो. खेळात कोणत्याही क्षणी होणाऱ्या चढउतारामुळे खेळातील अनिश्चितता व रोमांचकता कायम असते. दुसऱ्या महायुद्धापूर्वी अमरावतीच्या हनुमान व्यायाम मंडळाने हुतूतू-खोखोची प्रात्यक्षिके जर्मनीत दाखवली होती. खेळाची माहिती जर्मन भाषेत छापून वाटली होती.—मात्र आज जे होते आहे ते भयंकर आहे ! कबड्डीची एवढी अवहेलना मी यापूर्वी कधी पाहिलेली नाही. नेपाळचा संघ म्हणजे तर चक्क गावातले गुरखे पकडून आणलेले दिसतात ! नेपाळचे विसरा; पुरुषांच्या भारतीय संघाबाबतही काही वेगळे मत बनत नाही. एखाद्या खेळाचे प्रात्यक्षिक कसे दाखवू नये याचे हे प्रात्यक्षिक आहे ! नशीब आपले; खेळ पहावयास एकही परदेशी माणूस आलेला नाही !—नाही तर त्याने त्यानंतर आयुष्यात कबड्डीवर एकही शब्द ऐकावयाचे नाकारले असते. सारे खेळाडू कॅन-व्हासचे सफेद बूट घालून खेळताहेत. पकड करताना हमखास बूट सुटून हातात येतो आहे. खेळ गतिमान ठेवा असा या खेळाडूंना आदेश दिलेला आहे. त्यामुळे प्रत्येक चढाईत पकड झाली पाहिजे असा खेळाडूंनी निर्णय घेतलेला दिसतो. बॉस्केट-बॉलमध्ये वाढतात तसे गुण वाढताहेत ! पकडीतले आणि चढाईतले कौशल्य म्हणजे काय हे कोणीच समजावून देत नाही. खेळातले ताण आणि तणाव म्हणजे काय हे समजावून देणे तर मग फार दूरची गोष्ट. दूरध्वनीवरून खेळाचा अतिशय रद्दी वृत्तान्त (Comentry) दिला जात आहे. या खेळाचे चित्रण होऊन ते दूरदर्शन मुंबईवर दाखवले जाणाराहे. 'प्रेक्षकांनी नीट बघावे म्हणून ही विनंती आहे. मोकळ्या स्टेडिअमचे प्रेक्षकोंने खचा-खच भरा हुआँ स्टेडियम ' म्हणूनही वर्णन होतय—ताकदीने भरलेला सरदारजी उड्या मारत चढाया करतो आहे. त्यांनी चढाया केल्या की, प्रेक्षक 'अप्पू अप्पू ' म्हणून ओरडताहेत. कोणत्याही नव्या प्रेक्षकाचे हा खेळ ताकदीचा आहे व लोकनाट्यासारखा हा काही विनोदी प्रकार असून तुम्ही किती जणांचे व कसे बूट उतरवलेत यावर खेळातले कौशल्य अवलंबून आहे असे नक्की मत बनले असेल ! भारत विरुद्ध भारत हा मुलींचा सामना मात्र फार छान झाला ! शकुंतला चव्हाण, इंद्रायणी गायकवाड, नाईक आणि मुजुमदार या मुली दृष्ट काढावी इतक्या सुरेख खेळल्या ! या खेळातल्या पकडी




adah/82

आणि चढाया म्हणजे काय ते प्रेक्षकांना त्यांनी छान दाखवून दिले. एखाद्या कसरतपटूच्या डौलात गायकवाडने चढाया केल्या. पाहणाऱ्यांनी चकित होऊन पहात बसावे असे सूर मारून चव्हाणांनी पकडी केल्या !

सामने संपवून रिकाम्या क्रीडांगणांवरून परत येताना मनावर तसे मळभ दाटून आले होते. पुरुषांचे सामने आकर्षक करता आले असते. पाकिस्तान व बांगला देश येथून संघ आणणे पण जड नव्हते. रेल्वे स्टेडियमऐवजी क्रीडानगरात या खेळाचे आयोजन केले असते व आकर्षक धावता वृत्तान्त सांगून वेगवेगळ्या भाषांतील खेळावरच्या पुस्तिका वाटल्या असत्या तर केवढे तरी काम झाले असते. पण तरीही हुतूतू हा तसा भाग्यवान खेळ! खो-खोसाठी तर येवढेही झाले नाही. क्रीडांगणावरून परत जाताना एक मुलगा फार उत्साहाने कागद वाटत होता. मुलगा फारच बालसुलभ उत्साहात होता. त्याने माझ्या हातात मला न जुमानता जाहिरात कोंबलीच ! आशियाडमुळे निम्म्या दरात विक्री करत आहोत वा चाळीस रुपयाला आग्रा-मथुरा पाहून घ्या म्हणून सांगणारी ती एखादी व्यापारी जाहिरात असावी असे वाटले; पण जाहिरात भारतीय खो खो फेडरेशनची होती. आलेल्या लोकांना दाखविण्यासाठी ते दूर कोठे तरी टोकाला ' खो खो ' खेळाचे प्रात्यक्षिक दाखविणार होते. त्याला या म्हणून ते आग्रहाचे आमंत्रण होते—राम-लक्ष्मणांना फक्त चौदा वर्षांचाच वनवास घडला होता. हुतूतू, खोखो या दोन या भूमीतील राष्ट्रीय खेळांना किती दशकांचा वनवास सहन करावा लागणार आहे कुणास ठाऊक ! झालेल्या कबड्डीच्या सामन्याचे एकही चित्र दिल्ली दूरदर्शनने दाखविले नाही हे एका अर्थाने बरेच झाले. त्यावर काही बातमी वगैरे पण दिली नाही; पण परिस्थिती नक्की बदलेल. २ डिसेंबरला रात्री १० नंतर दिल्ली दूरदर्शनवर पुण्याच्या लोकांनी बनवलेली खो खो वरील अप्रतिम सुंदर फिल्म दाखवली गेली. धावते वर्णन उत्कृष्ट होते. खेळातील सारे बारकावे त्यात चित्रित होते. बाकी इतर अनेक खेळाबरोबरची तुलना विश्वास बसणार नाही इतक्या सफाईने दाखवली होती. कबड्डी-खोखोवर अशा फिल्म काढून त्या अनेक देशात दाखविल्या आणि योग्य प्रकारे पाठपुरावा केला तर पुढील आशिआडला काय ऑलीपिकला हे दोन खेळ पोचतील ! या फिल्मचे वर्णन करावयास आपल्याकडे शब्द नाहीत. ही फिल्म पाहिलेले सारे दिल्लीकर आज ' खो खो ' वर लुब्ध आहेत !

---

९

---

ताजमहाल पहावयाचा असेल तर तो चांदण्यात न्हाऊन निघालेला पहावा. भर दुपारी पाहिलेला ताजमहाल आणि चांदण्यातील ताजमहाल यात अरसिकालासुद्धा समजावा येवढा जमीन-अस्मानाचा फरक असतो.—नेहरू स्टेडियमची पण खरी शान पहावयाची असेल तर रात्री जावे. रात्रीच्या प्रकाशात न्हाऊन निघालेला हा स्टेडियम


*WITH BEST COMPLIMENTS FROM :*

# V. M. JOG CONSTRUCTIONS PVT. LTD.

## Engineers & Contractors

*Phones* : 30323 / 30398 / 32136 / 32036 / 32086
*Address* : 2047, Sadashiv Peth, PUNE 411 030

**We undertake following Projects on Turnkey Basis :**

- ☐ WATER / SEWAGE / EFFLUENT TREATMENT PLANTS
- ☐ MANUFACTURE & LAYING OF M. S. / R. C. C. PIPES
- ☐ MASS HOUSING WITH PRECAST COMPONENTS
- ☐ HEAVY STRUCTURAL FABRICATION
- ☐ MARINE OUTFALLS FOR SEWAGE DISPOSAL
- ☐ INTERNAL CEMENT MORTAR LINING OF PIPES

हा एक खास अनुभव आहे. रात्र आणि दिवस यातील फरक कळेनासा होतो. परदेशात रात्रीचे क्रिकेट कसे काय होत असेल ते समजते. चमचम करणारे भले मोठे घड्याळ आणि उघड-झाप करणारे सूचनाफलक. चारही कोपऱ्यांतून प्रकाश ओतणारे दिवे. चकचकीत प्रकाश. पेटलेली भव्य ज्योती; ज्योतीतून बाहेर पडणाऱ्या धुराचा साऱ्या स्टेडिअमवर झालेला हलकासा शिडकावा. ज्योतीच्या खाली दिसणारी नेहरूंची स्वाक्षरी. सारे वातावरण कसे मंतरलेले आहे ! रात्रीच्या प्रकाशात तुम्ही कोठेही बसलात तरी खेळ किती छान दिसतो. त्या काळोखातील झगझगीत प्रकाशात स्टेडिअमच्या भव्यपणात आणखीनच भर पडते.—उन्हाळ्याच्या दिवसांत गच्चीवर झोपून आकाश पाहतो आहोत व कृत्रिम तारांगणात (प्लॅनेटोरिअम) मध्ये बसलो आहोत असे काहीसे वाटते. समोर बालकवींनी सांगितलेल्या हिरव्या हिरव्यागार गालीच्यावर रंगीबेरंगी कपड्यातील खेळाडू खेळताहेत. साऱ्या वातावरणाला परिकथेतील जादूनगरीचा स्पर्श होतो. दूरदर्शनवरून सामना पाहताना आपण नुसते हे वातावरणच चुकवत नाही तर सारा सामनाच चुकवतो हे येथे तीव्रतेने जाणवते. येथे कोठेही बसला असला तरी साऱ्या खेळाडूंची प्रत्येक हालचाल किती रेखीव दिसते!—दूरदर्शनसाठीच जन्मलेल्या बैठ्या पिढीला हे समजणार नाही !

स्टेडिअमच्या बाहेर बसस्थानकावर गर्दी आहे; पण शिस्तबद्ध. दर दोन मिनिटाला तेथे बस लागते आहे. दर दोन मिनिटांनी बस सुटते आहे. रेल्वेचे डबे वाटावेत अशी बसची लांबलचक रांग उभी आहे. स्टेडिअमच्या बाहेर अक्षरशः जत्रा दाटलीये. छोट्या-मोठ्या पोलीसचौक्या. चहा, फराळ, पान, बिडी यांची दुकाने. भोवताली उघडउघड 'शेअरबाजार' आहे. हा तिकिटांचा काळाबाजार नाही ! 'लिया, दिया' करत पाच रुपयापासून पन्नास रुपयांपर्यंतचे तिकीट दोन ते वीस रुपयांस विकत घ्या.—पाहिजे त्या स्टेडिअमवर पाहिजे तेव्हा जा ! टिवल्या-बावल्या करत तिकीट विकत घ्या. पाहिजे तेवढा वेळ सामना पहा. कंटाळा आला की बाहेर या. मिळेल त्या किंमतीत त्रिकीट विका. चहा पाणी घेत समोर तुमची वाट पहात उभ्या असलेल्या बसमध्ये चढा. दुसऱ्या स्टेडिअमची वाट धरा !

आज नेहरूस्टेडिअमवर कुवेत विरुद्ध कोरिआ हा उपान्त्यपूर्व फेरीचा सामना आहे पन्नास—साठ हजार लोक जमलेत. स्टेडिअमवर अजूनही पंधरा—वीस हजार लोक सहज सामावले जातील. आपण आपले खेळ पण प्रांतवार वाटलेत. जमलेले भोवतालचे बहुसंख्य लोक बंगाली आहेत. मराठी लोकाचे नाटकावर वा लखनौच्या लोकाचे शेरशायरीवर असते तसे या लोकांचे फूटबॉलवर प्रेम आहे. कलकत्त्यातून हिंडत असल्याप्रमाणे आपल्याभोवती लाडे लाडे बोबड्या बंगालीत आवाज उठताहेत. ते आवाज आपले कान सुखावतात. त्यातील आशय भाषा येत नसताना पण समजतो.—काल याच स्टेडिअमवर शेवटच्या दोन मिनिटात झालेल्या गोलमुळे भारताचा, म्हणजे बंगालचा संघ इराण विरुद्ध सामना हरला त्या वेळी संघातील खेळाडू आणि त्यांचे उस्ताद क्रीडांगणावर अक्षरशः रडले ! साऱ्या प्रेक्षकाचे डोळे पाणावले. तसे पाहावयाचे तर साऱ्या स्टेडिअमवर एक एकत्रित हुंदका उठावयाचेच

*With Best Compliments From :*

**AVEM**
**ADVERTISING**

MILIND DONGRE

768/1, SADASHIV PETH, GADGIL STREET CORNER, PUNE-411 030.

काय ते बाकी उरले होते ! दोन दिवसांपूर्वी जपानवर हॉकीत विजय मिळवल्यावर दक्षिण कोरिआच्या खेळाडू मुली आनंदाने अक्षरशः ओक्साबोक्शी रडल्या होत्या! –खरे सांगावयाचे तर खेळापेक्षा, खेळात स्वतःला येवढे झोकून देऊन, हळवे होऊन त्याबरोबर वाहावत जाणारे खेळाडू आणि प्रेक्षक पहावयासच अधिक मजा येते !

कुवेत विरुद्ध कोरिआचा सामना सुरू होतो. कोरिआचा संघ नक्कीच अधिक चांगला आहे. अनेकदा तो सुंदर आक्रमक पवित्रे रचतो. मात्र मध्यंतरापर्यंत कोणीच काही गोल करत नाही. साऱ्या प्रेक्षकांनी कोरिआचा संघ आपला संघ म्हणून निवडलाय आणि मध्यंतरानंतर पंचाच्या एका चुकीच्या निर्णयाने कुवेतचा संघ विजयी होतो. पंच चुकला असे सर्वांनाच वाटत होते. हे वाटणे कदाचित बरोबर पण असेल; पण या खेळाच्या नियमातील नक्की बारकावे माहीत नसलेल्या आमच्यासारख्यांना पण तसेच वाटत होते. समुदायाला स्वतःचे असे एक मत असते. त्यातून या पंचाने कुवेतच्या राज्याकडून फार मोठी रक्कम घेतली आहे अशी स्टेडिअममध्ये एक अफवा उठते. त्या क्षणी तरी ती अफवा आम्हा साऱ्यांना मनोमन पटते. सामना संपल्यावर कोरिआचे खेळाडू आणि कसरतपटू त्या थायलंडच्या पंचाची अक्षरशः धुलाई करतात ! कुवेतचे खेळाडू चपळाईने निघून गेलेले असतात. म्हणूनच एक फार मोठा अनर्थ टळतो. रक्तबंबाळ अवस्थेत त्या पंचाला क्रीडांगणावरून पोलीस दंगल काबूत आणून घेऊन जात असतानाही प्रेक्षकांची सहानुभूती कोरिअन लोकांच्याचबरोबर आहे ! नशीब आपले, त्या वेळी कुवेत विरुद्ध भारत असा सामना नव्हता ! नाही तर हे सारे प्रेक्षक सरळ मैदानात घुसले असते. शेवटी सुरक्षिततेसाठी केलेले सारे प्रयत्न जुजबी ठरून तिथे रणांगण उभे राहिले असते. आशियाडचे नशीब खरोखरच बलवत्तर आहे. गालबोट लागल्यासारखे असले एक–दोन प्रसंग होऊन हे सामने सुखरूपपणे







**बहादुरसिंग**
**गोळाफेक – सुवर्णपदक**

पार पडताहेत ! कोरिआच्या खेळाडूंनी केलेली निर्णयाविरुद्धची तक्रार दुसऱ्या दिवशी फेटाळून लावली जाते. ती तशी फेटाळून लावली जाईल याची प्रत्येकाचीच खात्री होती. कुवेतच्या राजाला दुखवावयाची आपली हिंमत नाही ! या साऱ्या खेळांच्यावरसुद्धा राजकारणाची पोलादी पकड आहेच !

## १०

आंबेडकर स्टेडिअमवर सतपाल आणि कंपनीचे नाटक नेहमीप्रमाणेच सुरू आहे. पुन्हा तेच ! प्रत्येक स्टेडिअमचा आपापला प्रेक्षकवर्ग ठरलेला आहे. छबिलदासमधील प्रेक्षकवर्ग रुचिपालट म्हणूनही कामगार रंगभूमीवरील नाटके पहात नाही आणि खिशाला परवडत असूनही कामगार विभागातील निष्ठावान प्रेक्षकगण रवींद्रमंदिरात पाय टाकत नाही. सगळीकडेच टिवल्या–बावल्या करत हिंडणाऱ्या आम्हा काही लोकांचे त्यामुळे चांगले फावते !–आंबेडकर स्टेडिअम नेहमीप्रमाणेच खचाखच भरलाय. आपल्या कुस्तीगीरांची जाम तंतरली आहे. कुस्ती हा जुन्या दिल्लीचा आवडता खेळ. गुरु हनुमानच्या विलायती आखाड्याचा आणि यमुनाकाठी उभ्या असअसलेल्या चांदगीरामच्या आखाड्यांचा रुबाब काही और आहे. त्याचबरोबर पहाडीवरून वा जुन्या दिल्लीतून नुसते फिरलात तरी दंड–बैठकांमुळे न्हाऊन निघालेली आणि लालमातीचा लेप अंगावर घेतलेली शंभर–दीडशे टाळकी आढळतात. हे सारे लोक मला चांगले ओळखतात. 'माणूस'साठी दिल्लीच्या कुस्तीवर एक विशेषांक काढायचाय म्हणून गेले दोन महिने मी यांच्यातून हिंडतोय. या मुलांच्या खुराकाची काळजी वाहणारे धनिक आहेत. त्यांच्या शरिराला प्रेमाने मसाज करणारे म्हातारे आहेत. आपल्या म्हशी दोन–तीन किलोमीटर अंतरावरून त्यांच्या घरासमोर आणून त्यांना दूध पाजणारे गवळी आहेत. हे एक वेगळे अद्‌भुत विश्व आहे. दिल्लीने जपलेला हा आपला एक खानदानी वारसा आहे. शाहूमहाराजांच्या कोल्हापूरची येथे नकळत आठवण होते. महाराष्ट्र आणि कोल्हापूर याबाबत येथील प्रत्येकाच्या मनात आदरयुक्त प्रेम आहे. तेथे सध्या काय सुरू आहे ते यांना माहीत नाही ते बरे आहे !

सारे प्रेक्षक अवाक होऊन पाहताहेत. गावरानी, व्रज, हिंदीत शेलक्या शिव्या उठताहेत. गेले एक वर्ष पहिलवान आणि हे रसिक झपाटलेल्या मन:स्थितीत होते. सुवर्णपदक न मिळाल्यास हातात कंकण भरावयाचे विडे जामामसजिदीला आणि लाल किल्ल्याला साक्षी ठेवून उचलले गेलेत. मी वृद्ध गुरु हनुमानांच्याकडे बघतो. त्यांची थट्टा करावयाचा मोह मी टाळतो. पहिलवान मंडळींचे काही खरे नाही !–त्यातून त्यांच्या वृद्ध अनुभवी डोळ्यांत कधी नव्हे ते पाणी तरळतंय. भारताला फक्त दोन कास्य पदके मिळालीत ! सिनेनट शोभावा असा गुरु हनुमानचा देखणा चेला कर्तारसिंग अंतिम फेरीसाठी सामन्यात उतरतो. उमदा कर्तारसिंग मला फार आवडतो. तो माझा जवळचा दोस्त आहे. बँकॉकला सुवर्णपदक मिळालेला कर्तारसिंग इराणच्या मोहम्मद हसनशी खेळताना काही तांत्रिक साध्या



सतपाल - विजयानंतर


चुका करतो. त्याच्याकडून ही अपेक्षा कोणीच केलेली नसते; पण तुमचे नशीब हे शेवटी तुमचेच नशीब असते ! मिळालेल्या रजत पदकात गुरु आणि चेला या दोघांनाही काही रस नसतो. सुवर्णपदक मिळण्याच्या साऱ्या वाटा आता रोखलेल्या आहेत. सतपाल हा फार कलात्मक कुस्ती खळणारा कलावंत आहे; पण तेहरानला कास्य आणि बँकॉकला रजतपदक यापलीकडे त्याची धाव गेलेली नाही. कारण जिंकण्यासाठी ' मरू किंवा मारू ' अशी जी खुनी जिद्द लागते ती त्याच्याकडे नाही ! पण भोवतालचे बनलेले वातावरण ही जिद्द सत्पालला देते आणि त्याला सुवर्णपदक मिळते. एक भला मोठा अनर्थ टळतो ! भारतीय कुस्तीगीरांचे म्हटले तर यश, म्हटले तर अपयश मला अस्वस्थ करते. राजाश्रय नसला तरी लोकाश्रय आहे. गामा–गुंगांची परंपरा आहे. तरीही आपण मागे पडतो आहोत. विजिंदर आणि त्याचे डोंबारी मित्र जे म्हणतात ते ऐकताना त्यांच्या जिद्दीचे कौतुक करत असतानाच, आपणाला चीन–जपानच्या तोडीचे कसरतपटू बनावयास काय दिव्य करावे लागेल ते अभ्यासावे लागेल. किंबहुना या बक्षिसांचा नक्की कशाशी संबंध आहे हे आपणाला पुढे शोधावयाचे आहे.

¤

माडगावकरांच्या अठराशेपन्नास साली लिहिलेल्या मुंबईवर्णन पुस्तकात लेखक नुसता काय आणि कसे पाहावे हे न समजून भांबावून गेलाय. काय हो सांगावे, म्हणून पुन्हा पुन्हा न राहवून काही नवे सांगत राहतोय. माझी नेमकी तशी स्थिती झालीये. काय पहावे, कसे पहावे, किती पहावे हेच समजत नाही. जमेल तसे या लाटांवर

नुसते मनसोक्त तरंगावयाचे. दिल्ली विद्यापीठात हँडबॉल आणि धनुर्विद्येचे सामने आहेत. जवळजवळ वर्षभर कायम संपावर असणारे कर्मचारी या सामन्यांसाठी असेल कदाचित संपावर नाहीत. खेळ-ग्रामात वजन उचलण्याच्या स्पर्धा आहेत. आंबेडकर स्टेडिअम, मॉडेल टाउन स्टेडिअम आणि जवाहरलाल नेहरू स्टेडिअम अशी फूटबॉलची त्रिस्थळी यात्रा आहे. इंद्रप्रस्थ स्टेडिअमवर व्हॉलीबॉल, कसरती, बॅडमिंटन सुरू आहे. हौस खायला लॉन टेनिसचे वेगळे मैदान आहे. स्त्रियांची हॉकी शिवाजी स्टेडिअमवर आणि पुरुषांची सुमारे एक कोटी रुपये खर्चून घातलेल्या नॅशनल स्टेडिअमवर आहे. प्रगतिमैदानावरील हॉल आणि स्पोर्टसमध्ये टेबलटेनिस आणि बॉक्सिंग सुरू आहे. बॅटमिंटन, बॉक्सिंग, टेनिस यांचा नेहमीचा प्रेक्षकवर्ग सोडला तर कोठेच तशी गर्दी नाही. पाहिजे तेव्हा पाहिजे तेथे जा. लोकांना सर्वांत आवडलाय तो टालकटोरा येथे बांधलेला पोहण्याचा तलाव ! तो प्रेक्षकांनी तुडुंब भरून वाहतोय. प्रत्येक स्टेडिअमवर झालेला खर्च तसाच मोठा आहे. पोहण्याच्या तलावातील पाणीशुद्धीकरणासाठी बसवलेले यंत्रच मुळी एक कोटी रुपयांचे आहे ! पाहिजे ते तपमान येथील पाण्याला अचूकपणे दिले जाते. हा तलाव एक तास चालू ठेवावयाचा तर येणारा खर्च पंचवीस हजार रुपये असेल ! या सामन्यानंतर आपण या सर्व स्टेडिअमचे काय करणार आहोत ? एखादे पंचतारांकीय हॉटेलसुद्धा हा पोहण्याचा तलाव वापरायला घेणार नाही. प्रगतिमैदानावर आपण कायम इमारती उठवून ठेवल्यात आणि तेथे वर्षभर व्यापारी मेळे भरवतो. भारत पुढील वर्षी आफ्रो आशियाई देशांचे सामने भरवणार आहे अशी एक वदंता आहे !

¤


Industrial Metal-clad Plugs, Sockets & Connectors

Already playing vital role in Country's Defence Services, now in continuous demand for various Industrial Applications.

Dattatraya Industries PVT. LTD.

691/A, Pune-Satara Road, Pune-411 037. INDIA.
Phone: 442724/447675 Gram: DIPRO


कोणत्याच खेळात आपल्या खेळाडूंनी वाघ मारलेला नाही ! महिलांचा हॉकी संघ हा याला अपवाद; पण पाकिस्तानी महिलांनी हॉकीत भाग घेतलेला नव्हता ! आपल्या मुक्केबाजांनी एक सुवर्ण, दोन कास्य आणि एक रजत पदक पटकावले ! आशियाई विजेता कौरसिंगने इराकच्या सलेमानला गुणावर पराभूत केले. २७ वर्षांचा राजकुमार पुनेडा हा अन्त्य सामन्यात कोरिआच्या नाम ली या आशियाई विजेत्याकडून हरला. त्याची हार मान्य नसलेल्या प्रेक्षकांनी कोरिआचे राष्ट्रगीत सुरू असताना शेमशेमच्या घोषणा दिल्या. पुनेडा खेळला चांगला; पण त्याच्यात नाम लीची चपळाई नव्हती. डोळ्यावर मोठी जखम झाल्यामुळेपण त्याच्या खेळावर परिणाम झाला. सेनादलाच्या घोडेस्वारांनी बक्षिसे मिळवली; पण घोडेस्वारात खरी कमाल केली ती कुवेतच्या दोन बहिणींनी ! पुरुषांना मागे टाकून त्यांनी सुवर्ण व रजत पदके मिळवली. त्या दोन कॉलेज–सुंदरींना पाहून मध्ययुगातील दोन राजकन्या घोड्यांवरून जाताहेत असा भास झाला ! नेमबाजीत नेहमीप्रमाणे महाराणा करणसिंग आणि शरद यांनी आपला अधिकार दाखवला. मर्सी मॅथ्यूजने सव्वा सहा मीटर लांब उडी मारून रजत पदक पटकावले. केवळ तीनदा रेषेच्या पुढे जाऊन उडी मारल्याने तिचे सुवर्णपदक गेले ! गीता झुत्शी, शांतम्मा, सुरेश यादव, सीताराम आणि राजकुमारने भारतीय ॲथलेटसचा दमदारपणा दाखवला. यश-अपयशाच्या सीमारेषा नाहीशा कशा होतात ते ४०० मीटर्सची रिले शर्यत पहाताना जाणवले. भारताचा पवित्रसिंग काय अफलातून पळाला ! आपल्याच कामगिरीने रोमांचित झालेल्या पवित्रसिंगने प्रेमचंद्रनच्या हातात काठी देताना चूक केली आणि आपण हरलो. कुलदीपने थाळीफेकीत दुसरा क्रमांक पटकावला.

—खरे सांगावयाचे तर दोन दिवसांपूर्वी शांतम्मा, मर्सी मॅथ्युज, सुरेश यादव, सीताराम, कुलदीप यांची नावे आपल्यापैकी बहुतेकांना माहीत नव्हती. आणखी दोन दिवसांनी पण त्यांची नावे आपण विसरून गेलेले असू !—आपणाला पाठ असतात त्या फक्त आपल्या क्रिकेट—खेळाडूंच्या वंशावळी ! भारताचा पुरुष हॉकी संघ हरला म्हणून सुतक पाळणारे आणि स्त्री संघाचे कौतुक करणारे आपण त्या संघातील खेळाडूंची नावेसुद्धा सांगू शकणार नाही !—खेळाडूंना शेवटी नुसता लोकाश्रय नको असतो; लोकप्रेम पण हवे असते. भारताचा मॅरेथॉन विजेता शिवराम म्हणाला होता, 'माझा मुलगा फार होतकरू आहे. मी त्याला 'मॅरेथॉनरनर' बनवून त्याच्या आयुष्याचा बट्याबोळ करणार नाही ! मी त्याला क्रिकेट शिकवीन !'—या असल्या वातावरणात आपल्या खेळाडूंनी येवढे करणे म्हणजेसुद्धा तसे खूपच झाले !

# ११

Every hero is bore at last ! – तेरडयाचा रंग तीन दिवस ! काहीही म्हणा, तात्पर्य एकच. लोकांचा खेळातील उत्साह झपाट्याने कमी होतोय. पहिले काही दिवस वातावरण आशियाडमय होते. आता तो उत्साहाचा पूर ओसरत चाललाय. बोलताना कोणाला किती पदके मिळाली याच्यापलीकडे काही फारशी चर्चा होत नाही. दूरदर्शनवरचे लोकप्रिय कार्यक्रम गायब झालेत आणि छायागीत, सिनेमा वगैरे रात्री अकरानंतर गेलेत म्हणून छोटे मंडळी उघडउघड नाखूष आहेत. आणखी काही काळ हे खेळ सुरू राहिले तर दूरदर्शन-मुळे बैठी बनलेली ही शाळकरी मुले मोर्चे वगैरे काढतील या खेळा-विरुद्ध ! – फ्रान्समध्ये आपले रणगाडे घुसविण्यापूर्वी जर्मन सेनानी म्हणाला होता, 'मी फ्रान्सच्या लष्करी तयारीची छदाम माहिती गोळा केलेली नाही. त्याची काही जरुरीही नाही. एखाद्या राष्ट्रातील तरुण पिढी काय खेळते, काय वाचते व काय बघते यावरून आम्ही त्या राष्ट्राच्या कुवतीचा अंदाज घेतो !' असो. एशियाडच्या दोनच खुणा आता दिल्लीवर बाकी आहेत. एक म्हणजे आशियाडसाठी सुरू असलेली अप्रतिम बस-सेवा ! प्रमुख ठिकाणी नव्या मोकळ्या बसेस तुमची प्रतीक्षा करत उभ्या आहेत. बसमधील कर्मचारी सौजन्यशील आहेत. दोन रुपयात दिल्लीत कोठेही कितीही वेळा तुम्ही प्रवास करू शकताय. दर दोन मिनिटांनी बस सुटते आहे. शासनयंत्रणेने ठरवले तर ती किती व काय करू शकते याचा हा अनोखा अनुभव आहे. दुसरी गोष्ट म्हणजे सरकारी बंदोबस्त! त्यात कोठेही ढिलाई आलेली नाही. स्टेडियमच्या आत–बाहेर जाताना तीच भेदक नजर अजून तुम्हाला शोधते आहे. काल सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी राजीव गांधींची गाडी थांबवून त्याची आमंत्रण-पत्रिका तपासली. माहितगार लोक म्हणतात, राज्यपाल जगमोहन यांनी आपल्या फर्डा इंग्रजीत, 'हा काय प्रकार आहे ?' म्हणून सीमा-सुरक्षा दलाच्या इन्स्पेक्टरजनरल जोग यांना विचारले. जोगांनी आपल्या मराठी बाण्याला स्मरून आपल्या मराठी इंग्रजीत त्यांना सुनावले, 'माझ्या जवानांनी झेंडा असलेली माझी गाडी पण तपासलेली आहे. तुमची गाडी पण तपासली जाईल ! मी आशि-याडच्या संरक्षणाची जबाबदारी घेतलेली आहे. तुमच्या आणि माझ्या मानापमानाची नाही !'– दिल्लीकर जोगांच्यावर खूप खूष आहेत. काहीही गैरप्रकार होऊच शकणार नाही हा त्यांना आता विश्वास आहे.

या ओहोटीला लागलेल्या लोकांच्या उत्साहाला पुन्हा एकदा उधाण आले ते हॉकीच्या सामन्याने. त्या दिवशी त्या सामन्या-निमित्ताने सर्व सरकारी कचेऱ्या बंद ठेवण्यात आल्या. सुट्ट्या घेण्यात आणि देण्यात आशियातच काय पण जगातही आपला कोणी हात धरू शकणार नाही ! उद्या एखादे वेळी 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्'मध्येसुद्धा आपल्या देशाचे याबाबत नाव झळकेल ! खाजगी कचेऱ्यासुद्धा बंद राहिल्या वा त्यांनी कचेरीतच हॉकी दाखविण्या-साठी दूरदर्शन बसविले. स्टेडिअमवर दहा रुपयांचे तिकीट काळ्या बाजारात चारशे रुपयांना विकले गेले ! सामन्यात जे काही झाले. तो आता काळा इतिहास आहे. खेळ सुरू असताना संतापलेल्या प्रेक्षकांनी भारतीय संघाला 'शेम शेम'च्या अविरत घोषणा दिल्या. भारतीय संघाचा गोलरक्षक आणि आघाडीची फळी यांच्यातला समतोल पार बिघडला होता. योग्य वेळी व्यूह-रचना बदलण्याइतका लवचिकपणा भारतीय संघाने दाखविला नाही. प्रेक्षकांच्याकडून आलेल्या दडपणामुळे त्यांचाही तोल गेला असावा. दोनदा तर गोल होताना गोलरक्षक दूर उभा राहिला! 'अरे, तो क्रीडांगणावर नाही

**राजीव गांधींची आमंत्रण पत्रिकाही तपासली गेली. चौकशीची सूत्रे हलली. आणि इन्स्पेक्टर जनरल जोग मराठी बाण्याला जागून ताडकन म्हणाले, '....' दिल्लीकर जोगांवर एकदम खुष.**

घरी रंगीत दूरदर्शन पुढे बघून सामना बघतोय !' म्हणूनही प्रेक्षका-तून हेटाळणीचे सूर उठले. लोक जाम चिडलेले होते. खेळ हा खेळाच्या भावनेने घ्यावयाचा असतो याचे कोणालाच भान नव्हते. अधिकारी पण तेवढेच गेंड्याच्या कातडीचे असतात. हॉकी असो-सिएशनचे माजी अध्यक्ष अश्विनीकुमार यांनी, 'आमचा हा संघ चांगलाच आहे; पण तांत्रिक चुकीमुळे आमचा पराभव झाला !' म्हणून सांगितले. हे म्हणणे, नेफा पराभवाच्या वेळी, 'मी माझ्या सैन्याची चांगली तयारी केली होती' म्हणून कृष्ण मेनन यांनी सांगण्यासारखे झाले ! असो. हॉकीतील पराभवामुळे आपणासमोर तसे थोडे वेगळेच प्रश्न येतात. कसरत आणि कुस्ती यांना धरून आपण आणखी एक पाऊल आपल्या उत्तराच्या शोधात पुढे येतो. आपल्या डोंबाऱ्यांना लोकाश्रय वा राजाश्रय नाही म्हणून ते काही करू शकत नाहीत. परंपरा आणि लोकाश्रय असूनही भारतीय कुस्ती राज्याश्रय

कलात्मक
विवाहपत्रिकांसाठी

आर्ट अलोन
३५१ शनिवार पेठ
पुणे ४११०३०
फोन : ४४८८५२

न मिळाल्याने काही फार करू शकत नाही. आपल्या हॉकीला परंपरा आणि राज्याश्रय व काही प्रमाणात लोकाश्रय असूनही आपण कमी पडतो.– शेवटी कशामुळे सारे राष्ट्र एकसंघ आणि गतिमान बनते आणि सहजपणे सुवर्णपदके मिळवत सुटते ?

आज दिल्लीत या प्रश्नाचा कोणालाच विचार करावासा वाटत नाही. लोक अजून हॉकी–पराभवाच्या सुतकातच वावरत आहेत. आपल्या लोकांना जयंती वा मयंती साजरी करणे एवढेच माहीत आहे. लोकांचा एशियाडमधला उत्साह झपाट्याने कमी झालाय. एशियाडच्या या परतीच्या प्रवासात नोंद करण्यासारख्या फक्त एक-दोनच गोष्टी आहेत. शेवटच्या दिवशी खेळग्रामात केलेले दारूकाम चिनी, जपानी, कुवेती साऱ्या लोकांना मनापासून आवडले. सांगता–समारंभही फार छान झाला. फुलांनी सजवलेला अप्पू, राष्ट्रपतींच्या घोडेदलांनी केलेली कवायत, सेनादलाच्या तिन्ही शाखांनी केलेले बँडवादन सारेच काही सुरेख होते; – पण या सांगता-समारंभात खरा लक्षात राहिला तो फक्त कृतकृत्यतेने, समाधानाने उजळून निघालेला इंदिराबाईंचा चेहरा !

## १२

फार झगमगाटात सुरू असलेले नववे आशियाई खेळ संपले. आपला नंबर पाचवा आला. आपणाला एकूण ५७ पदके मिळाली. त्यापैकी १३ सुवर्णपदके आहेत; पण आकडेवारी ही अनेकदा फसवेगिरी असते. आपण चीन, जपान व कोरिआ यांच्या जवळ आसपाससुद्धा पोचलो नाही. एकूण वाटलेल्या पदकातील सहावा हिस्सा पदकेसुद्धा आपल्या वाट्याला आली नाहीत ! म्हणजे आपल्याला माहीत असलेल्या लोकशाहीच्या भाषेत बोलावयाचे तर या खेळात चक्क ‘ अनामत रक्कम ’ जप्त झाली ! म्हणजे इंदिरा गांधींनी ‘ नाक कटवाना ’ वगैरे जे काही म्हटले होते ते सारे यथासांग पार पडलेच की ! गेल्या आशियाई स्पर्धेपेक्षा आपणाला दोन सुवर्णपदके अधिक मिळाली, असले वांझोटे समाधान आपण हवे तर मानू शकतो; पण हा ताळेबंद नीटपणे मांडावयाचा असेल तर आपणाला पहिल्या आशियाई खेळ स्पर्धापर्यंत परत जावे लागेल. त्या स्पर्धेतील बक्षिसांची संख्या अशी होती –

| देश | सुवर्ण | रजत | कास्य |
|---|---|---|---|
| जपान | २४ | २० | १६ |
| भारत | १५ | १६ | २१ |
| इराण | ८ | ७ | १ |
| सिंगापूर | ५ | ७ | १ |
| फिलिपाइन्स | ४ | ६ | ७ |
| श्रीलंका | – | १ | – |
| इंडोनेशिआ | – | – | ५ |
| ब्रह्मदेश | – | – | ३ |

चीन आणि कोरिआ या स्पर्धेत नव्हते हे खरे; पण जपानला मागे टाकून पोहण्याच्या शर्यतीत आपण चार सुवर्णपदके संपादन केली होती. त्यातूनही महत्त्वाचे म्हणजे खेळाचा असा कोणताही प्रकार नव्हता की, ज्यात आपण पदक पटकावले नव्हते ! शरीरसौष्ठवस्पर्धेत इराणी स्पर्धकाचा पराभव करून परिमल दासने सुवर्णपदक मिळवले होते. के. पी. थापर आणि लेवी पिंटो यांनी प्रत्येकी दोन दोन सुवर्णपदके मिळवली होती. पिंटोंनी तर शंभर मीटर धावण्यातील आशियाई विक्रम मोडला होता !

पण याहीपेक्षा अनेक पटींनी मोलाचे म्हणजे सारे खेळ कसे घरगुती खेळीमेळीच्या वातावरणात झाले होते. शाळकरी मुलांनी पाहुण्यांना उत्साहाने आपल्या कवायती दाखवल्या होत्या. आपली स्पर्धा संपल्यावर बक्षिसे वगैरे घेण्यापूर्वी हे खेळाडू प्रेक्षक मुलांच्यामध्ये घुसून त्यांचे गालगुच्चे घेत त्यांना चॉकलेटी वाटत स्वाक्षऱ्या देत होते ! ‘ खेळाच्या भावनेने खेळाडूंसारखा खेळ खेळा ! ’ हा मंत्र जवाहरलालनी त्यांना खेळापूर्वी दिलेला होता आणि साऱ्या कार्यक्रमावर नेहरूंच्या प्रतिमेचा चैतन्यस्पर्श झालेला होता. याच मंतरलेल्या वातावरणात आपल्या खेळांचा त्यानंतर काही काळ प्रवास झाला. टोकिओला झालेल्या आशिआई स्पर्धेतून मिल्कासिंग दोन सुवर्णपदके मिळवून परत आला आणि आशियातील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून त्या स्पर्धेत त्याचा गौरव झाला. परत आलेल्या संघाला नेहरूंनी त्रिमूर्तीवर जेवावयास बोलावले. प्रत्येक खेळाडूशी मनमोकळेपणे गप्पा मारल्या. मिल्कासिंगचे आईवडील फाळणीच्या वेळी मारले गेलेत आणि त्याचे लहापण फार हालात गेले हे ऐकून पंडितजींच्या डोळ्यांत अश्रू तरळले. त्यांनी मिल्काला सांगितले, ‘ माझ्या वयाचे, माझ्या पिढीतील सारेच भारतीय, तुझे आईवडील आहेत. काही काळजी करू नकोस! आपणा दोघांना मिळून हा देश खेळात फार मोठा करावयाचा आहे हे विसरू नकोस ! ’



त्यानतर चीन, पाकिस्तान अशी तीन युद्धे आपण खेळलो कोणी मानो अथवा न मानो या प्रत्येक युद्धानतर आपले आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक राजकीय जीवन फार ढवळून निघाले. आपण स्वत: स्वत:लाच ओळखणार नाही इतके बदलून गेलो. – जवळच्या मित्रमंडळींनी घरून डबे आणावेत आणि चादण्या रात्रीत हिरवळीवर वा गच्चीवर बसून काव्यशास्त्रविनोद करत चांदणी-भोजन करावे असे पहिले एशियाड होते. आपण सारेचजण आज जीवनाच्या साऱ्याच क्षेत्रात ते चांदणीभोजन विसरून गेलोय. आज आपण मित्रमंडळींना कटविण्यासाठी आणि आपल्या ऐश्वर्याने दिपवण्यासाठी पैशाचा धूर सोडत त्यांना पचतारांकित हॉटेलात बफे देतो. आजचे आशियाड असल्या पचतारांकित हॉटेलातील बफेसारखे झाले !

## १३

'जगातील स्वर्ग जर कोठे असेल तर तो येथेच आहे' म्हणून सागणारे एक वाक्य लाल किल्ल्यात कोरलेले आहे हे आपण मागे पाहिले. त्यानंतर दिल्लीत बसून राज्य करणाऱ्या प्रत्येकाने ते वाक्य आदर्श मानून या देशावर राज्य केले. असे राज्य करणाऱ्या राज्यकर्त्यांनी आपणाला आजचा आशियाड करून दाखविला. 'न मिळे पहाया पुन्हा नरा' असा एक अतिभव्य सोहळा झाला आणि संपला! बघणाऱ्यांच्या डोळ्यांचे अक्षरश: पारणे फिटले, पण हे सारे जवळून पाहूनही नक्की काय झाले ते सागणे आपले काम नव्हे. ते सांगावयास पानिपतच्या लढाईचे वर्णन करणाऱ्या सगनभाऊंची प्रतिभा हवी ! अक्षरश: शेकडो कोटी रुपये पाण्यासारखे वापरले गेले ! अनेक जण एका रात्रीत कोट्याधीश झाले भारताच्या वाट्याला नगण्य वाटावीत अशी पदके आली. – पण त्याचबरोबर, आमचे राष्ट्र, आमचे तंत्रज्ञ, आमचे प्रशासक ठरलेल्या वेळात पाहिजे त्या दर्जाच्या गोष्टी उभारू शकलात आणि लोकशाहीतील सारे स्वातंत्र्य देऊनही शिस्तबद्धपणे, सुरळीतपणे, खेळीमेळीच्या वातावरणात आम्ही या साऱ्या गोष्टी सहजपणे पार पाडू शकतो हे पण आपण सिद्ध केलेच की !

जमा-खर्चाच्या या अनेक बाजू लक्षात घेऊनही या सोहळ्याचे नक्की फलित काय या प्रश्नावर आपण पुन्हा एकदा थबकतो. समजा, या आशियाडसाठी आपण हजार कोटी रुपये खर्च केले येवढे पैसे नुसते बँकेत ठेवले असते तरी त्याचे वर्षाला १००–२०० कोटी रुपये व्याज मिळाले असते ! दरवर्षी ही येवढी रक्कम नियोजनपूर्वक आपल्या खेळावर खर्च केली तर आपल्या खेळाडूंचा दर्जा केवढा तरी वाढला असता आणि आपणाला खूप पदके मिळाली असती; पण हा असला कुशाभाऊ कारकुनाचा कारकुनी विचार करण्याचे तरी काय कारण आहे ? दरवर्षी आणखी १००–२०० कोटी रुपये खेळावर खर्च करावयास आपणाला कोणी मना केली आहे का ? आणि संतापायचे, तर फक्त आशियाडच्याच खर्चाच्या नावाने बोटे का मोडावयाची ? –अमेरिकेला भेट देताना इंदिरा गांधींनी एक मजेशीर हिशोब मांडून दाखविला होता. एक अण्वस्त्र वा एक क्षेपणास्त्र बनवावयास जेवढा खर्च येतो, तेवढ्या खर्चात विकसनशील देशातील दहा लाख मुलांच्या शिक्षणाची सोय होईल ! एक लाख लोकांना एक वर्ष जेवण देता येईल आणि दहा हजार खेड्यांना पाणी पुरविता येईल म्हणून सांगितले होते बाईंच्या त्या विधानाला आपण त्या वेळी अमाप प्रसिद्धी दिली होती; पण त्या वेळी चिनी वृत्तपत्रप्रतिनिधीने बाईंना विचारलेला प्रश्न आपण विसरलो होतो. त्याने विचारले होते, 'भारतात आपण दरवर्षी जेवढ्या मोटारगाड्या आणि स्कूटर्स बनविता तेवढ्या खर्चात आपण किती खेड्यांना पिण्याचे पाणी पुरवू शकाल ते सांगाल का ?'

हे असले अवघड जागी असलेले प्रश्न बाजूला ठेवले तरी एक मुद्दा बाकी उरतोच. अगदी आपण खेळांना खूप महत्त्व दिले तरी या पदकांना किती महत्त्व द्यावयाचे हा खरा प्रश्न आहे. या बक्षिसांचा आणि राष्ट्रातील सर्वसामान्य माणसाच्या खेळामधील सहयोगाचा व कौशल्याचा काही संबंध असतो का ? चीन वा रशिया स्पर्धेतील खेळाडू कसे तयार करतात ते क्षणभर बाजूला ठेवू. फक्त ऑलींपिकमधील मॅरेथॉन शर्यतीवर आधारलेला गेम्ससारखा सिनेमा पाहिला तरी या स्पर्धेतील तयारीची, जीवघेण्या स्पर्धेची व राजकारणाची घृणा येते. समजा, आपण आपले पाच हजार खेळाडू निवडून पुढील पाच वर्षे त्यांच्यावर वारेमाप खर्च करून आणि त्यांना यांत्रिक पद्धतीने तयार करून शेकड्यांनी बक्षिसे मिळविली तर त्याचा सर्वसामान्य माणसाच्या खेळामधील सहयोगावर काही परिणाम होईल का ? त्यापेक्षा खेड्यापाड्यातील मुले संध्याकाळी देहभान विसरून स्वत:ला हॉकी वा कबड्डीच्या क्रीडांगणावर झोकून देत असतील तर ते अधिक चांगले आहे का ? किंवा आज जर्मनीत करतात तसे नवे खेळ शोधून गावातील साऱ्या लोकांनी खेळाची मौज-मजा लुटत व्यायाम करणे अधिक हितावह नाही का ?

यातील कोणत्याच कल्पनेवर मला अधिक चर्चा करावयाची नाही. कारण प्रथमच सागितल्याप्रमाणे, 'पैशाची भांग घेतली की कल्पनाच-कल्पना सुचतात!' हे टिळकाचे वाक्य मला पुरते माहीत आहे. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे 'सात आंधळे आणि एक हत्ती' ही गोष्ट मला फार चांगली माहीत आहे. हा हत्ती केव्हा शेतीमालाचे भाव बनून आपल्या भेटीला येतो तर केव्हा 'अप्पू' बनून! आपणाला अशा वेळी तो हत्ती समजला नाही आणि आपण आंधळे झालोय येवढे समजले तरी खूप असते! एखाद्या डोळसाची मदत घेता येते. जगातील स्वर्ग येथेच आहे म्हणून मग्रुरीने सांगणाऱ्या दिल्लीतील राज्यकर्त्यांच्या राजवाड्याला लागूनच राजघाट आहे. गांधीजींच्या समाधीजवळ जाण्यापूर्वी जेथे पायातील चप्पल काढून ठेवावी लागते तेथे गांधीजींचे एक वचन लावलेले आहे.

" I am giving you the talisman मी तुम्हाला एक निकष देतोय. आपण करतो ते चूक की बरोबर अशा सभ्रमात तुम्ही पडाल तेव्हा एक साधी गोष्ट करा. तुम्हाला माहीत असलेला सर्वात पददलित माणूस तुमच्या मनासमोर आणा. तुमच्या करण्याने त्याचा थोडा तरी फायदा होणार आहे का ते बघा. तुमच्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला मिळालेले असेल ! "

गांधीजींच्या या वाक्यातील आशय समजला तर आशियाडच्या निमित्ताने आपण निर्माण केलेल्या अनेक प्रश्नाची उत्तरे आपणाला अगदी सहजपणे सापडतील आणि ती उत्तरे अशी मिळत असतानाच आपल्या दैनंदिन जीवनातील अनेक जमाखर्चांचे ताळेबंद आपण पुन्हा एकदा नीटपणे नव्याने माडले पाहिजेत हे पण आपणाला जाणवेल !

□

## ४ लाख ६३ हजार वाचकांची एकमुखी प्रशंसा




**चौथी डिलक्स आवृत्ती**

लेखक : वि. ग. कानिटकर

॥ पृष्ठसंख्या ५४० ॥ मोठा डबल क्राउन आकार ॥ भरपूर छायाचित्रे ॥

॥ मूळ किं. १४० रु. ॥ सवलतीत ९५ रु. ॥

चौथ्या डिलक्स आवृत्तीचे खास आकर्षण

# माइन काम्फ

या हिटलरच्या दुर्मिळ आत्मचरित्राची सचित्र ओळख

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.